# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१४

**संपादक**
श्री. जयंत कवठेकर
संपादकीय मंडळ
श्री. सुनील कुलकर्णी
सौ. मंजूषाताई कुलकर्णी
श्री. निलेश धायरकर
कु. अहिल्या धायगुडे

**दूरध्वनी संपर्क**
श्री. जयंत शंकर कवठेकर
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२०४
(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०
भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/-
(विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’-रूपवर्धिनी
या नावाने काढावा.

## अंतरंग


❖ हृद्‌गत
❖ आशय मुखपृष्ठाचा
❖ विशेष लेख
❖ विभागश: वार्षिक वृत्त
❖ आर्थिक स्थिती व आवाहन



❖ छपाई ❖
प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.


वार्षिक विशेषांक — मुखपृष्ठ : श्री. सचिन जोशी

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

*** पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर** *** श्री. प्रमोद चौधरी** *** पद्मश्री श्री. प्रतापराव पवार**

### *संस्थापक सदस्य*

- *कै. पु. व. श्रॉफ*
- *कै. कृ. ल. पटवर्धन*
- *कै. कां. गि. शहा*
- *कै. दत्तोबा तांबे*
- *कै. अ. न. गोगावले*
- *श्री. श्री. शं. सामळ*
- *श्री. कृ. गो. लवळेकर*
- *श्री. रा. प. देसाई*

### *विद्यमान कार्यकारी समिती*

***अध्यक्ष***
*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***
*श्री. उदय गुजर*
*श्री. आर. ए. मेहता*
*श्री. श्रीकांत सामळ*

***कार्याध्यक्ष***
*श्री. कल्याण वर्दे*

***सहकार्याध्यक्ष***
*श्री. शिरीष पटवर्धन*
*श्री. रामभाऊ डिंबळे*

***कोषाध्यक्ष***
*श्री. कन्हैयालाल बलदोटा*

***सहकोषाध्यक्ष***
*श्री. विलास कुलकर्णी*

***कार्यवाह***
*श्री. ज्ञानेश पुरंदरे*

***सहकार्यवाह***
*श्रीमती पुष्पाताई नडे*
*श्री. विश्वास कुलकर्णी*
*श्री. अमोल उंदरे*

***सदस्य***

- श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी
- श्री. अरविंद केळकर
- श्री. विनोद बिबवे
- कु. लता टिळेकर
- कु. दीपाली पवार
- सौ. बागेश्री पोंक्षे
- प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर
- डॉ. प्रदीप आगाशे
- श्री. संजय तांबट
- डॉ. विनेश नगरे
- श्री. नंदकिशोर सोंडूर
- श्री. अविनाश जोशी
- श्री. अजय कदम
- श्री. सुनील कुलकर्णी
- सौ. मेघना अत्रे
- श्री. पराग लकडे
- ॲड. सौ. निलिमाताई गोखले
- श्री. चंदन हायगुंडे

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**
**PAN No. : AAATS 5461K**
संपर्काचा पत्ता : - ‘स्व’-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६
देणगीसाठी आयकर सवलतीचा तपशील :

**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**

**(For the period of 2014-15 to 2016-17)**

**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**

भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई-मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org
**धनादेश ‘स्व’-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

## 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच....

* सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था
* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था
* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
* विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'
* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था
* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

महाराष्ट्रातील निरनिराळ्या जातींचे प्रेम एकाच ठिकाणी बसण्यासारखे जर कोणतेही स्थळ असेल तर ते शिवछत्रपतींचे चरित्र

## हृद्गत

सविनय नमस्कार,

तीन दशकांहून अधिक काळ सातत्यानं समर्पण भावनेनं काम केलेल्या, दीडशेहून अधिक जास्त तरुण कार्यकर्ते व त्यांना मार्गदर्शन करणारे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते आणि हितचिंतकांच्या प्रयत्नांतून 'स्व'-रूपवर्धिनीचं काम अनेक अंगांनी वाढतं आहे. नुकत्याच संपलेल्या वर्षाचे वृत्त सादर करताना आम्हा सर्व कार्यकर्त्यांना मनापासून आनंद होत आहे.

आपल्याला कल्पना आहेच की स्वर्गीय किशाभाऊंच्या कल्पनेतील अनेक सामाजिक/शैक्षणिक प्रकल्पांची त्यांच्या काळात व नंतरही वाढ होत गेली आहे. १२ विद्यार्थ्यांची निवड करून एका शाखेपासून सुरू झालेल्या शाखा विभागामध्ये आज १६ शाखा कार्यरत असून सुमारे ८०० विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणारी शिबिरं, सहली याचं प्रमाण व विविधता खूपच वाढली आहे. आपल्या या प्रकल्पाचं कौतुक वाटून टाटा मोटर्ससारख्या समाजप्रेमी उद्योगातील अधिकारी वर्धिनीच्या अनेक उपक्रमात सहभागी झाले आहेत.

आपल्या जुन्या प्रकल्पांपैकी शारदामणि महिला विभागाद्वारे गेली अनेक वर्षे सुरू असलेल्या 'पाकोळी' बालवाडीला अलिकडेच पंचवीस वर्षे पूर्ण झाली. सहाय्यक परिचारिका वर्गही सातत्याने सुरू असून केवळ पुणे शहरातच नव्हे तर पुण्यापासून पन्नास किलोमीटर अंतरावरील माले (ता. मुळशी) व वेल्हा येथेही या अभ्यासक्रमाचा लाभ ग्रामीण महिलांना होत असून आजवर या अभ्यासक्रमातून प्रशिक्षित होऊन स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या गरजू भगिनींची संख्या एक हजाराहून अधिक झाली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये वर्धिनीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी युवक विभागावर भर दिला असून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अभ्यासिका व क्रीडा विभाग या माध्यमातून हजारो मुलामुलींना व तरुणांना त्याचा फायदा मिळाला आहे व सातत्याने होत आहे. आपल्या अभ्यासिकेत दररोज ३०० ते ४०० तरुण विद्यार्थी सकाळी ६.०० ते रात्री १२.०० पर्यंत मनापासून अभ्यास करताना पाहून बरं वाटतं. या सर्व गरजू विद्यार्थ्यांची प्रगती उत्तम होत आहे हे वाचून आपल्यालाही समाधान वाटेल. तसंच वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातून गेल्या वर्षी २३ विद्यार्थी यशस्वी झाले तर गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये ८३ विद्यार्थी एम.पी.एस.सी./ यु.पी.एस.सी. परीक्षांमध्ये यशस्वी होऊन केंद्र व राज्य शासनाच्या सेवेत अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. या आपल्या कार्यक्रमात अनेक अनुभवी विद्यमान व निवृत्त सरकारी अधिकाऱ्यांचा सक्रीय सहभाग आहे त्याची नोंद घेणं व त्यांचे आभार मानणं हे माझे कर्तव्य आहे.

आपले बहुतांश विद्यार्थी समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील कुटुंबातून येतात याची जाण असल्यामुळे वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी गेले वर्षभर खेळात प्राविण्य असणाऱ्या मुलांना आवश्यक असणारा पोषक आहार व तज्ज्ञांद्वारे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला असून त्याच्या आवश्यक त्या सर्व नोंदीही ठेवल्या असून या पहिल्या टप्प्यात पन्नास विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ही संख्या हळूहळू वाढवत नेण्याचा

**धैर्याने, उमेदीने, उत्साहाने, निष्काम कर्माने राष्ट्राला जे तेज येते, त्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजेच शिवाजी महाराजांचे चरित्र**

प्रयत्न सुरू आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञानातील मूलभूत संकल्पना समजावून देण्याचं काम आपल्या संस्थेद्वारे गेली अनेक वर्षे सुरू असून विचार कसा करायचा हे प्रयोगातून शिकवून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, गरज पडेल तिथे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना हसत-खेळत कसे शिकवावे याचे प्रशिक्षणही आपल्या फिरत्या प्रयोगशाळेचे स्वयंसेवी शिक्षक देत असतात. सध्या ग्रामीण भागातील दहा गावातील सुमारे १२०० विद्यार्थ्यांना या प्रयोगशाळेचा लाभ मिळत आहे. याशिवाय पुण्यातही दर शनिवार-रविवारी होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जात आहे.

कामं अनेक आहेत व त्या त्या प्रकल्पांचे विभाग त्यांत कार्यरत आहेत. आता या वर्षापासून आपण विभागवार समित्यांचे गठण केले असून प्रत्येक महिन्याला या समित्यांच्या बैठकांतून त्या त्या विभागाची उद्दिष्टे, त्या दिशेने केलेली प्रगती यावर विचार करून त्यातील आवश्यक त्या विषयांवर कार्यकारिणीमध्ये त्याची चर्चा करण्यात येते.

'स्व'-रूपवर्धिनी ही संस्था सार्वजनिक धर्मादाय न्यास असून त्यात सध्या नऊ विश्वस्त आहेत. या वर्षामध्ये विश्वस्तांच्या चार व कार्यकारिणीच्या सहा बैठका झाल्या. वाढत्या कामाचा आवाका लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्तांनी विश्वस्त संख्येत वाढ करण्याचे ठरविले आहे तसेच संस्थेच्या प्रत्येक कार्यविभागासाठी विश्वस्तांच्या ३-४ समित्याही गठित करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे वाढत्या कामाला अधिक गती देता येईल असा विश्वास वाटतो.

आत्तापर्यंत वर्धिनीचा आर्थिक कारभार आपल्यासारख्या सुहृदांच्या, काही व्यावसायिकांच्या, उद्योजकांच्या आणि अर्थातच वर्धकांच्या सहकार्यामुळे सुरू आहे. परंतु आता महागाई व वाढत्या नवनवीन प्रकल्पांमुळे आर्थिक ताण जाणवतो आहे. त्यामुळे यापुढील दोन-तीन वर्षांमध्ये आपल्याला देणगीदारांची संख्या व वार्षिक देणग्यांची रक्कम वाढविण्यासाठी जोराने प्रयत्न करावे लागतील. आपला लोकसंग्रह उत्तम आहे पण आपल्या आर्थिक गरजांबद्दल आपण सर्वांशी बोलणं व तसंच त्यांच्यापर्यंत आपले नवीन उपक्रम पोहोचवणं याकडे येत्या वर्षात आपण जास्त लक्ष द्यायला पाहिजे.

पुढील २-३ वर्षांमध्ये आपल्याला व्यवसाय प्रशिक्षणासाठी नव्या वास्तू उभ्या करणं तसेच विद्यार्थ्यांच्या व तरुणांच्या अनेक कार्यक्रमांसाठी व शिबिरांसाठी शिबिरस्थळ उभे करण्याची आवश्यकता आहे. शिबिरस्थळासाठी आपण पुण्यापासून ३५ किलोमीटर अंतरावरील कातवडी येथे चार एकर जमीन विकत घेतली आहे. २०१५ मध्ये या जागेवर अनेक प्रकल्पांची सुरुवात करण्याचा सर्व कार्यकर्त्यांचा मानस आहे. तसेच पुण्यापासून १७-१८ किलोमीटर अंतरावरील चऱ्होली बुद्रुक येथील जागेवर आपण साकारणार असलेल्या बहुआयामी प्रशिक्षण संकुलाचा बांधकाम आराखडा पिंपरी चिंचवड महानगर पालिकेकडे सादर केला आहे. या जागेवरही अत्यावश्यक अशा सुविधांसाठी काही खर्च येत्या वर्षात आपल्याला करावा लागणार आहे.

८०-जी ही आयकरातील सुटीची सुविधा संस्थेकडे कायमस्वरुपी आहेच पण आनंदाची गोष्ट म्हणजे केंद्र

**हिंदुस्थानासारख्या गतप्राण झालेल्या देशात श्री शिवाजी महाराजांसारख्या विभूतींची आठवण जितकी अधिक वेळा व सर्वतोमुखी होईल तितकी अत्यंत श्रेयस्कर आहे.**

सरकारच्या अर्थ मंत्रालयाने आपण दाखल केलेला प्रोजेक्ट स्वीकारून त्यापोटी होणाऱ्या खर्चांकरिता मोठ्या प्रमाणात निधी उभारण्यासाठी आयकराच्या कलम ३५-ए.सी अंतर्गत १०० टक्के आयकर सुटीची सुविधाही दिली आहे.

वर्धिनीसारख्या सामाजिक कामामध्ये सुद्धा कामाची गती आणि परिणामकारता वाढवण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान व कार्यपद्धतीचा उपयोग करण्याची नितांत आवश्यकता आहे. याची जाणीव वर्धिनीच्या परिवारातील सर्वच घटकांना आहे असा मला विश्वास वाटतो. लक्ष घालून करायलाच हवे अशा समाजातील आवश्यक अशा विषयांमध्ये काम करण्यासाठी वर्धिनीचे काम ३५ वर्षांपूर्वी सुरू झाले आणि आवश्यकतेनुसार विस्तारत गेले आहे. यापुढेही कामाचा विस्तार होत राहणार. हा जगन्नाथाचा रथ ओढण्याचा आम्ही मन:पूर्वक प्रयत्न करीत आहोतच. या आनंददायी आणि मंगल कार्याला आपलेही हात लागले तर काम अधिक गतिमान होईल असा मला विश्वास वाटतो.

**- श्री. कल्याण वर्दे**
**(कार्याध्यक्ष)**

**तळटीपांबद्दल विशेष...**

लोकमान्य टिळक यांची मंडाले कारागृहातून सुटका झाली या घटनेला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. लोकमान्यांच्या त्यागी जीवनाचे प्रेरक स्मरण व्हावे या उद्देशाने या वार्षिक कार्यवृत्ताचे मुखपृष्ठ जसे सादर केले आहे तसेच या कार्यवृत्ताच्या प्रत्येक पानावर तळटीपांमध्ये लोकमान्य टिळकांचे अत्यंत प्रेरणादायी विचार दिले आहेत. या सर्व तळटीपा १९२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘लोकमान्य टिळक - सूक्ति संग्रह’ या मौल्यवान संदर्भ ग्रंथातील आहेत. या ग्रंथात लोकमान्य टिळकांच्या प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयातील २,१९० मराठी सूक्ति व २३० इंग्रजी सूक्ति आहेत. श्री. स. वि. बापट यांनी १९०४ पासून या सूक्तींचा संग्रह करण्यास सुरुवात केली. संग्रहित केलेल्या सर्व सूक्तींची तपासणी करून दीड हजार सूक्ती त्यांनी वगळल्या व वरील निवडक सूक्तींचा एक अनमोल संग्रह देशाला अर्पण केला.


या सूक्ती संग्रहास श्री. महादेव हरि मोडक यांची चिकित्सक प्रस्तावना व श्री. स. वि. बापट यांचे अत्यंत तोलामोलाचे आत्मकथन लाभले आहे. श्री. बापट यांनी सूक्तीसंबंधी १८-१९ पाश्चात्य पंडितांचे संदर्भ देऊन सूक्ति संग्रहाच्या आवश्यकतेचे समर्थन केले आहे. तसेच ‘जेव्हा उदात्त विचार आपल्याला प्रेरणा देतात तेव्हा प्रत्यक्ष परमेश्वरच आपल्याशी बोलत असतो’ (It is God Himself who speaks to us when noble thots inspire us') या भावनेने आपण या संग्रह सिद्ध केला असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले आहेत.

पृष्ठसंख्येची मर्यादा व तळटीपेच्या जागेची मर्यादा यामुळे वरील सूक्तींपैकी अत्यल्प सूक्तींनाच स्थान देणे भाग पडत आहे याबद्दल क्षमस्व.

**मार्गातील अनेक अडचणी बाजूला सारून जो पुढे पाऊल टाकतो त्यालाच यश मिळते.**

## आशय मुखपृष्ठाचा

'लोकमान्य टिळक सूक्ति-संग्रह' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत श्री. महादेव हरी मोडक यांनी जॉर्ज सौंड यांचे 'The life of great geniuses is a **sublime storm**' 'लोकोत्तरांचे जीवन म्हणजे एक 'दिव्य तुफान'च होय' या म्हणण्याचे मूर्त चित्र म्हणजे लोकमान्य टिळकांचे जीवन होय असे म्हटले आहे.



मुखपृष्ठावरील ओजस्वी चित्राकृती 'दिव्य तुफान' हा आशय समर्थपणे अधोरेखित करीत एका उदात्त उंचीवर आपल्याला घेऊन जाते.

विराट विश्वरूप प्रत्यक्ष परमात्म्याशी एकरूप होऊन, सारं काही कवेत घेऊन दिव्य रूपात समोर साकारलं आहे. हत्ती, रथ, अश्व, विविध आयुधं, योद्धे यांनी सज्ज असलेली रणांगण मही्प संघर्ष सिद्धतेची ग्वाही देत आहे. इतका वेळ हतबल, गुडघे टेकून बसलेला, शस्त्र त्याग केलेला अर्जुन 'तस्मात उत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः' या आवाहनाला कोणत्याही क्षणी प्रतिसाद देण्यासाठी सिद्ध झालेला दिसत आहे आणि या प्रेरक पार्श्वभूमीवर मंडालेच्या तुरुंगाला तकलादू ठरवणाऱ्या कर्मयोगी लोकमान्यांची कार्यमग्न चिंतनमुद्रा आपलं लक्ष वेधून घेते. याच त्यांच्या चिंतनातनं 'गीता रहस्य' उलगडणारा 'कर्मयोग' जणू 'परमात्म्याचा प्रसाद' म्हणून या देशाला लाभला आहे.

मंडालेच्या तुरुंगभूमीला तुच्छ ठरवून तपोभूमीच्या उंचीवर नेणारी ही चित्राकृती आहे. अर्जुनाच्या हतबल रुपात असलेल्या आपल्या समाजाला ही चित्रकृती लोकमान्यांच्याच शब्दांतून संदेश देते आहे - 'उत्तिष्ठत! जाग्रत! प्राप्यवरान्निबोधत' 'उठा ! जागे व्हा ! उठा ! ....केल्याविण काही होत नाही हा सृष्टीचा नियम लक्षात आणून तुम्ही मात्र निष्काम बुद्धीने कर्ते व्हा...' (गीतारहस्य प्रस्तावना)

हे चित्र टिळक स्मारक मंदिर, पुणे येथील लोकमान्य टिळक यांच्या जीवनावरील ख्यातनाम चित्रकार कै. गोपाळ देऊस्कर यांनी तैलरंगात रेखाटलेल्या म्युरलमधील एक अंश आहे. या चित्राकरिता टिळक स्मारक मंदिर ट्रस्ट यांची 'स्व'-रूपवर्धिनी ऋणी आहे.

❖ ❖ ❖

अलिकडच्या तीरावर बसून जो नुसता संकल्प करतो त्याला यश मिळायचे नाही.

# पुनश्च हरिःॐ!

**- संजय विष्णू तांबट**

(श्री. संजय तांबट हे वर्धिनीच्या पहिल्या तुकडीतील वर्धक असून शिक्षणानंतर पाच वर्षे त्यांनी संस्थेचे पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. सध्या पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागात सहाय्यक प्राध्यापक या नात्याने ते काम करीत आहेत)

वर्तमानपत्रांनी आपले काम निःपक्षपातपणे व निर्भीडपणे बजावले असता, सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा राहतो. रस्तोरस्ती रात्री दिवे लावलेले असल्याने व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्याने जो उपयोग होत असतो, तोच त्या जागी वर्तमानपत्रांची लेखणी सदोदित चालू असल्याने होत असतो. ...वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील होत, तर हे दोन्ही अधिकार होईल तितक्या दक्षतेने बजावण्याचा आम्ही संकल्प केला आहे.'



चार जानेवारी १८८१ रोजी पुण्यात 'केसरी' सुरू झाला. त्याच्या पहिल्या अंकात छापलेले हे निवेदन. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे खरे तर केसरीचे पहिले संपादक नव्हते. किंबहुना पहिली सात-आठ वर्षे 'केसरी'च्या संपादकपदाची धुरा गोपाळ गणेश आगरकरांकडे होती. टिळकांशी मतभेद झाल्यानंतर आगरकर 'केसरी'तून बाहेर पडले. त्यानंतर म्हणजे २५ ऑक्टोबर १८८७ रोजी टिळकांचे नाव 'केसरी'वर पहिल्यांदा संपादक म्हणून लागले. तरीही पुढच्या काळात टिळक म्हणजे 'केसरी' हेच समीकरण जनतेच्या मनात रुजले. याचे कारण लोकमान्यांनी आपल्या निर्भीड लेखणीने आणि लढाऊ बाण्याने या वृत्तपत्राला स्वातंत्र्यलढ्याचे साधन बनवले. त्यासाठी त्यांना कारावासही भोगावा लागला.

राजद्रोहाच्या आरोपाखाली लोकमान्यांना दोनदा शिक्षा झाली. पहिली शिक्षा झाली, त्याला प्लेगच्या साथीत ब्रिटिशांनी केलेल्या अत्याचाराची व चापेकर बंधूंनी केलेल्या रँडच्या वधाची पार्श्वभूमी होती. दुसऱ्या वेळी बंगालच्या फाळणीच्या विरोधात देशभर ब्रिटिशांविरोधात पेटलेल्या आंदोलनाचा इतिहास होता. येरवड्याच्या कारावासातून बाहेर आल्यानंतर १८९९ मध्ये लोकमान्य टिळकांनी 'पुनश्च हरिःॐ!' असा अग्रलेख लिहून परकीय सत्तेविरुद्धचा लढा आणखी तीव्र केला. दुसरी शिक्षा सहा वर्षांच्या कारावासाची होती. ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात ही शिक्षा भोगत असतानाच 'गीतारहस्य' या महान ग्रंथाची रचना त्यांनी केली. १७ जून १९१४ रोजी लोकमान्य पुण्यात परत आले. त्याची शताब्दी आपण सध्या साजरी करत आहोत.

लोकमान्य मंडालेहून परतले, तेव्हा जगावर पहिल्या महायुद्धाचे सावट होते. त्यांनी काँग्रेसशी पुन्हा जुळवून घेतले आणि ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीमागेही आपली शक्ती उभी केली. ब्रिटिशांची अडचण हेरून 'ही वेळ आहे, लष्करात शिरा!' असा संदेश त्यांनी अग्रलेखातून महाराष्ट्रीय तरुणांना दिला. मात्र, लखनौत स्वराज्यसंघाच्या स्थापनेच्या वेळी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच',

**भित्र्या माणसास ज्याप्रमाणे अंधारात भुते नाचलेली दिसतात त्याचप्रमाणे निरुद्योगी व निरुत्साही माणसाचे वाटेत अडचणींचे डोंगर नेहमी उभे असावयाचेच.**

अशी गर्जना लोकमान्यांनी केली. 'वंदे मातरम्' पाठोपाठ भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा तो नवा मंत्र झाला. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधींकडे स्वातंत्र्यलढ्याची सुत्रे गेली. परंतु, तोवर 'स्वदेशी, स्वावलंबन, राष्ट्रीय शिक्षण आणि परकीय मालावर बहिष्कार' या चतु:सुत्रीच्या आधाराने लोकमान्यांनी ही चळवळ जनसामान्यांपर्यंत- तेल्यातांबोळ्यांपर्यंत नेऊन ठेवली होती. त्यामुळेच 'लंडन टाइम्स'चे वार्ताहर व्हॅलेन्टाइन चिरोल यांनी 'भारतीय असंतोषाचे जनक' असे टिळकांचे केलेले वर्णन सार्थ ठरते.

मंडालेहून सुटकेच्या शताब्दीच्या निमित्ताने लोकमान्यांच्या नेतृत्वाचे आणि कर्तृत्वाचे आज आपण पुन्हा स्मरण करतो आहोत. 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांनी त्यांच्याकडून काय घ्यावे आणि आपल्या संघटनेच्या माध्यमातून त्यांचा वारसा पुढे कसा न्यावा, याचा विचार आपण केला पाहिजे. 'गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे, हे काही वर्तमानपत्रांचे मुख्य कर्तव्य नव्हे!' असे लोकमान्य म्हणाले होते. हे उद्‌गार केवळ पत्रकारितेच्या संदर्भात नव्हे, तर सर्वच क्षेत्रांच्या बाबतीत आम्ही लक्षात घेणे आवश्यक आहे. लक्षात घ्या की, टिळक केवळ शिक्षक नव्हते; तर लोकजागृती, लोकशिक्षण हा त्यांचा ध्यास किंवा जीवितकार्य होते. विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'तून टिळक, आगरकरादि तरुणांना नवी प्रेरणा मिळाली. या विचारांतूनच राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण देणाऱ्या न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना त्यांनी केली. पण, हे पुरेसे नाही, हे लक्षात आल्याने लोकशिक्षणासाठी 'केसरी' आणि 'मराठा' ही वर्तमानपत्रे त्यांनी सुरू केली. त्यामागचा उद्देश लोकमान्यांच्या नजरेतून कधी ढळला नाही. लेखाच्या सुरवातीलाच उल्लेख केल्याप्रमाणे लोकमान्य सदैव सर्वसामान्य रयतेचे वकील आणि कोतवाल या भूमिका बजावत राहिले.

लोकमान्यांसारख्या महापुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्याने समाजाला दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे, अतिशय कठीण असते. लोकमान्यांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनी १९७० मध्ये 'केसरी'ने विशेषांक प्रसिद्ध केला होता. त्यात श्री. के. क्षीरसागर यांचा 'टिळकांच्या कार्याकडे पाहण्याची अयोग्य दृष्टी' या शीर्षकाचा लेख आहे. ते लिहितात, 'ज्या पुरुषाची कुशाग्रता आणि तेजस्विता प्रत्येक सार्वजनिक प्रश्नांत आणि प्रसंगात दिसून येते, त्याचे महत्त्वमापन तो समाजसुधारणेला अनुकूल होता की प्रतिकूल, तो पूर्ण लोकशाहीवादी होता की, थोडासा हुकूमशाहीकडे झुकलेला होता, तो हिंसेला अनुकूल होता की, प्रतिकूल, समाजवादापर्यंत त्याची प्रगती झाली होती की नव्हती, तो सुशिक्षितांचा पुढारी होता की, मजुरांचा पुढारी होता, या ठराविक पुस्तकी कसोट्यांनी करणे म्हणजे कल्पनाशक्तीचेच नव्हे; तर व्यक्तिमत्त्वमूल्यांचेही दारिद्र्य प्रकट करणे होय.' सर्वच महापुरुषांच्या बाबतीत आपल्याला हा दृष्टिकोन बाळगता येईल. पण टिळकांच्या बाबतीत आगरकरांशी त्यांचे झालेले मतभेद, कोल्हापूर प्रकरण, ताईमहाराज प्रकरण, लखनौ करार अशा विविध प्रसंगांमध्ये त्यांच्या भूमिका तपासताना तर त्याचे भान अधिकच राखणे आवश्यक आहे. टिळक अत्यंत वास्तववादी होते, याकडे लक्ष वेधताना क्षीरसागर सांगतात की, 'परराज्यांत हतबलपणे अन्यायापुढे मान लवविणाऱ्या, परकीयांनी जाणूनबुजून पिकविलेल्या हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर या विषवल्ली चघळणाऱ्या सुशिक्षित भारतीयांना डोळस, स्वाभिमानी आणि लढाऊ बनविणे, हे लोकमान्यांचे ऐतिहासिक

**अधिकाराचा लोभ अत्यंत कठीण आहे.**

कार्य होते.' आजच्या भारतापुढेही ही आव्हाने तितकीच बिकट आहेत. 'स्व'-रूपवर्धिनीच्या आम्हा युवकांना हे कार्य पुढे नेता येईल का, याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी भाबडा आशावाद नव्हे, तर ठोस विचारांच्या आधारावर ठाम कृती करण्याची गरज आहे.

'केसरी'च्या याच विशेषांकात ग. वि. केतकरांनी 'प्रसंगनिष्ठ साधनोचितता' या शीर्षकाच्या लेखात हे सूत्र पुढे नेले आहे. लोकमान्य समजून घेण्यासाठी व आपला आजचा व्यवहार ठरवण्यासाठीही हे महत्त्वाचे सूत्र आहे. केतकर लिहितात, 'टिळकांनी साधनांना अटळ साध्याच्या पायरीवरील दैवत कधीच केले नाही. वाटेल ते परिस्थितीप्राप्त साधन स्वातंत्र्यासाठी पत्करणे, यात ते पाप समजत नव्हते.' हा साध्यसाधनविवेक, नेत्याचे गुण लोकशाहीच्या संदर्भात स्पष्ट करताना केतकर टिळकांची गांधीजींशी तुलना करतात. ती कोणाला कदाचित वादग्रस्त वाटेल; पण महत्त्वाची आहे. 'जनतेतील राजकीय चळवळीची तीव्रता व सौम्यता ही टिळक आतल्या आवाजावरून ठरवत नसत. बाहेरच्या म्हणजे लोकांच्या सिद्धतेवरून व प्रवृत्तीवरून ठरवीत. जनमनाच्या नाडीवर वैद्याप्रमाणे टिळकांचा हात असे, आणि तदनुसार औषधयोजना म्हणजे कार्यक्रमयोजना ते करीत. म्हणूनच टिळकांसंबंधीच्या मृत्युलेखात गांधीजींनी म्हटले आहे की, 'हिज फेथ इन डेमोक्रसी फेअरली फ्रायटन मी !' लोकशाहीवरील टिळकांच्या विश्वासाचे गांधीजींना भय वाटले. टिळक लोकांची उत्साहशक्ती अजमावून तिच्यापलीकडे एक पाऊल जात व लोकांना पुढे खेचीत.' टिळकांचे नेतृत्व असे होते.

नेतृत्व करणे आणि नेतृत्व घडवणे सोपे नसते. त्यासाठी त्यागाची, अमाप कष्टांची तयारी ठेवावी लागते. तशीच विचारांची सिद्धता आणि साध्यसाधन विवेकाचीही आवश्यकता असते. 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांनी या नेतृत्व विचाराचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. कारण 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांनी विविध क्षेत्रात समाजाचे नेतृत्व केले पाहिजे अशी स्व. किशाभाऊंची इच्छा होती.

लोकमान्यांसारख्या महापुरुषाचा आदर्श समोर ठेवताना आजच्या काळाशी सुसंगत त्यांचा कोणता विचार आणि कृती पुढे नेऊ शकतो, याचा अभ्यास केला पाहिजे. आमच्या समाजाला पुढे नेणारे सर्व महापुरुष व महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या परंपरेचाही आम्ही असाच अभ्यास केला पाहिजे.

लोकमान्यांनी राष्ट्रीय शिक्षणासाठी शाळा सुरू केली. आपण किशाभाऊंनी सुरू केलेल्या शाळेनंतरच्या शाळेत राष्ट्रीयत्वाचे धडे गिरवत आहोत. लोकमान्यांनी लोकशिक्षणासाठी 'केसरी'ला साधन बनवले. आज वृत्तपत्रांपासून ते फेसबुक, ट्विटरसारख्या 'सोशल मीडिया'पर्यंतच्या माध्यमांना देशाच्या विकासाचे व विधायकतेचे साधन बनवता आले पाहिजे. लोकमान्यांनी शिवजयंती, गणेशोत्सवासारख्या माध्यमांतून लोकांना संघटित केले. या उत्सवांमागची त्यांची प्रेरणा आजही तितकीच उत्कट राहील आणि आजही हे उत्सव संघटना व नेतृत्वघडणीचे माध्यम राहतील, यासाठी आम्ही प्रयत्न केले पाहिजेत. लोकमान्य तेल्यातांबोळ्यांचे पुढारी बनले. पुण्याच्या वाड्यावस्त्यांमधून विस्तारलेल्या स्व-रूपवर्धिनीच्या कामातून आपले युवकही सर्वजनांचा आधार बनले पाहिजेत. त्यासाठी गीतारहस्यांतून मांडलेल्या कर्मयोगाची साधना आपण केली पाहिजे. लोकमान्यांचे स्मरण करण्याचा हाच एक मार्ग आहे. पुनश्च हरिः ॐ!

**अनीतीने आणि त्यातही उघड उघड अनीतीने आजपर्यंत कोणीही तरला नाही.**

# आजच्या काळाशी सुसंगत - लो. टिळकांची चतुःसुत्री

**- मिलिंद प्रभाकर सबनीस**

(श्री. मिलिंद सबनीस हे ज्ञानदा प्रशालेत कला शिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांची समाजामध्ये खरी ओळख 'वंदेमातरम्' या विषयातील ज्येष्ठ अभ्यासक अशी आहे. वंदेमातरम् : एक शोध या पुस्तकानंतर अलिकडेच 'समग्र वंदेमातरम्' या विषयावरील त्यांचे दोन खंड प्रकाशित झाले आहेत)

गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनॅशनल स्कूल, मिलेनियम स्कूल अशा नावाने प्रामुख्याने दिल्ली किंवा इंटरनॅशनल अभ्यासक्रम राबवणाऱ्या शाळा व महाविद्यालयांचे पेव फुटले आहे. अशा तथाकथित पाश्चात्य संस्कृती रुजविणाऱ्या व शिक्षण देणाऱ्या पंचतारांकित शाळांमध्ये अवाजवी शुल्क भरून प्रवेश घेणे प्रतिष्ठेची बाब मानली जाऊ लागली आहे. मनाने आजही आपण परकियांचे अंकित आहोत. मॅकॉलेने रुजवलेली शिक्षणपद्धती आजही आपण सोडायला तयार नाही. या सर्व पार्श्वभूमीवर १०८ वर्षांपूर्वी प्रथम दादाभाई नौरोजींनी मांडलेली आणि लोकमान्य टिळकांनी त्याला कृतिशीलतेची जोड देऊन संपूर्ण देशात रुजवलेल्या चतु:सुत्रीची आठवण होणे स्वाभाविक आहे.

१९०६च्या कलकत्ता अधिवेशनात अध्यक्ष दादाभाई नौरोजींनी स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण, विदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशीचा वापर असे ठराव मांडले. पण ते लोकांमध्ये रुजवण्याचे काम लोकमान्य टिळकांनीच केले. खरंतर त्याही पंचवीस वर्षे आधी म्हणजे १८८० मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला होता. टिळकांच्याच भाषेत ''इंग्रजांच्या सरकारी शाळेतून लंगडे विद्वान तयार होतात. परंतु आपला देश ओळखण्यास शिकणे हेच खरे राष्ट्रीय शिक्षण'' असे टिळक मानीत.

आज आपण नेमके हेच विसरलो आहोत. भारतीय गुरुकुल पद्धत रुजवणारे 'शांतीनिकेतन', संस्कृती रुजवणाऱ्या मातृभाषेतील शाळा ओस पडू लागल्या आहेत. अनेक इंग्रजी माध्यमातील शाळेतील दुसरी भाषा म्हणून असणारा मराठी विषय जाऊन तिथे फ्रेंच वा जर्मन भाषेची सक्ती होऊ लागली आहे. भारतातील, इतर प्रांतातील भाषा शिकण्यापेक्षा विदेशी भाषा अधिक महत्त्वाच्या वाटू लागल्या. भाषेपाठोपाठ तिथली संस्कृतीही आपलीशी वाटू लागली. कदाचित इथपर्यंतदेखील ठीक होते. परंतु त्या जोडीला आपल्या भाषेबद्दल, संस्कृतीबद्दल हीनत्वाची, कमीपणाची भावना रुजणे हे मात्र धोकादायक आहे. मराठी भाषेसाठी आंदोलने करणाऱ्या नेत्यांची मुले येथील विदेशी अभ्यासक्रमाच्या शाळांमध्ये शिकतात. ही वस्तुस्थिती आपण नाकारू शकत नाही.

१९०५ च्या वंगभंग विरोधी आंदोलनाच्या निमित्ताने 'स्वराज्य' हा शब्द टिळकांनी रुजवला. टिळक म्हणत-''माझ्या घरचा कारभार मी पाहणे याचेच नाव स्वराज्य. 'स्व' म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा आणि त्यांच्या साहाय्याने चालणारे जे राज्य ते स्वराज्य. असे राज्य प्राय: एका दृष्टीने सुराज्य असायचेच. पण शिस्त थोडी कमी असली म्हणून तरी तिची किंमत स्वातंत्र्यापेक्षा काही अधिक धरता येत नाही.''

लो. टिळकांनी स्वराज्याचा नारा दिला आणि देशभरातून त्याला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. खरंतर पुढच्या सर्व स्वातंत्र्य चळवळीचा पाया या एका शब्दाने घातला. आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर

**राजा किंवा अधिकारीवर्ग कितीही जुलमी असला तरी अखेरीस प्रजेच्या असंतोषापुढे त्यास हात टेकण्याची पाळी येते.**

टिळकांच्या कल्पनेतील स्वराज्य आले पण सुराज्य आले का? भ्रष्टाचाराने, गैरशिस्तीने पोखरलेला देश सुराज्य कधी होणार? टिळकांच्या कल्पनेतील स्वराज्य मिळतानाच सुराज्य बनवण्याच्या दृष्टीने पावले पडायला हवी होती परंतु नेभळट राजकीय नेतृत्त्व आणि जागतिक शांततेच्या अवास्तव कल्पना यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळातच तशी पावले पडली नाहीत.

आज इतक्या वर्षांनी राजकीय नेतृत्त्वाने सुराज्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. हीच समाधानाची बाब आहे.

लोकमान्यांनी मांडलेल्या चतु:सूत्रीतील परदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशीचा पुरस्कार या सुराज्य बनवण्याच्या मार्गातील महत्त्वाच्या गोष्टी आहेत. शतकांपूर्वी मांडलेली ही दोन तत्त्व आजही कालबाह्य नाहीत. टिळकांच्या आवाहनानंतर विदेशी वस्त्रांच्या होळ्या पेटल्या. ज्याची धग लंडनच्या राजसत्तेला बसली. इंग्रजांचा व्यापाराचा डोलाराच डळमळीत करणारी ही तत्त्वे होती.

गेल्या दशकांमध्ये स्वदेशीचा प्रचार पुन्हा एकदा नव्याने सुरू झाला. विदेशी वस्तू उत्तम, त्या वापरणे ही एक प्रतिष्ठेची बाब असे समजणारी मनोवृत्ती बदलण्याचे काम अलीकडच्या काळात होऊ लागले आहे. स्वातंत्र्यापूर्वीची विशेषता वंगभंगविरोधी आंदोलनाच्या वेळची स्वदेशीची चळवळ आणि आजची स्वदेशीची चळवळ यात मूलत: फार मोठा फरक नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धात हरलेल्या जपानने जागतिक बाजारपेठेत अमेरिकेला आव्हान निर्माण केले व इलेक्ट्रॉनिकची बाजारपेठ काही वर्षात काबीज करून एका वेगळ्या प्रकाराने अमेरिकेचा पराभव केला. नेमके हेच गमक आज विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशीचा पुरस्कार करीत आपल्या राष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी वापरता येईल. आज भारतीय बाजारपेठेत स्वस्त चिनी बनावटीच्या वस्तूंनी आघाडी घेतली आहे. परंतु स्वस्त म्हणून विकत घेणाऱ्या आपण ग्राहकाने त्याचा अल्पजीवीपणा व त्यातील चीनकडे जाणारा पैसा याचा विचार करणे आवश्यक आहे.

‘परम्’ संगणकाची निर्मिती हा स्वदेशीच्या आग्रहातील एक कळस मानता येईल. आपल्याकडे गुणवत्तेची कमी नाही. कमी आहे ती आत्मविश्वासाची. जागतिक बाजारपेठेत घुसण्यासाठी लागणारा मुत्सद्दीपणा कदाचित कमी पडत असेल. आज मंगळावर पोहोचणाऱ्या यानाचे तंत्रज्ञान संपूर्णपणे भारतीय शास्त्रज्ञांच्या कल्पनेतून तयार झालेले आहे. शिवाय या मोहिमेला आलेला खर्चही तुलनेने कमी आहे. टिळकांच्या कल्पनेतील स्वदेशीची संकल्पना आजच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अशा वेगळ्या प्रकाराने साकार होत आहे. भारतीय संरक्षण दलातही स्वदेशी बनावटीची अस्त्रे, विमाने, पाणबुड्या, जहाजे व तंत्रज्ञान वापरण्यासाठी प्राधान्य व प्रोत्साहन मिळू लागले आहे.

म्हणूनच लोकमान्य टिळकांनी प्रसारित केलेली ही चतु:सूत्री कधी कालबाह्य होणार नाही. किंबहुना स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करण्यासाठी या चतु:सूत्रीचा अवलंब उपयोगी पडणार आहे. लोकमान्य टिळक आणि त्यांचे हे विचार त्यांच्या द्रष्टेपणाचीच साक्ष देतात. स्वा. सावरकरांसारखे विज्ञाननिष्ठ विचार त्यांनी मांडले नसले तरीही आपल्या संस्कृतीचा, धर्माचा अभ्यास करून त्यांनी मांडलेले हे विचार काळाच्या पुढचेच होते.

- मो. ९४२२८८१७८३

**अस्पृश्यता ही वैदिक धर्मास संमत नाही.**

# सत्यशोधक - एक अनुभव पूर्णत्त्वाचा

**- श्री. संदीप प्रकाश आणि सौ. अमृता**

(श्री. संदीप मोरे हे वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते असून शाखा उभारणीच्या कामात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतलेल्या संदीप मोरे यांनी महापालिकेत तसेच युनियनच्या कामात आपल्या कामाची विशेष छाप उमटवली आहे.)

लेखाचं हे शीर्षक कदाचित वेगळं वाटेल पण ते जाणीवपूर्वक दिलं आहे आणि त्यामागचे माझे मनोगत या लेखाच्या माध्यमातून आपल्यासमोर ठेवत आहे.

पुणे महानगरपालिका कामगार युनियन ही पुणे महानगरपालिकेतील एक लढाऊ कामगार संघटना. पालिकेतील सफाई कामगारही याचे सदस्य आहेत. शहराच्या गल्ल्या, रस्ते, ड्रेनेज, कचराकुंड्या यांची सफाई करणे हे या कामगारांचे काम. अशा कष्टाचे काम करणाऱ्या कामगारांना हाताशी धरून एका उच्चवर्णीय पण याच चळवळीतील खंद्या कार्यकर्त्याने सत्यशोधक हे राष्ट्रपिता ज्योतिबा फुल्यांच्या जीवनावरचं एक गाजलेले नाटक उभं केलं. नुसतं उभं केलं नाही तर व्यावसायिक नाटकाशी संबंधित असणाऱ्यांनाही आश्चर्य वाटावं इतकं उत्तम झालेल्या या नाटकाचे दोन वर्षात ११५ हून अधिक प्रयोग झाले आहेत. ही गोष्ट केवळ आणि केवळ त्या कोलंबसाच्या पराक्रमासारखीच आहे. मार्ग माहिती नसतानाही धाडसाने निघालेल्या कोलंबसाने एक नवा इतिहासच घडवला. अगदी तशीच अशक्याला शक्य करणारी अभिमानास्पद स्थिती आमच्या कामगार कलाकारांची झाली. ज्यांनी उभ्या आयुष्यात कधीही नाटक पाहिलं नव्हतं त्यांना घेऊन एक प्रायोगिक नाटक रंगमंचावर सादर करण्याचं स्वप्न पाहणं ही गोष्ट त्या कोलंबसाच्या धाडसासारखीच आहे. भविष्यातील आव्हानं माहिती असूनही झोकून देणारा आमच्या मनातील कोलंबस म्हणजे सत्यशोधक या नाटकाचे दिग्दर्शक श्री. अतुल पेठे.

**प्रशिक्षणपूर्व परिस्थिती :**

८ ऑगस्ट २०११ चा दिवस. युनियनच्या कार्यालयात सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी जमले होते. युनियनच्या नेहमीच्या विषयातीलच काही तरी असेल असे वाटले. या बैठकीत अचानक अतुल पेठे यांचे आगमन झाले. कचराकोंडी या सफाई कामगारांच्या व्यथांना वाचा फोडणाऱ्या फिल्मचे दिग्दर्शक म्हणून आम्हाला ते परिचित होते. मला वाटले, अशाच कोणत्या तरी उपक्रमासाठी ते आले असतील. आमच्या युनियनच्या जनरल सेक्रेटरी मुक्ता मनोहर यांनी देखील युनियनच्या माध्यमातून आणि कामगारांच्या सोबतीने ठोस अशा प्रकारचा एक उपक्रम अतुल पेठे यांना करायचा आहे असे मोघम सांगितले. अतुल पेठे आम्हा सर्वांशी बोलले. त्यांनी आम्हाला सांगितलं की मला ठाऊक नाही मी जे करणार आहे ते काय असेल ? परंतु जे करीन ते नक्कीच दखलपात्र व चैतन्याने ओतप्रोत भरलेलं असेल. मग ते नाट्यवाचन असेल, कदाचित गाणी असतील, एखादे नाटक असेल किंवा आणखी काहीतरी वेगळेच असेल. जे होईल ते मात्र मोठे ऊर्जादायी असेल एवढे मात्र निश्चित. ‘ठरलं तर मग ! कोण कोण येणार माझ्याबरोबर ?’ अतुलजींच्या प्रश्नाने

**अस्पृश्यता गेली पाहिजे, ही रुढी आहे, ही नष्ट झालीच पाहिजे.**

माझ्यासकट सर्वजण भानावर आले. सगळे हात उत्साहाने वर झाले. मग आता १० ऑगस्टला दुपारी २.०० वाजता श्रमिक भवनात भेटायचं असं त्यांनी सांगितलं आणि मिटींग संपली.

**प्रशिक्षणाची सुरुवात :**

१० ऑगस्टला ठरल्याप्रमाणे आम्ही साधारण १५-१६ जण जमलो. श्रमिक भवनात पोहोचल्याच्या त्या क्षणापासून मला आश्चर्याचे जे धक्के बसायला लागले ते आजतागायत. आमच्या आधीच दहा मिनिटे अतुल पेठे सर हॉलमध्ये पोहोचले होते, आमची वाट पहात होते आणि पोहोचल्या क्षणीच प्रशिक्षणाची सुरुवात झाली. शब्द म्हणजे शब्द आणि तो पाळणं हे आपलं सर्वांचं कर्तव्यच आहे. हसतखेळत त्यांनी सहजपणे आम्हाला आपलंसं करून घेतलं. प्रत्येकाचा अत्यंत सविस्तर पण आपुलकीने प्रश्न विचारून परिचय करून घेतला. या त्यांच्या वागण्याने अतुल पेठे सर आमचे झाले नसते तरच नवल. सुरुवातीचे ८-१० दिवस कामगार येत होते पण संख्या निश्चित राहत नव्हती. कधी दहा तर कधी बाराजण, कधी ही संख्या एकदम २० वर जायची. संख्या कमी जास्त झाली तरी दररोज दुपारी २.०० ते ५.०० भेटण्याचा कार्यक्रम मात्र नियमितपणे सुरू होता.

या सुरुवातीच्या काळात पेठे सरांनी आमच्या सर्वांकडून काही व्यायाम करून घेतले. सर्वात आधी ओटीपोटाचा, म्हणजे दीर्घ श्वास घेऊन तो दीर्घपणे पोट आत घेऊन सोडण्याचा तसेच कपालभाती, प्राणायाम हे श्वसनाचे व्यायाम प्रकार करून घेतले. त्याचबरोबर एकाग्रतेसाठी ओळंब्याचा म्हणजेच सेट्रींगचा व्यायाम, हात पाय हलविण्याचा, सर्व शरीर मोकळे करण्याचा व्यायाम प्रकार शिकविण्यास सुरुवात केली. श्वासोच्छवासांबरोबर स्वर-व्यंजनाचे उच्चार योग्यरित्या करण्याचा व्यायामप्रकार आम्हाला शिकविण्यास सुरुवात केली. व्यायामाच्या जोडीला महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या चरित्राचेही वाचन होत होते. या सर्व गोष्टी आम्ही श्रद्धेनी करीत असलो तरी हे सगळं कशासाठी केलं जातंय, याचा काय उपयोग आहे हे मात्र आमच्यापैकी कोणालाही समजत नव्हतं. ज्योतिबा फुल्यांचं चरित्र वाचताना त्याकाळची परिस्थिती, त्याचे संदर्भ व ज्योतिबांनी केलेली क्रांती या गोष्टी अतुल सर आम्हाला समरस होऊन सांगत असत. या आमच्या प्रशिक्षणाला एक महिना होऊन गेला आहे हे आमच्या लक्षातही आले नाही. या काळात अतुल सरांचे अनेक मित्र आणि कला क्षेत्रातील मंडळी येत जात होती. एक दिवस ओंकार गोवर्धन या साधारण तिशीच्या टप्प्यातील तरुण अभिनेत्याला अतुल पेठे सर बरोबर घेऊन आले. आठ दहा वर्षांपूर्वी मी सुदर्शन रंगमंच येथे एक प्रायोगिक नाटक पाहायला गेलो होतो. त्यावेळी मी ओंकारला पाहिल्याचे मला आठवले आणि माझ्या लक्षात आले की याला सर घेऊन आले आहेत याचा अर्थ अतुल पेठे सर अभिनयासंबंधी काहीतरी घेणार असावेत आणि माझा अंदाज खरा ठरला.

**प्रशिक्षण मध्यंतर :**

दोन अडीच महिन्यांचा काळ लोटला होता. व्यायाम वाचनाचा नित्यक्रम अधिक नेटाने चालू होता. ओंकार गोवर्धन आणि पर्ण पेठे ही दोन व्यक्तिमत्त्व आमच्या कुटुंबात समरस होऊन गेली होती. अतुल पेठे सरांनी ज्योतिबांचं चरित्र वाचत असतानाच गो. पु. देशपांडे यांनी ज्योतिबांच्या चरित्रावर आधारित लिहिलेल्या

**जी अस्पृश्यता मेल्यावर रहात नाही, परमेश्वराच्या घरी जाताना आड येत नाही**
**ती आपण आपल्या समाजात वावरू देणे म्हणजे पाप करण्यासारखे आहे.**



'सत्यशोधक' या नाटकाची संहिता वाचून दाखविली. या नाटकाचे काही प्रयोग पंधरा वीस वर्षांपूर्वी झाले होते. अलिकडच्या काळात पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात नगर, सोनई, खर्डा अशा गावामध्ये ज्या घटना घडल्या त्या अस्वस्थ करणाऱ्या होत्या. ज्योतिबांनी त्या काळात शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रियांची अवस्था पाहिली होती. केवळ एक चळवळ उभी करून हे चित्र बदलणार नाही हे ओळखून त्यांनी दीन दलितांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला केला होता. त्याकरिता त्यांनी स्वत:च्या घरापासून सुरुवात केली. पत्नीला ....सावित्रीबाईंना शिकविले आणि पहिली महिला शिक्षिका म्हणून काम करायला प्रेरित केले. काळ बदलला आहे, परिस्थिती बदलली आहे तरी समाजातील उच्च नीच हे भेद संपलेले नाहीत हे वास्तव आहे. हे चित्र बदलायचे असेल तर त्यासाठी जे काम करायला हवे त्यासाठी हे सत्यशोधक हे नाटक प्रेरणा देईल अशा विचारातून पेठे सरांनी या नाटकाचे पुन्हा प्रयोग करण्याचा निर्णय केला.

आम्हाला घेऊन हे नाटक ते पुन्हा सादर करणार आहेत असं जेव्हा अतुल पेठे सरांनी सांगितलं तेव्हा मला मोठा धक्का बसला आणि त्यावेळी मला अतुल सर लगान सिनेमातील भुवन या पात्रासारखे वाटले. क्रिकेट खेळ कधीही न खेळलेल्या गावकऱ्यांना घेऊन या खेळात तरबेज असलेल्या इंग्रजांशी नुसता क्रिकेटचा सामना खेळायचा नाही तर या निमित्ताने गावावरील जुलुमाचा, अन्यायाचा नायनाट करण्याचा इरादा जेव्हा 'लगान' चित्रपटातील नायक भुवन बोलून दाखवितो तेव्हा गावकरी त्याला वेडा ठरवतात. जवळपास तशाच नजरेनी आम्ही अतुल पेठे सरांकडे पहात होतो. आम्हा सफाई कामगारांपैकी कुणीही नाटक काय असतं ? कसं असतं ? हे दुरूनही पाहिलेलं नव्हतं आणि इथे तर हा चमत्कारी बाबा आमच्याकडून हा चमत्कार घडवण्याचा निर्धार सांगत होता.

डोक्यात एकच काहूर माजलं होतं. नाटक ? तेही रंगभूमीवर सादर करायचे ? केवळ अशक्य. पुस्तक/संहिता वाचताना तारांबळ उडायची तर पाठ करून सादर करणे ही गोष्ट... छे शक्यच नाही... अगदीच पोरखेळ होईल. आमच्या आणि इतर कार्यकर्त्यांच्या अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया सरांपर्यंत पोहोचल्या होत्या पण ते ठाम होते. मग त्यांनी नाटकाची संहिता टाईप करून आणली. वाचता येणाऱ्यांकडून एकदा व वाचता न येणाऱ्यांना ऐकवून, पाठोपाठ तसे बोलायला लावून म्हणवून घेतली. संहिता जशी जशी वाचत गेलो तशी तशी त्या नाटकातील एकेक पात्र आमच्या डोळ्यांसमोर उभी राहू लागली. ज्योतिबा, त्यांचे वडील, सावित्रीबाई, त्यांचा भाऊ, शिव्याशाप देणारे आणि साथ देणारे ब्राह्मण, एकेक करीत सर्व चित्रपट डोळ्यासमोर उभा राहात होता. या सरावाच्या वेळी न भुतो न भविष्यती असा आलेले अनुभव म्हणजे ओम्कार आणि पर्णचा वाचिक अभिनय. सावित्रीबाईंची अंगावर शेण फेकले गेल्यानंतरची प्रतिक्रिया आणि त्यांना धीर देणारे ज्योतिबा हा प्रसंग कायम आमच्या अंगावर शहारे उभा करीत असे. या प्रकारच्या वाचन अनुभवाने आमच्या

**आभार प्रदर्शनास आमच्या वेदांत शास्त्रात आधार नाही.**

आधीच्या पिढ्या आणि त्यांनी सोसलेला अन्याय याचा विचार करून आम्ही अस्वस्थ होत होतो.

सरांनी आमच्याकडून करवून घेतलेले स्वर-व्यंजनाचे, ओमकार उच्चारणाचे, तोंडाचे विविध व्यायाम आणि त्याचवेळी एकाग्रता साधण्यासाठी करवून घेतलेले व्यायाम प्रकार याचा अर्थ आता आम्हाला उलगडायला लागला होता आणि या सगळ्याचा फायदा नकळत जाणवू लागला होता. या सर्वावर कळस गाठला तो सिंहगड येथे घेतलेल्या कार्यशाळेने. तापलेल्या लोखंडावर घाव घालावा तसं या तीन दिवसात सरांनी आमचं प्रशिक्षण घेतलं.

**सिंहगड येथील प्रशिक्षण :**

श्रमिक भवनात रोज सराव करूनही फार काही घडलं नाही तर तीन दिवसात सर काय तीर मारणार आहेत, जवळपास अशा मनस्थितीत सर्वजण प्रशिक्षणासाठी गेलो होतो. प्रशिक्षण शिबिराच्या पहिल्याच रात्री आमचा भ्रम दूर झाला. सरांनी प्रत्येकाला आपण कसे घडलो ? कलेशी दुरून दुरून का होईना संबंध आला होता का ? त्याचा अनुभव कसा होता आणि मुख्य म्हणजे सत्यशोधक नाटकाविषयी काय वाटलं ? अशा मुद्द्यांवर बोलायला सांगितले. तीन तास चाललेल्या या अनुभव सत्रात सर्वांचेच डोळे पाणावलेले होते. कारण प्रत्येकाच्या जीवनाच्या कथा आणि व्यथा तशाच होत्या. अगदी चित्रपट कथा लिहाव्या अशा या कथा होत्या. आत्तापर्यंत आम्ही समईमधील एका एका वातीप्रमाणे होतो पण या अनुभव सत्रानंतर आमच्या सर्वांच्या वाती एकत्र वळल्या जाऊन एकच ज्योत तयार झाली होती.

नाटक सादर करताना शरीराची हालचालही तेवढीच परिणाम करणारी असते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी राजू इनामदार यांनी आम्हाला शरीर रचना, प्रत्येक अवयवाचे काम अत्यंत सोप्या भाषेत पण इतक्या प्रभावीपणे सांगितले की आम्ही त्यांच्या प्रेमातच पडलो. राजू इनामदार हा माझ्या आयुष्यातील असा पहिला माणूस होता की ज्याच्या गाण्याने, बोलण्याने त्यांनी मला भुलायला लावलं. राजू इनामदारांनी आमच्याकडून शरीररचनेचा तक्ताही करून घेतला. पुढे प्रत्यक्ष नाटक सादर करताना आपल्या शरीरावर नियंत्रण ठेवण्यासाठी या सत्राचा आम्हाला खूप उपयोग झाला. या प्रशिक्षण शिबिरातील आश्चर्य म्हणजे चित्रवाचन सत्र. अतुल पेठे सरांनी वेगवेगळ्या चित्रकारांची पुस्तके आम्हाला दिली व त्या चित्रांमधून आम्हाला काय दिसले ? चित्र पाहून काय वाटलं हे तीन गटात बसून चर्चा करायला सांगितले. तब्बल तीन तास आम्ही चित्रवाचन चर्चेत रंगून गेलो होतो. जगावेगळी निरीक्षण आम्हाला या सत्रात बघायला आणि ऐकायला मिळाली.

दिलेल्या विषयानुसार गाणं तयार करायचे, त्यासाठी शब्द रचायचे, चाल लावायची आणि सर्वांना गाऊन दाखवायची असं एक सत्र झालं. या सत्रापूर्वी सरांनी केलेल्या विवेचनामुळे आम्हाला समजलं की गाण्यामध्येही कसा हेतुपुरस्सर पुरुषप्रधानता आणि भेदभाव केला जातो. आम्ही पण सरांनी सांगितलेले नियम पाळून जिद्दीने आणि तितक्याच ताकतीने गाणी तयार करून सादर केली.

प्रशिक्षणाचा शेवटचा दिवस महत्त्वाचा ठरला. कारणही तसंच होतं. अतुल पेठे सरांनी सगळ्यांना सिंहगड चढून वर जायला सांगितले होते. यापूर्वी मी १५-२० वेळा वर्धिनीच्या शाखेबरोबर सिंहगड चढलो होतो

**कोणी म्हणतात, इंग्रजी नोकरशाही व व्यापारी यांनी आगगाड्या, तारायंत्रे केली की नाही ?**
**होय केली. पण तो मढ्यावर शृंगार झाला !**

पण इथे आमच्या सोबत जे सहकारी होते त्यातील काहींची वयं ५५ च्या पुढे होती. मग कसं चढायचं ? काय करायचं ? चढणं कसं शक्य आहे? अनेक प्रश्न निर्माण झाले. सर म्हणाले चढून गेलात तर काहीही होणार नाही पण तुमची मर्जी, माझा आग्रह नाही. जमलं तर प्रयत्न करून बघा. हो नाही करीत जीपने वर जाऊ म्हणणारे, पहिल्यांदाच गड चढणारे, सगळेजण उशिरा का होईना गडावर पोहोचले. सिंहगड चढून जाण्याचा हा कार्यक्रम सुद्धा आमच्या नाटकाच्या होणाऱ्या संभाव्य तालिमीचाच एक भाग होता असं आता नाटकं सादर केल्यानंतर जाणवतंय. कारण आम्ही नुसता गड चढत नव्हतो तर एकमेकांना धीर देत, आधार देत आणि सावरत चढत होतो. अशा प्रसंगांतून नाटकासाठी लागणाऱ्या कापडाची वीण गुंफली जात आहे हे फक्त अतुल पेठे नामक वीणकर जाणून होता.

**कार्यशाळेचं मध्यंतर :**

आता कसोटी प्रत्यक्ष धावपट्टीवर खेळायची होती. वाचन झालं, पाठांतर झालं, कोड-कौतुक झालं पण आता खरी परीक्षा होती. पाठ केलेलं अभिनयासोबत उभं करणं. ही गोष्ट आमच्यासाठी अत्यंत कठीण आणि अवघड होती. (पण अशक्य नव्हती अर्थात पेठे सरांच्या शब्दात)

इथे विंगा असतात आणि इथे सेक्शन. प्रेक्षक इथून ते तिथपर्यंत असतात. रंगमंचावरचे नियमही खूप-प्रेक्षकांकडे पाठ नको, आऊटलुक द्यायचा नाही, मागे उलटं चालायचं नाही, एक ना दोन. अतुल सर आमचे कप्तान आणि आम्ही सगळे नवशिके, नव्या नावेतील नवखे प्रवासी. सर कधी कधी जाम चिडायचे, रागवायचे. पण मग प्राणायाम, ओटीपोटाने श्वासोच्छवास आणि मग सगळं शांत शांत. नव्या नवरीसारखी आमची अवस्था. आधी साडी सावरु पदर सावरु की पाया पडू ? असे प्रश्न जसे तिला छळत असतील त्याहीपेक्षा आमची स्थिती अधिक भयानक होती आणि यामध्ये इतके विनोद घडत की दिवसभर आम्ही हसत राहायचो.

एव्हाना सरांना आमच्या प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा थोडासा अंदाज आला होता. काय बोललं की यांना समजतं याचा त्यांना नेमका अंदाज आला होता. उदा. मी स्वत: संदीपला थोडा सूर दिला की तो बरोबर गातो, भीमराव - थोडासा क्ल्यू दिला की बरोबर वाजवतात असे अनेक फंडे. आमची मात्र पुरती धांदल उडत होती. आमच्याकडून हे सर्व करून घेत असताना सर अनेकदा स्वत:शीच बोलायचे. 'असंय का ? मी करतो... एक आयडियाच करतो... मी जादुगार आहे... जमेल नक्की जमेल.' सरांचा असा स्वत:शीच चाललेला संवाद पाहून मला 'सही रे सही' नाटकातील भरत जाधव हे कॅरेक्टर आठवायचं पण ही सुद्धा सरांची एक सायकॉलॉजिकल ट्रीटमेंट होती असं आता वाटतंय.

विनोद, राग, चिडचिड, निघून जाणं, मध्येच सरांनी अपसेट होणं अशा सगळ्या प्रक्रियेतून एकेक प्रसंग उभा राहिला. आमच्या नाटकाचा घडा हळूहळू आकार घेत होता. पोटाला हात लावून मुलाच्या जन्माची चाहुल घ्यावी तशी नाटकातील पात्रांच्या अभिनयाच्या रूपानं आम्ही नाटकाची चाहुल घेत होतो. दत्ता-गो-हे, भिसेबाई-भागी, पारसे-रामोशी सगळे वेगवेगळ्या रूपात प्रकटत होते. याच दरम्यान आम्ही सुदर्शन रंगमंच

**मृत्यू जरी मजकडे आला तरी मी त्याला माझे काम संपेतोपर्यंत बाहेर जाण्यास सांगेन.**

येथे जाऊन एक चित्रप्रदर्शन पाहिले आणि चित्रकारांशी गप्पाही मारल्या. याच रंगमंचावर आमच्या नाटकाची पहिली रंगीत तालीम नाही तर आमची सत्वपरीक्षाच झाली अर्थात या अग्निदिव्यातून आम्ही सही सलामत पार झालो. याचेही कारण अर्थातच आमच्या सर्वांमध्ये संचारलेलं अतुल नावाचं ऊर्जेचं वारं !

**शेवटाचा प्रवास आणि पूर्णत्त्वाचा आभास :**


सुदर्शन रंगमंच इथे आम्ही केलेले सादरीकरण हा आम्हाला सर्वांसाठी एक धक्काही होता आणि त्यामुळे आमचा आत्मविश्वासही वाढला. चार महिन्यांपूर्वीचे आम्ही आणि आज... फरक जाणवत होता... आभाळ जमिनीला टेकल्याचा थोडा प्रत्यय येत होता. अशा टप्प्यावरच शुभारंभाच्या प्रयोगाची तारीख ठरली. ८ जानेवारी २०१२ आणि स्थान भरत नाट्यमंदिर. तोपर्यंतचा प्रवास हा विलक्षणच होता. भरत नाट्यमंदिरातच रंगीत तालमी ठरल्या. कोणत्या दिवशी किती प्रयोग याचे वेळापत्रक तयार होऊ लागले. अतुल सर एकाच वेळी अनेक आघाड्यांवर कसे काम करत आहेत हे पाहून डोकं चक्रावून गेलं. भरत नाट्यमंदिरातच रंगीत तालिम केल्याचा फायदा शुभारंभाच्या प्रयोगात झाला.

आता आम्हा सर्वांसमोर लक्ष्य होतं शुभारंभाच्या प्रयोगाचं. ८ जानेवारी २०१२, सकाळी १०.००. इतरांसाठी हा अन्य नाटकांसारखाच एक प्रयोग पण आमच्या सर्वांच्या दृष्टीने मात्र आमच्या आजवरच्या आयुष्याला कलाटणी देणारा क्षण होता. आमच्या आयुष्याला आणि क्षमतांना आव्हान देणारा असा तो क्षण होता. लगीन घरापेक्षाही जास्त धावपळ चालू होती, कपड्यांची मापं, संवाद पाठांतर, योग्य पद्धतीनं आणि ठरवून दिलेल्या चौकटीत गाणी म्हणणं, हार्मोनियम केव्हा सुरू केव्हा बंद, एन्ट्री-एक्झीटचा सराव. छोट्या छोट्या गोष्टीकडेही सर लक्ष देत होते. या धावपळीत मानसिक आणि शारीरिक आरोग्य नीट राहावे यासाठी प्राणायाम, कपालभाती आणि अन्य व्यायाम न चुकता चालू होता. यामुळेच भरत नाट्य मंदिर येथे ३ दिवस तीन सेशन मध्ये ३-३ प्रयोग दिवसाला करू शकलो. सरावाचे हे ९ प्रयोग खरोखरीच आमची अग्नीपरीक्षा पाहणारे होते. प्रत्येक प्रयोगात ज्या चुका होत होत्या त्या सर टिपत होते आणि पुढच्या प्रयोगात त्या टाळल्या जातील याकडे लक्ष देत होते. कलाकारांची वयं वर्षे चार ते साठ या सर्वांची सर्व शक्ती पणाला लागत होती. नाटक करणं किती कसोटी पाहणारं असतं हे मी अनुभवत होतो.

**शुभारंभाचा प्रयोग :**

अखेर तो दिवस उजाडला. सर्वजण धावतपळत भरत नाट्यमंदिरात पोहोचले. रांगोळी, हार-फुलांच्या माळांनी वातावरण मंगलमय झालं होतं, चहा, नाश्ता झाला. प्रयोगाच्या आधीची तयारी सुरू झाली. प्रयोग सुरू होण्याआधीचा एकच तास राहिला होता. उत्सुकता आणि थोडेसे दडपण अशी संमिश्र मनस्थिती. डोकं नुसतं सैरभैर झालं होतं. सर्व काही नीट होईल ना, एन्ट्री नीट होईल ना ? गाणं नीट जमेल ना ? नेपथ्य, पार्श्वसंगीत, नाटकाच्या सर्व पूर्वतयारीवर हात फिरवत, आणि त्याच वेळी प्राणायाम, ओटीपोटाचा व्यायाम करवून घेत कप्तान अतुल पेठे सर सर्वांचा आत्मविश्वास वाढवत होते. प्रयोगाच्या अर्धा तास आधी सर्व तयारी पूर्ण झाली होती. हुरहुर वाढायला लागली. प्रयोगाच्या आधी दहा मिनिटे सरांच्या शिस्तीनुसार चहा

**परमेश्वराने मला साक्षात मोक्ष देतो म्हणून म्हटले तरी मी झिडकारून म्हणेन की प्रथम पारतंत्र्यातून सुटलेला माझा देश मला पहावयाचा आहे.**



आला, कॅडबरीचा एकेक तुकडा प्रत्येकाला मिळाला. १० वा. १० मिनिटांनी आयुक्त आले, पाठोपाठ डॉ. श्रीराम लागू आले. अतुल पेठे सरांचं आणि आयुक्तांचं मनोगत झालं आणि प्रयोगाचा तो क्षण आला. ढोलकीची पहिली थाप पडली, तोड झाली आणि पडदा वर गेला... जय स्वतंत्रते, जय समते... पडदा वर जाताच प्रेक्षागृहातून टाळ्यांचा कडकडाट झाला आणि अर्धा गड आपण चढलो आहोत असंच सगळ्यांना वाटलं आणि मग काय प्रत्येक सेकंद, प्रत्येक मिनिट आम्हा प्रत्येकासाठी खिंड लढवणाऱ्या बाजीप्रभूंसारखा होता. नाटकातील एकेक प्रसंग रंगत गेले आणि आमच्या नाटकाचा सुवर्णक्षण ठरणारा प्रसंग आला. माझ्या मुलीला... श्रेयाला... पोत्यात बसवून घेऊन जाण्याचा प्रसंग. मी, माझी बायको दोघंही डोक्यावर ओझं घेऊन हा प्रसंग पहात होतो. श्रेया पोत्यात बसली, रंगमंचावर गेली, पोत्यातून तिला काढलं आणि प्रेक्षागृहातून टाळ्याचा कडकडाट सुरू झाला. कडकडाट थांबता थांबेना. माझ्या देखत माझी चार वर्षांची मुलगी रंगमंचावर प्रसंग सादर करतानाचे दृश्य पाहताना आनंदाने अंगावर रोमांच उभे राहिले, आनंदाश्रुंनी डोळे भरून आले. टाळ्या आणि शिट्यांनी रंगमंदिर दुमदुमुन गेलं. कुणी पाहील अशा भीतीने एक रामोशी आपल्या मुलीला पोत्यात घालून सावित्रीबाईंकडे घेऊन येतो असा हा प्रसंग. पण या प्रसंगाने उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले. पाहता पाहता प्रयोग पूर्ण झाला. प्रयोग संपला तरी प्रेक्षक जागेवरून उठेचनात. आम्ही सगळेच बुचकळ्यात. अचानक सर्वजणांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला आणि आमच्या आनंदाला पारावार राहिला नाही. प्रयोगाला मिळालेली ही पावती पाहणारे आमचे कप्तान मात्र स्थितप्रज्ञपणे पहात होते. हा ही धक्का आम्हाला बरंच काही सांगून गेला.

**'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाचा आणि सहवासाचा झालेला उपयोग :**

नाटक करेपर्यंत माझ्या मनात कधीच माझ्या जातीचा किंवा भेदभावाचा विचार चुकूनही आला नव्हता. हे कसं घडलं असावं याचा विचार करताना जाणवतं की 'स्व'-रूपवर्धिनीतील संस्कारांचा हा परिणाम आहे. वर्धिनीमध्ये असलेलं वातावरण, विद्यार्थ्यांना, कार्यकर्त्यांना दिली जाणारी वागणूक यामुळेच हे घडू शकलं. मी ही शाखेचं काम केलं आहे, शाखेची जबाबदारी सांभाळली आहे. हे काम करताना चुकूनही समोरचा विद्यार्थी/कार्यकर्ता हा कुठल्या जातीचा आहे किंवा वर्गाचा आहे याचा विचार मनात कधी आला नाही. झोकून देऊन काम करणं अशा वातावरणामुळेच हे शक्य झालं. माझ्या कारकिर्दीतील अनेक विद्यार्थी आज वैयक्तिक जीवनात यशस्वी होतानाच वेगवेगळ्या सामाजिक जबाबदाऱ्याही पेलताना दिसत आहेत आणि याचा खूप आनंद वाटतो. हे यश कशातही मोजता न येणारं आहे. वर्धिनीचे काम करताना नकळतच नवीन कामांची आव्हानं स्वीकारण्याची आणि ती यशस्वीपणे पेलण्याची शक्ती मिळते. विचारात सकारात्मकता

**लहानपणी मनास व शरीरास स्वच्छंद खेळू दिल्याने पुढील उत्कर्षास लागणारा मानसिक व शारीरिक कंटकपणा प्राप्त होतो**

## आणि नटसम्राटाचा आशिर्वाद मिळाला...

प्रेक्षकामध्ये बसलेले ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू प्रयोग संपताच रंगमंचावर आले आणि माझ्या मुलीला शोधू लागले. त्यांचे डोळे डबडबलेले होते. माझी मुलगी दिसताच त्यांनी तिला कडेवर घेतले. आजोबाच्या मायेने तिला कुरवाळलं. तिचे पटापट पापे घेतले आणि प्रेक्षकांकडे पहात म्हणाले, मित्रांनो नाटक काय असतं हे आज मला कळालं. हे क्षण प्रत्यक्ष टिपण्याचं भाग्य मला आणि पत्नीला मिळालं. माझं आभाळ माझ्या मिठीतून बाहेर डोकावत होतं. अभिमानानं ऊर भरून आला. एका नटसम्राटाने रंगमंचावर येऊन माझ्या मुलीला आशीर्वाद दिले होते.

## लहानग्या श्रेयाने दाखविलेला संयम आणि समजुतदारपणा

उन्हाळ्याचे दिवस होते. बीडला प्रयोग ठरला होता. नेमकं त्याच सुमारास श्रेयाच्या अंगावर फोड आले होते. सरांनी काही औषधे सांगितली होती. ती बरोबर घेतली होती. हे फोड म्हणजे कांजिण्याच आहेत हे बीडला गेल्यावर समजले. आता प्रयोगाचे काय होईल हे दडपण मनावर होतं. पावडर लावली, औषधे दिली. पंख्याखाली घेऊन बसलो पण अंगाची आग मात्र कमी होत नव्हती. डोळ्यावर झोप होती पण शरीर झोपू देत नव्हतं. दुसऱ्या दिवशी प्रयोग होता. एवढ्यात एक डॉक्टर आले. त्यांनी काही औषधे आणायला सांगितली. ती औषधे दिल्यावर मात्र शरीराची लाही लाही थोडी कमी झाली आणि तिला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी प्रयोगाची जशी जशी वेळ जवळ येत होती तशी तशी आमची धडधड वाढत होती. कांजिण्या असताना पोत्यात बसून श्रेया कशी जाईल ? तिला त्रास नाही ना होणार ? अनेक प्रश्न घोंगावू लागले. पण जेव्हा तिच्या प्रसंगाची वेळ आली तर काहीही तक्रार न करता श्रेया पोत्यात बसली आणि रंगमंचावर अवतीर्ण झाली. प्रेक्षागृहातून टाळ्यांचा कडकडाट.

प्रयोग संपल्यावर सर्वांनी तिचं तोंडभरून कौतुक केलं. एवढ्याशा वयात एवढं शहाणपण कुठून आलं ? अशी मुलगी मला मिळाली ही केवळ त्या विधात्याची आणि माझ्या पूर्वजन्मातील पुण्याईची कृपा असावी असं मला वाटतं. जेव्हा जेव्हा नाटकाचा प्रयोग होतो तेव्हा तेव्हा मला हा प्रसंग आठवतो आणि डोळे पाणावल्याखेरीज राहात नाहीत.

**योग्य बंधने कायम ठेवून ती पाळणे व अयोग्य उघडपणे सोडून देणे यातच खऱ्या सुधारणेचे बीज आहे.**

येते. नऊ वर्षे महानगरपालिकेत काम करताना अनेक सहकारी कर्मचाऱ्यांची 'हे काम नको', 'ही जबाबदारी नको' अशा नकारघंटा ऐकायला मिळाल्या. वर्धिनीच्या संस्कारांमुळे मी मात्र नवनवीन कामांना हात घातला आणि ती कामे यशस्वीही करून दाखविली. या नाटकातील सहभागामुळे आणि विशेषत: अतुल पेठे सरांच्या सहवासामुळे माझा आत्मविश्वासही दुणावला आहे. वर्धिनीच्या कामाचं मोल ते काम करीत असताना जितकं जाणवत नाही तितकं ते प्रकर्षाने व्यक्तिगत जीवनात जाणवतं. त्यामुळेच असं वाटतं की अधिकाधिक लोकांनी/मुलांनी या कामात सहभागी व्हायला हवं आणि अधिकाधिक योगदान द्यायला हवं. आपल्या देशाच्या उन्नतीसाठी 'विकसित व्हावे, अर्पित होऊन जावे' हे ध्येय वर्धिनीने आपल्यासमोर ठेवले आहे, तसं घडवलं आहे. सत्यशोधक नाटकाच्या या प्रवासात म्हणूनच मी समरस होऊन काम करू शकलो.

**व्यक्तिगत आणि कौटुंबिक जीवनावर नाटकाचा झालेला परिणाम :**

या नाटकानं माझ्या व्यक्तिगत आणि कौटुंबिक जीवनात विस्मयकारक बदल घडवला आहे. आजपर्यंत एक झाडूवाला (पण ऑफिसमध्ये काम करणारा), युनियनचा कार्यकर्ता आणि संगणकाशी खेळणारा एक कर्मचारी एवढीच माझी ओळख होती. याच पार्श्वभूमीवर माझ्या कुटुंबाची ओळख होती. या नाटकाने मात्र एक सूत्रधार, एक कलाकार, गायक आणि अत्यंत आगळं-वेगळं व्यक्तिमत्त्व अशी माझी ओळख लोकांच्या मनात तयार झालेली मी अनुभवतो आहे. जे कार्यकर्ते/सहकारी होते त्यांच्या लेखी मी एक सुशिक्षित तरुण होतो तर वरिष्ठांच्या नजरेत एक सांगकाम्या. आज मात्र दोन्ही ठिकाणी हे स्थान उंचावलं आहे आणि हे या नाटकामुळेच घडलं. माझे मित्र, त्यांचे परिवार ज्यांनी ज्यांनी हे नाटक पाहिलं त्यांच्या नजरेतही बदल झाला आहे ही गोष्ट माझ्या नजरेतून सुटली नाही. आम्ही ज्या खोलीत भाड्याने राहतो त्या मालकीणबाईसुद्धा आता नकळत माझ्याशी, कुटुंबाशी आदरानं वागू लागल्या आहेत. पेपरमधील लेख, बातम्या, चॅनेल्सवर मुलाखती या गोष्टी सवयीच्या झाल्या आहेत. माझी बायको अमृता कधीही रंगमंचावर गेलेली नव्हती. आता मात्र सरावलेल्या कलाकारासारखा तिचा रंगमंचावर वावर असतो. ज्योतिबा आणि सावित्री यांची कथा आम्ही दोघं आमच्या कुटुंबात प्रत्यक्षात अनुभवत होतो. माझं शिक्षण एम.ए.पर्यंत झालेलं तर अमृता सातवी उत्तीर्ण. आज मात्र अमृता ज्योतिबांच्या चरित्रावर अर्धा अर्धा तास बोलू शकते. नाटक हे माझ्यासाठी एक निमित्त झालं पण जे मी आयुष्यभरात शिकवू शकलो नसतो अशा अनेक गोष्टी अमृता या नाटकामुळे शिकली. माझ्या मुलीला श्रेयाला भविष्यात काय मिळेल माहीत नाही पण वयाच्या पाच वर्षातच तिने जे मिळवलं आहे ते कुणीही तिच्याकडून हिरावून घेऊ शकणार नाही.

सांगण्यासारखं खूप असलं तरी आता थांबतो. १०० टक्के परिपूर्ण असा सत्यशोधकचा प्रयोग अजून व्हायचा आहे. याची जाणीव आमचा कोलंबस आम्हाला सातत्याने करून देत असतो. मी आणि आम्ही सर्व कलाकार त्याची वाट पाहतोय. अपूर्णतेच्या अस्वस्थ मनस्थितीत पूर्णत्वाच्या ध्यासाने प्रेरित करणारा कोलंबस आम्हाला सतत खुणावतोय.

- (मो. : ७७२००४५२७३, ९९२२२४८७८३)

**आपल्या राष्ट्राचा विचार करा; कामास लागा. नुसत्या आहार-विहारासाठी मानव जन्म नाही.**

## ꧁ केंद्रीय वृत्त ꧂

**शाखा विभाग - मकर संक्रमण उत्सव २०१४ :**




वर्धिनीच्या शाखा विभागाचा संक्रांत उत्सव रविवार दि. १९ जानेवारीला शनिवारवाड्याच्या प्रांगणात संपन्न झाला. के.पी.आय.टी.कमिन्सचे कार्याध्यक्ष श्री. रवि पंडित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पोलिस उपायुक्त (वाहतूक शाखा) श्री. विश्वास पांढरे कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून लाभले होते. शनिवारवाड्याचे प्रांगण पालक, हितचिंक, देणगीदार आणि सामान्य नागरिकांनी फुलून गेले होते.

श्री. सुमित डोळे यांनी आपल्या प्रास्ताविकातून वर्धिनीच्या कार्याचा आजूबाजूला घडणाऱ्या घटनांशी तौलनिक आढावा घेतला. वर्धिनीच्या कार्याचा विस्तार हा सद्यस्थितीत अत्यंत आवश्यक असून त्या दृष्टीने कार्यकर्ता निर्माण प्रक्रिया अधिक दृढ करण्यावर वर्धिनीचा भर राहील असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रवि पंडित यांनी आपल्या भाषणात वर्धिनीच्या कार्याचे सार उलगडून दाखविले. भावी काळाची आव्हाने पेलणारे स्वच्छ हाताचे, समर्थ खांद्याचे असे कार्यकर्ते वर्धिनीत घडत रहावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. वर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन सर यांना कशा प्रकारचे कार्यवर्धन अपेक्षित असावे हे नेमक्या शब्दात श्री. पंडित यांनी मांडले. विशेष अतिथी श्री. पांढरे साहेब यांनी प्रतिकूलतेतून झालेली स्वत:ची जडणघडण मांडताना ‘कोशिश करनेवालों की हार नही होती’ हा मूलमंत्र सर्वांना सांगितला.

या कार्यक्रमात ‘परिवर्तन’ या संकल्पनेवर आधारित महानाट्याचे सादरीकरण वर्धिनीच्या ५०० वर्धक-वर्धिकांनी अत्यंत प्रभावीपणे करून उपस्थितांना एका अनोख्या सेवाविश्वाचे दर्शन घडवले. भटक्या-विमुक्तांच्या उत्थानासाठीचे डॉ. भीमराव गस्ती व श्री. गिरीषजी प्रभुणे यांचे कार्य. छत्तीसगडमधील हजारो महिलांना संघटित करणाऱ्या ‘मुष्टी धान्य योजने’च्या देशातील आद्य प्रवर्तक श्रीमती फुलबसन यादव, घंटागाडी सारख्या योजनेतून स्वच्छ शहरांचे स्वप्न सत्यात उतरविणारे लातूरच्या जनाधार संस्थेचे संजय कांबळे, वाट चुकलेल्या फूटपाथवरील मुलांना प्रेम लावून त्यांना स्वगृही पाठविणारे मुंबईच्या समतोल फाऊंडेशनचे श्री. विजय जाधव आणि प्रभावी ग्रामविकसनाद्वारे जगभरातील सुधारकांचे लक्ष वेधणारे हिवरे बाजारचे श्री. पोपटराव पवार या सर्वांच्या कार्याचा

**लोकांमधील फूट, अज्ञान, नामर्दपणा आणि परस्परांबद्दल मत्सर हे हिंदुस्थानातील बलाढ्य इंग्रजी राज्याचे प्रमुख आधारस्तंभ होत.**

परिचय चित्ताकर्षक प्रसंग, नृत्य, गीते यांच्या माध्यमातून मंचावर साकार झाला. आपल्या क्षेत्रामध्ये अपार कष्ट, उपेक्षा सोसून या सर्वांनी यशस्वी केलेल्या कार्याच्या भावस्पर्शी नाट्यदर्शनामुळे आपलेही समाजाप्रति असलेले कर्तव्य आपण निष्ठेने पार पाडले पाहिजे याची जाणीव उपस्थितांमध्ये संक्रमित करण्यात निश्चितच यश आले.

**शुभेच्छा समारंभ :**

१५ फेब्रुवारीला १० वी, १२ वीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ वर्धिनीत घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून गरवारे महाविद्यालयातील जैवविविधता विभागाचे विभागप्रमुख डॉ. अंकुर पटवर्धन हे उपस्थित होते. या प्रसंगी वेगवेगळ्या शास्त्रज्ञांच्या शालेय जीवनातील प्रसंग त्यांनी सांगितले. परीक्षेच्या काळात कुठल्याही तणावाखाली न राहता उत्तरपत्रिका लिहिण्याचा सल्ला त्यांनी दिला. यश-अपयश हे गुणांवर नसून अभ्यासू वृत्तीवर असते असे त्यांनी सांगितले.

**वर्षारंभ उपासना : नववर्षाची चैतन्यमय सुरुवात :**

सोमवार, दि. ३१ मार्चला गुढीपाडव्यानिमित्त वर्षारंभ उपासनेने वर्धिनीच्या नववर्षाची सुरुवात होते. ओंकारेश्वर मंदिराच्या मंगलमय ध्यानगृहात गायत्री मंत्राचे स्वर वातावरणात आणि अंत:करणात नवचेतना निर्माण करून जातात. भल्या पहाटे स्नान करून पुणे शहरातील वर्धिनीच्या सर्व शाखांवरून सुमारे २५० युवक-युवती कार्यकर्ते गणवेशात कार्यक्रमास उपस्थित होते. निगडी प्राधिकरण येथे ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याची उभारणी करणारे मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे कार्यवाह मा. वामनराव अभ्यंकर तथा भाऊ यांचे विचारप्रवण करणारे मार्गदर्शन या प्रसंगी सर्वांस लाभले.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर :**

रक्तदात्यांच्या सोयीसाठी गतवर्षीप्रमाणे यंदाही वर्धिनीच्या वास्तूत मध्यवर्ती रक्तदान शिबीर न घेता ते शहरात विविध पाच ठिकाणी व्हावे असे नियोजन केले गेले. त्याप्रमाणे १३ व १४ एप्रिल या दोन दिवसात अप्पर इंदिरानगर, गोखलेनगर, कर्वेनगर, गंज पेठ व 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू या पाच ठिकाणी मिळून एकूण २०९ रक्तदात्यांनी यात भाग घेतला.



तरुण नवरक्तदात्यांचे प्रमाण सुमारे ५० टक्क्यापेक्षा जास्त होते. जनकल्याण रक्तपेढीचे उत्तम सहकार्य लाभले. या शिबिराच्या संयोजनाची जबाबदारी श्री. सिद्राम शासम यांनी यशस्वीरीत्या सांभाळली.

**इंग्रजी राज्य पद्धत कितीही सुयंत्रित असली तरी त्यामुळे आम्ही उत्तरोत्तर हतवीर्य होत जाऊन कंगाल बनत चाललो आहोत.**

## भाग १ व भाग ४ : गुणगौरव व स्वतंत्रता दिवस कार्यक्रम २०१४

भावे माध्यमिक विद्यालयामध्ये भाग १ व भाग ४ चा गुणगौरव पार पडला. एकूण ५ शाखांचा हा कार्यक्रम होता. समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी श्रद्धानंद शाखा, स्वामी योगानंद शाखा, स्वामी विवेकानंद शाखा आणि स्वामी अभेदानंद शाखा. ५ शाखांचे मिळून एकूण १८० वर्धक आणि युवक कार्यक्रमास उपस्थित होते. राष्ट्रगीत आणि ध्वजवंदन झाले. डॉ. विनेश नगरे, श्री. संदीप मोरे, श्री. मयुर कर्जतकर यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेत ''मेरा मुल्क, मेरा देश'', ''आरंभ है प्रचंड'' अशा समूहगीतांचे सादरीकरण झाले.

श्री. अरविंद केळकर सरांनी वर्धकांशी संवाद साधला. संवाद साधताना त्यांनी वर्धिनीचे ध्येय, वर्धिनीची उद्दिष्टे आणि भविष्यातील समाजाचे बदलते स्वरुप आणि वर्धिनीची भूमिका या मुद्द्यांवर विवेचन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला समूहगीत स्पर्धेची विजेती शाखा म्हणजे स्वामी विवेकानंद शाखेने ''मेरा मुल्क, मेरा देश, मेरा ये वतन'' या गीताचे सादरीकरण केले. भाग १ आणि भाग ४ मधील मिळून एकूण ६१ वर्धक व युवकांना बक्षीस होते. गुणगौरवाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर प्रमुख वक्ते श्री. अशोक कसब (प्रॉडक्शन मॅनेजर, टाटा मोटर्स) यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. अभ्यास कसा करावा, आपले ध्येय हे अवघडच असावे, आपल्या मनात जिद्द असली पाहिजे, जीवनात कितीही संकटे आली तरी अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी आपण प्रयत्नशील असावे इ. मुद्द्यांवर त्यांनी अतिशय सोप्या शब्दांत, उदाहरणादाखल स्पष्टीकरण दिले. प्रतिवर्षीप्रमाणे काका हलवाई स्वीट सेंटर, टिळक रोड, पुणेचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी पेढ्यांच्या रूपाने देणगी देऊन उपस्थितांचे तोंड गोड केले. याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

❖ ❖ ❖

## अभिनंदन

❖ सूर्योदय मित्र मंडळ आयोजित स्पर्धांमध्ये **भगिनी निवेदिता शाखेतील** वर्धिकांना बक्षीसे मिळाली :

१) कु. सुफिया शेख - ५ वी - वक्तृत्व स्पर्धा (द्वितीय क्रमांक)
२) कु. श्रुतिका मोहिते - ५ वी - चित्रकला स्पर्धा (उत्तेजनार्थ)
३) कु. पायल जिरेसाळ - ७ वी - वकृत्व स्पर्धा (उत्तेजनार्थ)
४) कु. शगुफ्ता शेख - ८ वी - वक्तृत्व स्पर्धा (द्वितीय क्रमांक)



❖ **राजर्षी शाहू शाखेतील** कु. तन्मय बोऱ्हाडेने इयत्ता ६ वी मध्ये सहामाही परीक्षेमध्ये ५०% गुण मिळविले होते. नंतर वार्षिक परीक्षेमध्ये ७०% गुण मिळविले. कारण पहिले सहा महिने शिकवणी वर्ग लावला होता. नंतर शाखेत दररोज आल्यामुळे व शाखेतील पूर्ण वेळ अभ्यासिकेमुळे व शाखेतील तासिकेमुळे तन्मयने सहा महिन्यात गुणांमध्ये वाढ झाली. तन्मयच्या पालकांनी तन्मयचा शिकवणीवर्ग बंद केला आहे. पालकांना विश्वास वाटतो आहे की शाखेच्या वातावरणात तन्मय यापुढे अशीच प्रगती करेल.

**निस्सीम तपोबलाचे महत्त्व व वैराग्याची योग्यता आधुनिक इंग्रजी शिक्षणामुळे आम्हास चांगली कळेनाशी झाली आहे.**

# उन्हाळी शिबिरे - २०१४

## मोठा गट शिबीर (इ. ८ वी ते १० वी)

विषय - वाचनाचे महत्त्व कालावधी - दि. २ मे ते ६ मे २०१४

स्थान - नवीन मराठी शाळा संख्या - १५५

टीव्ही-मोबाईलच्या सुळसुळाटामुळे वाचन संस्कृतीला घरघर लागली आहे असे नुसते नकाराश्रू ढाळत बसण्यात अर्थ नाही. काहीतरी धडपड केली पाहिजे. वाचनातून व्यक्तिमत्त्वाला प्रगल्भता येते. अनेकविध विषयांचे ज्ञान होते. ज्ञानसंपादनाची तृष्णा वाचनातूनच निर्माण होते.

साहित्य विश्वाची सफर वर्धकांना घडवून आणावी म्हणूनच या विशेष वाचन शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराच्या शुभारंभ प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी आपल्या बालपणीच्या प्रसंग कथनातून मुलांना भारावून टाकले. अत्यंत प्रतिकूलतेतून वाट काढणारा एका शेतमजूराचा मुलगा आज साहित्यिक क्षेत्रात केवढे मोठे स्थान निर्माण करतो याचा प्रत्यक्ष वस्तुपाठच डॉ. आनंद यादव यांच्या रूपाने वर्धकांसमोर उभा राहिला.

शिबिरातील मान्यवर लेखक आणि कवींच्या मार्गदर्शनाने सर्वांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत झाली. शिबिरातील कवीसंमेलनात वर्धकांपैकीच काही नवकवींनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन टाळ्या मिळवल्या. पुस्तकांचा खजिना शोध खूपच रंजक ठरला.

वर्धकांच्या गटाने दुपारच्या वेळेत विविध प्रकाशन संस्थांना भेटी देऊन पुस्तकांची जन्मकथा समजावून घेतली. या शिबिरात वाचन विकासासंदर्भात सर्वश्री मंगेश कश्यप, दत्ता टोळ, संजय तांबट, प्रकाश पारखी, डॉ. प्रदीप आगाशे, शिरीष आपटे व सौ. शैलजा देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. सौ. संगीता बर्वे व सौ. अश्लेषा महाजन यांनी एकाहून एक सरस कविता प्रभावीपणे सादर करून वर्धकांच्याही कवित्वाला प्रोत्साहित केले. श्री. दत्ता टोळ यांनी 'मी अत्रे बोलतोय' या अत्यंत प्रभावी एकपात्री सादरीकरणातून आचार्य अत्र्यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले. शिबिरातील एका गटाने 'पुणे मराठी ग्रंथालया'स भेट देऊन तेथील ग्रंथालय चळवळीची सविस्तर माहिती घेतली. अन्य गटांनी साधना, संस्कृती, मनोविकास, भारतीय विचार साधना या प्रकाशन संस्थांना भेट देऊन प्रकाशन प्रक्रियेची माहिती घेतली. शिबिराच्या समारोप सत्रात सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. द. मा. मिरासदार यांनी वाचलेलं लक्षात ठेवण्यासाठी एकाग्रता वृद्धिंगत करण्याचे वर्धकांना आवाहन केले. मिरासदारी शैलीतील 'भानाचं भूत' या बहारदार कथाकथनाद्वारे शिबिराची सांगता झाली.

**कोणत्याही लोकांचा अगर राष्ट्राचा परक्या लोकांनी लिहिलेला इतिहास कधीही विश्वसनीय अथवा समाधानकारक असत नाही**

## शाखा विभाग : लहान गट शिबिर (इ. ५ वी ते ७ वी)

विषय : थोरांचे बालपण कालावधी : दि. ६ मे ते १० मे २०१४

स्थान : नवीन मराठी शाळा संख्या : २५०

थोरामोठ्यांच्या बालपणाविषयीचे आकर्षण सगळ्यांनाच असते. ही माणसे जन्मत:च अद्‌भुत असतात का ? त्या काळातील प्रतिकूलता, घरातील संस्कार, संगत या साऱ्यांचा त्यांच्या बालपणावर कसा परिणाम झाला असेल हे सर्व रंजक कथांच्या माध्यमांतून लहान गटाच्या शिबिरात मांडण्यात आले. या शिबिरात खालील सत्रांची मांडणी करण्यात आली -

| विषय | व्याख्याते | विषय | व्याख्याते |
|---|---|---|---|
| डॉ. आंबेडकरांचे बालपण | श्री. शशिकांत ठोंबरे | जागतिक कीर्तीच्या थोर व्यक्तींचे बालपण | डॉ. गणेश राऊत |
| स्वा. सावरकरांचे बालपण | श्री. मोहन शेटे | डॉ. हेडगेवार यांचे बालपण | श्री. अमोल गायकवाड |
| क्रांतिकारकांचे बालपण | श्री. मंदार परळीकर | समृद्ध बालपण | श्री. रामभाऊ डिंबळे |
| शिवरायांचे बालपण | सौ. मोटे पाटील | बालपण एक साधना | श्री. मिलिंद खाडे |

शिबिराच्या शुभारंभ सत्रामध्ये मुलांशी संवाद साधताना न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक श्री. एकनाथ बुरसे सर यांनी आपल्या भीमाशंकरच्या वनक्षेत्रातील बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. अब्राहम लिंकन यांच्या बालपणीची हृदयस्पर्शी कथा त्यांनी सांगितली. 'बालपण हे खूप खेळण्यासाठी, नवनवीन शिकण्यासाठी आणि भरपूर आनंद मिळवण्यासाठी ईश्वराने दिलेली देणगी आहे' असे त्यांनी सांगितले. दुपारच्या कला सत्रांमध्ये खालील मान्यवरांनी वर्धकांना प्रशिक्षण दिले.

| विषय | प्रशिक्षक | विषय | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| चित्रकला | श्री. मंगेश गोळे | हस्तकला | श्री. जयंत टोले |
| संगीत | श्री. अजय पराड<br>श्रीमती काणे | अभिनय | श्री. अन्वय बेंद्रे, श्री. सातपुते<br>श्री. संदीप मोरे |

श्री. ज्ञानेश पुरंदरे यांच्या भाषणाने समारोप झाला. 'अनेक प्रकारच्या गोष्टी, गाणी, अनेकविध कला यांचा आस्वाद वर्धिनीमुळे आपण घेत आहोत. या सर्वांच्या उत्तम सरावातून आपले बालपण समृद्ध करूयात : नवनवीन शिकण्याचा वर्धिनीचा बोध सदैव आचरणात आणूयात' असे आवाहन त्यांनी केले.

**विशेष उल्लेखनीय म्हणजे नुकतीच शालांत परीक्षा दिलेल्या ४५ नवयुवकांच्या गटाने हे २०० लहान मुलांचे शिबिर अत्यंत नियोजनपूर्वक, योजकतेने व परिश्रमपूर्वक यशस्वी केले.**

**तरुण पिढी तेजस्वी निपजण्यास जुन्या कागदपत्रांच्या सहाय्याने लिहिलेल्या खऱ्या इतिहासाचा फार उपयोग होतो.**

**वर्धिका गट :**

मोठा गट, विषय : अभ्यास कौशल्य. लहान गट, विषय : अभिव्यक्ती विकास

कालावधी – ३ मे ते ७ मे स्थळ : कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे शिशूविहार, पुणे विद्यापीठ

वर्धिकांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण व्हावी, अभ्यासाची भीती नाहीशी व्हावी यासाठी मोठ्या गटाचा विषय 'अभ्यास कौशल्य विकास' असा घेण्यात आला. अभिव्यक्ती विकासाची ओळख लहानपणापासूनच व्हावी या उद्देशाने लहान गटाचा विषय 'अभिव्यक्ती विकास' असा घेण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन अहिल्यादेवी हायस्कूलच्या सौ. अद्वैता उमराणीकर यांच्या हस्ते झाले. अभ्यासाबरोबरच स्वत:चा अभिव्यक्ती विकास, छंद याबद्दल त्यांनी माहिती सांगितली. दोन्ही शिबिरामध्ये झालेले कार्यक्रम खालीलप्रमाणे –

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| संस्कृत | सौ. आभा अभ्यंकर | गणित | डॉ. श्री. प्रदीप आगाशे<br>श्रीमती मनिषा पाठक |
| भूगोल | श्री. संजीव नलावडे | इतिहास | श्री. नरेंद्र उंब्रजकर |
| मॅनेजमेंट गेम्स | श्री. विलास कुलकर्णी | वैज्ञानिक खेळणी | श्रीमती लता टिळेकर<br>श्रीमती मनिषा पाठक |
| अक्षर गणेशा | कु. तेजश्री शिंदे | धाडसी कथा | कॅ. सनत भाटे |
| गोबी वाळवंटातील अनुभव | श्रीमती सुचेता कडेठाणकर | | |

अभिव्यक्ती विकास हा विषय वर्धिकांपर्यंत अभिनय, चित्रकला, वक्तृत्व, नृत्य अशा अनेक कौशल्यांद्वारे पोहोचला.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| अभिनय | श्री. अमोल पाटील | चित्रकला | श्री. मिलिंद देशपांडे |
| वक्तृत्व कसे असावे ? | श्री. मोहन शेटे | नृत्य | कु. हर्षदा शिंदे |

शिबिरामध्ये श्री. संतोष मोरे यांनी लोककलेवर आधारित असलेला गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमामध्ये सरांनी विविध वाद्यांची माहिती सांगितली. वर्धिकांनी अशा प्रकारच्या गाण्यांचा कार्यक्रम पाहिला नसल्याने त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समारोप सत्रांच्या प्रसंगी श्री. ज्ञानेश पुरंदरे उपस्थित होते. अभ्यासाबरोबर आपली आवड कशी जोपासावी याबद्दल त्यांनी सांगितले.

**खरा उत्सव म्हणजे ज्यापासून आपल्या प्रगतीला मदत होते तो.**

## १० वी पूर्वपीठिका शिबिर

शालांत वर्षाची जोरदार सुरुवात पूर्वपीठिका शिबिराने होते. १० वीतील उज्ज्वल यशासाठी अभ्यासाचे काटेकोर नियोजन, अभ्यासाच्या प्रभावी पद्धतींचा परिचय या शिबिराद्वारे करून दिला जातो. १० वीच्या सर्व विषयांच्या अभ्यासक्रमाचा आवाका लक्षात यावा व पाठ्यपुस्तकाचा सविस्तर परिचय करून देण्यासाठी तज्ज्ञांची व्याख्याने या शिबिरात होतात. दि. १५ मे ते दि. १९ मे या कालावधीत ४८ वर्धक-वर्धिकांचे हे शिबीर वर्धिनीच्या वास्तूत संपन्न झाले. शिबिरात पुढील विषयांवर सत्रे झाली -

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| प्रकल्प कसे करावे ? | श्री. संदेश शेंडकर | मराठी | सौ. स्नेहा जोशी |
| इतिहास | श्री. विजयचंद्र थत्ते | विज्ञान | श्रीमती गौरी देव |
| बीजगणित | श्रीमती लता टिळेकर | भूमिती | डॉ. प्रदीप आगाशे |
| भूगोल | श्री. सुहास देशपांडे | अभ्यास नियोजन | श्री. प्रशांत दिवेकर |
| अभ्यास पद्धती | श्रीमती रागिनी नाईक | इंग्रजी | सौ. राही भालेराव |
| १० वी नंतरचे करियर | श्री. विश्वास कुलकर्णी | अनुभव कथन | श्री. आदित्य पोंक्षे |

### गणेशोत्सव 'स्व'-रूपवर्धिनीचा

## गणेशोत्सव - लोकमान्यांचे लोकजागृतीचे लोकहितकारी लक्ष्य !

लोकमान्यांनी सुरू केलेल्या कार्याचा मूळ उद्देश समोर ठेवून 'स्व'-रूपवर्धिनीचा अगदी स्थापनेपासून म्हणजे गत ३५ वर्षापासून गणेशोत्सवात सहभागी होत आहे. या सहभागामागे वर्धिनीच्या सर्वच पथकांची जवळजवळ तीन तपांची निरंतर साधना आहे. वर्धिनी - गरवारे प्रशाला - ज्ञान प्रबोधिनी यांच्या या पारंपारिक वादन परंपरेत आता अनेक वादन पथके नावारूपाला आलेली आहेत. या शिस्तबद्ध पथकांच्या लोकप्रियतेमुळे मिरवणुकांमधील विकृत नंगानाच लयास जाऊ लागला आहे.

मानाचा चौथा तुळशीबाग गणपती व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसमोर वर्धिनीचे पथक असते. झांज, लेझीम, टिपरी, ध्वजदल या पथकांमधील वर्धक वर्धिका ढोल ताशाच्या तालावर आकर्षक पदविण्यास करत नाविन्यपूर्ण खेळाचे व मल्लखांबावरील नेत्रदीपक कसरतींचे प्रदर्शन करीत असतात. शिवचरित्रातील आवेशपूर्ण प्रसंग, इंग्रजांशी लढून फासावर जाणारे भगतसिंह-सुखदेव-राजगुरू, कालियामर्दन, श्रीराम रथ, दशभुजा दुर्गामाता असे नानाविध प्रसंग मुले या पथकामधून सुरेख सादर करतात.

वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील वास्तूत गणपतीत सकाळ उजाडते ती बालवाडीतील चिमुकल्यांच्या अथर्वशीर्ष वेदघोषाने. ताठ बसून स्पष्ट शब्दोच्चार आणि एका सुरात गणपती अथर्वशीर्ष म्हणणारी ही बालके उपस्थितांना थेट वेदकाळातच घेऊन जातात.

श्रीगजाननाची विधिवत पूजा प्राणप्रतिष्ठापना सर्व जाती पंथातील पुरुष स्त्रियांनी करावी यासाठी

**आपली बुद्धी सात्विक करणे हे प्रत्येकाचे काम होय आणि इंद्रीय निग्रहाखेरीज ते काम होऊ शकत नाही.**

दरवर्षी वर्धिनीतर्फे पूजा व प्राणप्रतिष्ठापना प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते.

वर्धिनीच्या शाखेतील मुलामुलींकडून विविध सामाजिक विषयांवर प्रबोधनपर पथनाट्ये चौकाचौकात सादर केली जातात. स्त्री-भ्रूण हत्या, भ्रष्टाचार, सार्वजनिक शिस्त व स्वच्छता, दहशतवाद, सांस्कृतिक प्रदूषण अशा अनेक ज्वलंत समस्या प्रभावीपणे लोकांसमोर मांडून त्याविषयी सामान्य नागरिक म्हणून प्रत्येक जण काय योगदान देऊ शकतो हेही आवर्जून सांगितले जाते.

'माळीणसाठी आपण काही करू शकतो का ?' या भावनेने **विघ्नहर्ता गणेशाचे रूप आठवून वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील १०२ जण गणपतीच्या तिसऱ्या दिवशी माळीणला पोहोचले व ज्यांच्या कुटुंबात केवळ १-२ जण वाचले अशांच्या शेतात दिवसभर भातलावणी करून आगळ्या वेगळ्या पद्धतीने गणेशसेवा केली.**

गणेशोत्सवानिमित्त वर्धिनीच्या अभ्यासिकेत प्रबोधन व्याख्यानमाला चालू होती. राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थचिंतन, शहीद भगतसिंहांचा क्रांतीविचार अशा विषयांवर नामवंत व्याख्यात्यांची विषयमांडणी रोज होत होती.

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या यावर्षीच्या चौथ्या शिष्यवृत्ती तुकडीने गणेशोत्सवानिमित्त जोमाने अभ्यासयज्ञ आरंभीला आहे. ३ वर्षात ८५ जण यशस्वी होऊन शासनात अधिकारी म्हणून दाखल झाले. आता शंभरीचा टप्पा ओलांडण्याचे सद्भाग्य लाभावे म्हणून मंडळींनी कंबर कसली आहे. प्रशासनात कर्तबगारी गाजवून भ्रष्टाचार आणि कुशासनाचा तिमीर हटवून भारतवर्षाचे सुखकर्ता-दु:खहर्ता होण्यासाठी श्री गजाननाची कृपा या सर्वांवर असावी, हीच प्रार्थना.

## दिवाळी शिबिरे

**भाग १ :** समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी योगानंद शाखा, स्वामी श्रद्धानंद शाखा

**विषय :** सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्त्वे **कालावधी :** दि. २९ ऑक्टोबर ते दि. २ नोव्हेंबर

**संख्या :** वर्धक ८५, युवक २० **स्थळ :** नवीन समर्थ विद्यालय, तळेगाव दाभाडे

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्घाटन सत्र | श्री. ज्ञानेश पुरंदरे<br>श्री. सुरेशभाई शहा | डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>अनुभव कथन | श्री. निलेश धायरकर<br>श्री. एकनाथ बुरसे |
| अनुभव कथन | श्री. बापू पिंगळे (API)<br>सहायक पोलिस निरीक्षक | प्रेरणा सत्र<br>प्रेरणा सत्र | श्री. आनंद सराफ<br>श्री. अवधनी सर |

श्री. बापु पिंगळे यांचे गडचिरोलीतील अनुभव कथन मुलांना प्रेरणादायी ठरले. व्याख्यानांशिवाय डॉ. प्रकाश

**रड म्हणून सांगितल्याने कोणी रडत नाही किंवा लढ म्हणून कोणी लढत नाही.
दोन्ही गोष्टींसाठी आतड्याला पीळ पडून जिव्हाळ्याला चिमटा बसावा लागतो.**

आमटे यांचा माहितीपट दाखविला. तळेगावातील कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन करणाऱ्या 'उद्योगधाम' संस्थेला मोठ्या गटाच्या मुलांनी भेट दिली. रोजच्या मैदानाशिवाय 'शोधू या विवेकानंद', 'वस्तू बनवा-उपयोग सांगा-किंमत ठरवा' या वेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. 'शोधू या विवेकानंद' यामध्ये विवेकानंदांच्या एकाग्रता, बल अशा निवडक गुणांवर आधारित खेळ झाले. दुसऱ्या स्पर्धेमुळे वर्धकांचे वस्तू विकण्यातले कौशल्य पणाला लागले. **शिबिराच्या परिसरात रोज 'स्वच्छता अभियान' केले गेले. ज्या गटाने सर्वात उत्तम काम केले त्या गटाला बक्षीस दिले. सर्व गटांचा या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग होता.**

**भाग २ :**

स्वामी अखंडानंद शाखा, स्वामी दयानंद शाखा, स्वामी शिवानंद शाखा, शंभुराजे शाखा.

**विषय :** खेळातून कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास **कालावधी :** दि. ३० ऑक्टो. ते दि. २ नोव्हें.

**संख्या :** १६० **स्थळ :** ताम्हिणी जिल्हा परिषद विद्यालय, ता. मुळशी

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| जे.आर.डी.टाटा (प्रेरणा सत्र)<br>स्वातंत्र्यवीर सावरकर (प्रेरणा सत्र)<br>स्वामी विवेकानंद (प्रेरणा सत्र)<br>छत्रपती शिवाजी महाराज (प्रेरणा सत्र) | श्री. निळकंठ शिंदे<br>श्री. गणेश पवार<br>श्री. शिरीष पटवर्धन<br>श्री. ज्ञानेश पुरंदरे | खेळातून व्यक्तिमत्त्व विकास | श्री. अद्वैत कुलकर्णी<br>श्री. गिरीश पाध्ये<br>श्री. श्रीकांत भोजकर<br>श्री. विलास कुलकर्णी<br>श्री. अरविंद केळकर<br>स्मिता पालकर |

प्रेरणा सत्रातून सर्व थोर व्यक्तिमत्त्वांचा नेतृत्व गुण वक्त्यांनी गोष्टी रूपातून मुलांच्या मनावर बिंबवला; जो चांगला नागरिक व कार्यकर्ता होण्यासाठी जीवनात प्रत्येकाला आवश्यक आहे.

शिबिराचा मुख्य विषय लक्षात घेऊन विशिष्ट मैदानी खेळ रचण्यात आले होते. त्यातून एकत्रित प्रयत्न (Group Efforts), गटाचा ताळमेळ राखणे (Team Co-ordination), कौशल्याचा योग्य वापर (Skill utilization), संघनायकाची वैशिष्ट्ये या विशेष गोष्टी सर्व वर्धक कशा प्रकारे आत्मसात करतील याकडे लक्ष दिले गेले. व्याख्यानांमध्येसुद्धा काही खेळ घेण्यात आले. श्री. अद्वैत कुलकर्णींनी संभाषण कौशल्य, सांघिक भावना या गोष्टी खेळातून समजावून सांगितल्या. श्री. विलास कुलकर्णी सरांनी व्यवस्थापन कौशल्यावर आधारित खेळ (मॅनेजमेंट गेम्स्) घेऊन आपण चांगल्या व योग्य पद्धतीने कसा विचार केला पाहिजे हे मुलांना सांगितले. खेळात उपयोगी पडणाऱ्या अनेक गोष्टी आपले स्वत:चे व्यक्तिमत्त्व चांगल्या पद्धतीने समृद्ध करत असतात, हा विचार सर्व व्याख्यानांमधून मुलांपर्यंत पोहोचला.

**एकनिष्ठ माणसांनीच आपल्या एकनिष्ठ व्रताने मोठी कार्ये केलेली आहेत हे जगास सांगण्यास इतिहास उभा आहे.**

**भाग ३ :**

स्वामी सुबोधानंद शाखा, स्वामी ब्रह्मानंद शाखा, राजर्षी शाहू शाखा, नरवीर तानाजी मालुसरे शाखा.

**विषय :** आपला भारत व स्वच्छता **कालावधी :** दि. ३० ऑक्टोबर ते दि. ३ नोव्हेंबर

**संख्या :** वर्धक - १२०, युवक - ३० **स्थळ :** रामेश्वर विद्यालय, विंग.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्घाटन सत्र | श्री. शिरीष पटवर्धन<br>श्री. ज्ञानेश पुरंदरे | ओल्या कचऱ्यातून खतनिर्मिती<br>१८५७ ते १९४७ पर्यंतचा भारत | स्नेहा कुलकर्णी<br>श्री. प्रणव सदरजोशी (प्रेरणासत्र) |
| स्वच्छता | श्री. गिरीश पाध्ये | | |
| शरीराची स्वच्छता | डॉ. विनेश नगरे | निसर्गाचे चक्र | डॉ. जयदेव पागे |
| सर्पांची ओळख | श्री. मनोज वाघ | मनाची स्वच्छता | श्री. विश्वास कुलकर्णी |
| पानिपतचा रणसंग्राम | श्री. मोहन शेटे (प्रेरणासत्र) | चाणक्य व चंद्रगुप्त | श्री. अक्षय उंद्रे (प्रेरणासत्र) |
| पाणी स्वच्छता | श्री. विलास कुलकर्णी | समारोप | श्री. बापू पोतदार |

शिबिराचा मुख्य विषय 'स्वच्छता' हा होता. सर्व वक्त्यांकडून हा विषय उत्तम रितीने मांडला गेला. तो मुलांपर्यंत कसा पोहोचला हे काही निवडक प्रतिक्रियांतून जाणवते :-

- 'मनाची स्वच्छता ह्या सत्रातून मी चिडखोरपणा कमी केला पाहिजे हे समजले. परिसराची स्वच्छता रहावी यासाठी रस्त्यावर कोणी थुंकू नये यासाठी पाटी लावेन. जागोजागी कुंड्या ठेवीन. घरात ओला व सुका कचरा वेगळा करीन.' - मयुर ढवळे
- 'घरी ओला व सुका कचरा वेगळा ठेवण्यासाठी आग्रह धरीन. सुक्या कचऱ्याचा पुर्नवापर करता येतो आणि ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करता येते. घरातील निर्माल्य नदीत टाकणार नाही.' - अथर्व जाधव
- 'निसर्गाचे चक्र या सत्रातून निसर्गाची स्वच्छता निसर्ग स्वत: करून घेतो पण माणसांनी प्रदूषण करून निसर्गामध्ये बदल करू नयेत हे समजले.' - सिद्धार्थ कुलकर्णी
- 'परिसर स्वच्छ राहण्यासाठी दर रविवारी मित्रांना घेऊन परिसराची स्वच्छता करीन. स्वच्छतेसंदर्भात शाखेने उपक्रम घ्यायला पाहिजेत. सहलींमध्ये किल्ल्यांवरील कचरा गोळा करण्याचा उपक्रम करायचा आग्रह धरीन.' - रोहन वाडेकर
- श्री. गिरीश पाध्ये सरांनी 'स्वच्छता' विषय मांडताना आपण लहानपणापासून शरीराच्या व परिसराच्या स्वच्छतेबद्दल शिकत असतो पण परिसराच्या स्वच्छतेकडे नेहमीच दुर्लक्ष होते. तसे न करता आपण तयार केलेल्या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट कशी लावावी हे सांगितले. कासव पाण्यात राहून पाण्यातील घाण खाते व पाणी स्वच्छ करण्यास मदत करते. त्याप्रमाणे आपलीही कृती परिसराच्या स्वच्छतेबाबत असली पाहिजे.

**मला मिळालेले ज्ञान मराठी भाषेत मिळाले असते तर हे सर्व ५२ वर्षांचे ज्ञान २५ व्या अगर ३० व्या वर्षात मला मिळाले असते. या इंग्रजी भाषेमुळे इतकी वर्षे फुकट जातात.**

- डॉ. जयदेव पागे यांनी 'निसर्गचक्र' स्पष्ट करताना अनशी या सदाहरित जंगलाचे वर्णन केले. हत्ती रोज १५० किलो अन्न खाऊन ४० ते ५० किलो विष्ठा टाकतो. ही विष्ठा शेणकिडे खाऊन साफ करतात. मधमाशा स्वत:चे शरीर स्वत: स्वच्छ ठेवतात. मरताना मधमाशी पोळ्याबाहेर येऊन मरते अशी उद्‌बोधक माहिति सांगितली.
- शिबिराचा दुसरा विषय 'आपला भारत' हा रोज वेगवेगळ्या कृतीसत्रांतून मांडला गेला. सात राज्यांची सविस्तर माहिती देऊन त्यावर प्रश्नमंजुषा, उपलब्ध साधनांमधून नकाशे तयार करणे अशा स्पर्धा झाल्या. पद्यांना चाली लावून त्याचे सादरीकरण व स्व-रचित विनोदी नाटिका स्पर्धा झाल्या. यामध्ये एका गटाने 'कचरा' या विषयावर विनोदी नाटिका सादर करून बक्षीस मिळवले. यातून शिबिराचा मुख्य विषय योग्य तऱ्हेने मुलांपर्यंत पोचल्याचे जाणवले.
- शिबिरात वर्धिनीच्या वर्धकांबरोबर विंग गावातील मुले व साताऱ्यातील नवीन शाखेची मुले सहभागी झाली होती. त्यांचाही सर्व कार्यक्रमात उत्तम सहभाग होता.

**भाग ४ :**

स्वामी विवेकानंद शाखा, स्वामी अभेदानंद शाखा.

**विषय :** ग्रामीण जीवन आणि अद्‌भुत पर्यावरण. **कालावधी :** दि. ३१ ऑक्टोबर ते दि. ४ नोव्हेंबर
**संख्या :** वर्धक - ७०, युवक - २० **स्थळ :** सोनापूर जिल्हा परिषद प्रा. विद्यालय, सोनापूर, ता. हवेली

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्‌घाटन | श्री. अनंत पवळे, सरपंच | ग्रामीण जीवन, समृद्ध जीवन | श्री. रामभाऊ डिंबळे |
| शिवचरित्र | श्री. ज्ञानेश पुरंदरे (प्रेरणासत्र) | प्राणी जीवन | श्री. अनुज खरे |
| ग्लोबल पर्यावरण | श्रीमती प्रज्ञा ठाकूर | मधुमक्षिका जीवन | श्रीमती शुभा मुजुमदार |
| टाकाऊपासून टिकाऊ | श्री. अरविंद केळकर | ग्रामीण विकास | श्री. प्रदीप आगाशे |
| कचरा व्यवस्थापन | श्री. मणेरीकर | समारोप | श्री. सनत् भाटे |

शिबिराचा विषय 'ग्रामीण जीवन', तो मुलांपर्यंत सोनापूर या छोट्याशा गावात झाल्याने योग्य रीतीने पोचला. शहरातल्या सुखसुविधा उपलब्ध नसलेल्या एका वेगळ्या दैनंदिन जीवनाचा अनुभव मुलांना मिळाला. **दररोज मुले एक तास ग्रामस्वच्छता करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट कशी करावी हे शिकले. मुलांनी गावकऱ्यांच्या नित्याच्या वापरातील रस्त्यावरील उखडलेले दगड व्यवस्थित लावून रस्ता नीट केला.** मोठ्या गटातील मुलांना गाई-म्हशींचे दूध काढणे व ते विकणे हा वेगळा अनुभव मिळाला. शिबिरातील पाच-पाच मुलांचा गट दुपारी ११ ते २ या वेळेत भात काढणीला जात असे. काहींची जेवणे शेतकऱ्यांबरोबर त्यांच्याच शिदोरीतून होत असत. गाव लहान असल्याने रोजची मैदान व्यवस्था कधी शाळा, कधी चावडी, कधी स्मशानभूमीचा परिसर येथे होत होती. त्यामुळे सर्व गाव शिबिरात सामील झाल्याचे वातावरण होते.

**जो कोणी देशाचे कार्य करावयाला पुढे येईल त्याला मी देवाप्रमाणे मानावयाला तयार आहे.**

आपण प्रत्येकजण कचरा व्यवस्थापनास मदत कसे करू शकतो याचे श्री. मणेरीकर सरांनी तर टाकाऊ कागदातून फुले कशी तयार करावीत याचे श्री. अरविंद केळकर सरांनी मुलांना मार्गदर्शन केले. 'मुलांनी शिबिरातून अनुभवलेलं ग्रामीण जीवन हे मुलांचंच जीवन समृद्ध करते' हा विचार श्री. रामभाऊ डिंबळे सरांनी व्याख्यानातून मांडला. 'मधुमक्षिका पालन' ही ध्वनिचित्रफीत व डॉ. प्रकाश आमटे यांचा जीवनपट मुलांना ग्रामीण भागातल्या कामाची, समस्यांची माहिती देणारा व प्रेरणादायी होता. शिबिरात मैदानी स्पर्धांबरोबर, वर्तमानपत्र तयार करणे, आदर्श ग्राम प्रतिकृती बनवणे, शेकोटी-प्रश्नमंजूषा अशा स्पर्धा घेण्यात आल्या. सर्वजण या चार दिवसात ग्रामजीवन जगले.

**भाग ५ :** भगिनी निवेदिता शाखा, घोरपडे पेठ शाखा

**विषय :** युद्ध कथा **कालावधी :** दि. २८ ऑक्टोबर ते दि. १ नोव्हेंबर

**संख्या :** वर्धिका - ४५, युवती - १२ **स्थळ :** न्या. रानडे बालक मंदिर, शनिवार पेठ, पुणे

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्घाटन सत्र | इतिहासप्रेमी मंडळाच्या 'पुरंदर संग्राम' प्रदर्शनास भेट | संरक्षण विभाग | श्री. विनायक अभ्यंकर |
| | | राणी गाईडेन्ल्यू | सौ. अद्वैता उमराणीकर (प्रेरणासत्र) |
| रोजच्या जीवनातील संघर्ष | श्री. शिरीष पटवर्धन | | |
| महादजी शिंदे चरित्र | श्री. मोहन शेटे | शिवरायांची युद्धनीती | श्री. सौरभ कर्डे |
| वर्धिनीची ओळख व अनुभव कथन | सौ. छाया सकटे | स्त्रियांचे योगदान | श्री. पांडुरंग बलकवडे |
| | | शिवतेज संग्राम | श्री. मंदार परळीकर (प्रेरणासत्र) |
| कारगिल | सौ. अनुराधा प्रभुदेसाई | | |

शिबिराच्या विषयाला अनुसरून पर्वती, महात्मा फुले संग्रहालय, पाताळेश्वर, लालमहाल येथे स्थळभेटी झाल्या. श्री. पुष्कर वाडेकर सरांनी मिसाईलबद्दलची माहिती मुलींना दिली तर श्री. मयूर कर्जतकर सरांनी युद्धगीते म्हणून घेऊन शिबिराचा जोश वाढवला. मैदानी स्पर्धांबरोबर उपलब्ध साहित्यातून किल्ले बनवा व माहिती सांगा ही स्पर्धा, युद्ध विषयावर आधारित वेशभूषा स्पर्धा व पद्य स्पर्धा घेण्यात आल्या.

सौ. अद्वैता उमराणीकर ताईंनी आसामच्या राणी गाईडेन्ल्यूचे चरित्र मांडले. तिने पुकारलेल्या इंग्रजांविरुद्धच्या बंडाचे जिवंत वर्णन त्यांनी केले.

श्री. पांडुरंग बलकवडे सरांनी रामायणातील सीता, महाभारतातील कुंती, द्रौपदी तसेच आधुनिक काळातील किरण बेदी, साईना नेहवाल अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान व्याख्यानातून मांडले. या सर्व स्त्रियांचा प्रत्येक गुण आपल्याला आदर्शवत मानून आपण पुढे जाऊ शकतो.

लालमहालात पाहिलेल्या प्रदर्शनाचा इतिहास श्री. मंदार परळीकर सरांनी जोशपूर्ण व्याख्यानात जिवंत केला. शिवरायांचे वेगवेगळे पैलू त्यांनी गोष्टीरूपातून मांडले.

**कोणत्याही लोकात ऐक्याची वृद्धी होण्यास जी अनेक साधने असतात त्यापैकीच एक उपास्य दैवत असणे हे एक आहे.**

शिबिराचा समारोप पुरंदर गडावर झाला. गाडीत बसल्यावर शिबिरात झालेल्या पद्यांची पाठांतर स्पर्धा झाली. गडावर पोहोचल्यावर श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी गडाची माहिती व बांधणीचे तंत्र स्पष्ट केले. मुरारबाजीचा पराक्रम रंजकतेने कथेच्या रूपात सांगितला. त्यामुळे शिबिराच्या सुरुवातीला बघितलेली 'पुरंदर संग्राम' प्रतिकृती सगळ्यांच्याच मनावर कायमची कोरली गेली. गडावरील शिवमंदिरात उपासना होऊन गड उतरण्यास सुरुवात झाली. परतीच्या वाटेवर केतकावळे येथील बालाजीच्या दर्शनाने सर्व मुली उत्साहित झाल्या. शिबिरात भोजन, न्याहारी युवतींनी स्वत: बनवण्याचा अनुभव, रोजच्या पोळ्या शाखांकडून व माजी युवतींकडून आणण्याचा अनुभव, साताऱ्यात सुरू असलेल्या शाखेतील मुलींचा नव्याने पण उत्साहाने सहभाग व शिबिराचा समारोप पुरंदर किल्ल्यावर हे या शिबिराचे वेगळेपण सगळ्यांच्याच लक्षात राहिले.

**समर्पण दिन :**

दत्त जयंती हा वर्धिनीचे संस्थापक कै. कृ. ल. पटवर्धन सरांचा जन्मदिवस 'समर्पण दिन' म्हणून साजरा होतो. यावर्षी ६ डिसेंबरला साजरा झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी प्रास्ताविकातून वर्धिनीची सद्यस्थिती मांडली. सहकोषाध्यक्ष श्री. विलास कुलकर्णी यांनी निधी समर्पण संकल्पना विस्तृतपणे मांडली. कार्यक्रमानंतर ५५ व्यावसायिक युवक-युवतींनी निधी समर्पण केले. श्री. नरवणे सरांनी कै. किशाभाऊंच्या कामाची वैशिष्ट्ये सांगून 'आज आपल्या कामातून वंचित घटकांच्या विकासाचे अंतिम टोक आपण गाठले पाहिजे, परिस्थितीनुसार कामात बदल केले तरी वर्धिनीचे मनुष्यनिर्मितीचे काम महत्त्वाचे आहे' असे विचार मांडले.

**क्रीडा दिन :**

दरवर्षी होणाऱ्या क्रीडादिनाची सर्वच वर्धक आतुरतेने वाट बघत होते. याचे प्रमुख कारण यावर्षी वाढलेली स्पर्धांची संख्या आणि साहजिकच त्यामुळे येणारी चुरस व अधिकाधिक बक्षीसे. याशिवाय या स्पर्धांसाठी असलेली विशेष मैदाने हाही यावेळी मुलांच्या कुतुहलाचा विषय होता. क्रीडादिन दोन टप्प्यांमध्ये घेतला गेला. दि. २३ नोव्हेंबरला वैयक्तिक मैदानी स्पर्धा व सूर्यनमस्कार स्पर्धा तर ३० नोव्हेंबरला सांघिक मैदानी स्पर्धा.

**१) वैयक्तिक मैदानी स्पर्धा** - यासाठी यावेळी प्रथमच पुणे शहरातील सर्वोत्तम सुविधा असणारे बाबूराव सणस मैदान घेण्यात आले होते. १०० मी., १५०० मी. धावणे, लांब उडी, गोळाफेक, भालाफेक अशा विविध स्पर्धा यात घेण्यात आल्या. व्यवस्थित आखलेल्या ट्रॅकवर चुरशीने धावणारी मुले आणि स्टेडियममधून त्यांना प्रोत्साहन देणारी, जल्लोष करणारी सर्व मुले हा नजाराच वर्धिनीतील वर्धकांसाठी अनोखा होता. स्पर्धेचे उद्घाटन टाटा मोटर्सचे श्री. शैलेश हत्ती यांच्या हस्ते झाले. त्यांच्याबरोबर टाटा मोटर्सच्या सौ. योगिता आपटेही उपस्थित होत्या. एकूण ४५० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. २३ नोव्हेंबरला दुपारी ४ ते ९

प्रगतीचा मार्ग ऐक्यातच आहे.

या वेळेत न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आली. सूर्यनमस्कार स्पर्धेचे हे सलग तिसरे वर्ष. स्पर्धात्मक दर्जा असल्यामुळे विद्यार्थ्यांनी कसून सराव केलेला होता. मंत्रोच्चार, श्वसनाची पद्धत, सुनियोजित हालचाली, सांघिक हालचाली, उभ्या राहण्याच्या आणि सादरीकरणाच्या वेगवेगळ्या रचना यावर मुलांनी विशेष मेहनत घेतली होती. परीक्षकांनी याचे खूप कौतुक केले. या स्पर्धेसाठी श्री. सुभाषराव कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी श्री. विश्वास कुलकर्णी, श्री. अभिजीत माने हे उपस्थित होते.

**२) सांघिक स्पर्धा :** ३० नोव्हेंबरला चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाच्या मैदानावर सांघिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. यात लंगडी, खोखो, कबड्डी, हँडबॉल व व्हॉलीबॉल या खेळांचा समावेश होता. एकूण ६ गटांमध्ये या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन श्री. संदीप देवधर सरांच्या हस्ते झाले. एकूण ५५० विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. सर्वच स्पर्धा अतिशय चुरशीने पार पडल्या. ५ वी, ६ वीच्या गटावर लंगडीच्या स्पर्धांमध्ये एक वेगळा प्रयोग यावेळी करण्यात आला. अर्धा वेळ उजव्या पायाने तर अर्धा वेळ डाव्या पायाने लंगडी घालण्याचा नियम करण्यात आला. चुरशीने खेळलेल्या अंतिम सामन्यात विजयी संघ केवळ एका गुणाने विजयी झाला. युवकांचे कबड्डी सामनेही अतिशय चुरशीचे झाले. अंतिम सामना चालू असताना एका खेळाडूच्या पायात पेटके येऊन तो मैदानावर पडला तेव्हा विरुद्ध संघातील खेळाडू त्याच्या मदतीसाठी सर्वप्रथम धावले. बरे वाटल्यानंतर तो जिगरबाज खेळाडू पुन्हा खेळण्यास उतरला. चुरस आणि खिलाडूवृत्ती याचे उत्तम दर्शन या सामन्यात झाले. हँडबॉल हा खेळ ३ वर्षांपूर्वी प्रथमच क्रीडादिनात समाविष्ट करण्यात आला. तीन वर्षात मुले या खेळात चांगलीच तरबेज झाली आहेत. हेही सामने यामुळे चुरशीचे झाले. खोखो आणि व्हॉलीबॉल हेही खेळ विद्यार्थ्यांच्या कौशल्यपूर्ण खेळाने प्रेक्षणीय ठरले. बक्षीस समारंभ टाटा मोटर्सच्या कार विभागाच्या मानव संसाधन विकास प्रमुख सौ. अनुराधा दास यांच्या हस्ते पार पडला. टाटा मोटर्स सीएसआरच्या सौ. योगिता आपटेही यावेळी उपस्थित होत्या. या सर्व स्पर्धांसाठी चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयातर्फे पंच उपलब्ध करण्यात आले होते. तसेच खो-खो स्पर्धेसाठी सन्मित्र संघाचे पंच उपस्थित होते. महाराष्ट्र मंडळाने सवलतीत आगाशे महाविद्यालयाचे मैदान उपलब्ध केले. मुलांच्या चारही भागातील भागप्रमुखांनी व मुलींच्या मैदान प्रमुखांनी या सर्व स्पर्धांसाठी विशेष मेहनत घेतली. वैयक्तिक स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या सर्वच स्पर्धकांच्या गुणवत्ता वाढीसाठी यावर्षी विशेष प्रकल्प राबवण्यात येणार आहे. यात त्यांचे प्रशिक्षण, विशेष आहार, पदवेश आणि इतर साहाय्य उपलब्ध केले जाईल.

**सूर्यनमस्कार स्पर्धा निकाल :**

१) लहान गट : स्वामी ब्रह्मानंद शाखा

२) मोठा गट : समर्थ रामकृष्ण शाखा

३) युवक गट : स्वामी दयानंद सरस्वती शाखा

**औदार्य हा गुणच असा आहे की त्यास जातीचे, धर्माचे, बंधन घालण्याचा प्रयत्न केला तरी घालता येत नाही.**

## सांघिक स्पर्धा निकाल

| स्पर्धा | विजयी | उपविजयी |
|---|---|---|
| ५ वी - ६ वी लंगडी | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | स्वामी सुबोधानंद शाखा |
| ७ वी - ८ वी खोखो | स्वामी ब्रह्मानंद शाखा | राजर्षी शाहू शाखा |
| ९ वी - १० वी कबड्डी | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | नरवीर तानाजी मालुसरे शाखा |
| ११ वी - १२ वी हँडबॉल | स्वामी ब्रह्मानंद शाखा | स्वामी विवेकानंद शाखा |
| महाविद्यालयीन गट - कबड्डी | समर्थ रामकृष्ण शाखा | स्वामी श्रद्धानंद शाखा |
| व्यावसायिक व्हॉलीबॉल | भाग ४ | स्वामी श्रद्धानंद शाखा |
| ५ वी ते ७ वी लंगडी | घोरपडे पेठ शाखा | |
| ८ वी ते १० वी कबड्डी | भगिनी निवेदिता शाखा | |

## वैयक्तिक स्पर्धा निकाल - मुली

| स्पर्धा | विजयी | स्पर्धा | विजयी |
|---|---|---|---|
| ५ वी - ६ वी (१०० मी. पळणे) | सुफिया शेख | लहान गट (लांब उडी) | प्रियांका तिवारी (प्रथम)<br>श्रुती थोरात (द्वितीय) |
| ७ वी - ८ वी | समृद्धी यादव | मोठा गट | सोनाली कोळी (प्रथम)<br>गौरी गुंजाळ (द्वितीय) |
| ९ वी - १० वी | गौरी गुंजाळ | | |
| ११ वी - १२ वी | सोनाली भांड | युवती | सोनाली भांड |

## वैयक्तिक स्पर्धा निकाल - मुले : पळणे

| | १०० मी. | १५०० मी. | लांब उडी |
|---|---|---|---|
| ५ वी - ६ वी | रितेश शिंदे १४.७२ से. | प्रकाश जमादार ६ मि.१३ से. | राकेश चांभार - ३.९० मी. |
| ७ वी - ८ वी | सिद्धेश्वर दळवी १३.६६ से. | संतोष कचरे ५ मि. ५२ से. | विशाल खताळ - ४.३१ मी. |
| ९ वी - १० वी | शेखर चव्हाण १२.५० से. | अमित आदवडे ५ मि.३७ से. | अमित आदवडे - ५.४० मी. |
| ११ वी - १२ वी | अक्षय कदम १२.३१ से. | पार्थ कश्यप ५ मि. १७ से. | सचिन निकम - ४.९८ मी. |
| एफ.वाय. - टी.वाय. | संदीप जगधने १२.३० से. | तुषार मुढे ५ मि. २५ से. | संदीप जगधने - ५.६२ मी. |
| व्यावसायिक | आशिष बडदे १२.७८ से. | | |

**गोळा फेक :** १) मोठा गट : विनायक खापरे (८.५० मी.) २) ११ वी-१२ वी : ऋषिकेश नरसाळे (८.७० मी.) ३) एफ.वाय. - टी.वाय. : अक्षय पिसाळ (८ मी.)

**भाला फेक :** सुमीत पाटील (३१.८ मी.)

**ज्यावेळी एखादा देश उदयास येतो त्यावेळी लोखंडी शस्त्रांपेक्षा लोकांची अंत:करणरुपी शस्त्रे अधिक काम करतात.**

## क्रीडा विभाग - वार्षिक वृत्त

'पदी धैर्य बाहूत शौर्य स्फुरावे । घडावी विवेकी कृती ध्यास हा ।'

रोज शाखेवर प्रार्थना म्हणत असताना या ओळी वर्धकांच्या मनात वेगळाच संस्कार घडवत असतात. क्रीडा विभागाचे नियोजनबद्ध अस्तित्व या वर्षीपासून समोर येत असताना वरील ओळी सामोऱ्या ठेवूनच विविध गोष्टींचे नियोजन केले होते.

'स्व'-रूपवर्धिनीत अनेक गुणवान खेळाडू आहेत. त्यांच्या शाळेत, महाविद्यालयात ते उत्तम अशी कामगिरीही करत आहेत. त्यांच्या गुणवत्तेला पूरक असा आहार, प्रशिक्षण, इतर साहाय्य करता येईल का यासंबंधी विचारमंथन करण्यात आले. त्याबरोबरच वर्धिनीत येणाऱ्या इतर वर्धकांची क्रीडाकौशल्यातील सामूहिक गुणवत्ता वाढण्यासाठी काही करता येईल काय याबद्दलही विचार करण्यात आला. मग त्यानुसार आहारतज्ज्ञ, क्रीडाप्रशिक्षक यांच्याशी चर्चा करून एका प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. अँजेलीन जयकुमार, एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील डॉ. कपिला शर्मा, चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयातील डॉ. आहेर, वर्धिनीतील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. उमेश बिबवे यांच्या सहकार्याने या प्रकल्पाची आखणी करण्यात आली. क्रीडाप्रशिक्षण आपल्याच कार्यकर्त्यांनी करावे यासाठी सहा निवडक युवक कार्यकर्त्यांना चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाच्या एक महिन्याच्या शारीरिक शिक्षण प्रशिक्षक अभ्यासक्रमाला मे महिन्यात पाठवण्यात आले. तेथे त्यांनी विविध क्रीडासाहित्याच्या माध्यमातून तसेच विविध, मैदानी व्यायाम प्रकारातून मुलांचे क्रीडाकौशल्य कसे उंचावता येते याचे प्रशिक्षण घेतले. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी दोन शाखांची निवड करण्यात आली. 'क्रीडा प्रतिभा विकास प्रकल्प' या नावाने या प्रकल्पाची आखणी करण्यात आली. पोषक आहार, योग्य प्रशिक्षण देण्यात आल्यानंतर काय परिणाम होतात यासाठी दोन गटात विभागणी करून त्यांच्या परिणामांची नोंद करण्यात आली. एका शाखेवर प्रकल्प राबवताना त्यातील प्रत्येक मुलाला रोज प्रथिनांनी युक्त असा पोषक आहार, एक केळं आणि लिंबू सरबत देण्यात आले तर दुसऱ्या शाखेवर पोषक आहार न देता रोज एक केळ आणि लिंबू सरबत देण्यात आले. क्रीडा व्यायाम प्रकार व संबंधित प्रशिक्षण दोनही शाखांवर समान होते. प्रकल्प सुरू करण्यापूर्वी विविध शारीरिक व मैदानी चाचण्या घेण्यात आल्या. शारीरिक चाचण्यांमध्ये हिमोग्लोबीनसह संपूर्ण ब्लड काऊंट, वजन व उंची मोजण्यात आली. मैदानी चाचण्यांमध्ये सीटअप, पुशअप, स्टँडिंग ब्रॉडजंप, दोरीच्या उड्या, शटल रन, ९ मी. धावणे, सीट ॲन्ड रीच अशा विविध चाचण्या घेण्यात आल्या. त्यानंतर दोनही शाखांवर प्रकल्प सुरू करण्यात आला. अशा प्रकारचा प्रकल्प मुलांसाठी प्रथमच राबवल्याने मुलांमध्ये प्रचंड उत्साह होता. प्रकल्पाचे संपूर्ण संयोजन युवक कार्यकर्ता श्री. हरीश मिसाळ यांच्याकडे होते. तीन महिन्यांनी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सर्व चाचण्या पुन्हा घेण्यात आल्या. निष्कर्षांवर लक्ष टाकल्यानंतर या प्रकल्पाची यशस्वीता अधोरेखित झाली.

**लहान लहान नवे धंदे लोकांस शिकवण्याकरिता ज्या शाळा पाहिजेत त्या निघाल्याखेरीज देशाची औद्योगिक उन्नती व्हावयाची नाही.**

उत्तम खेळाडू असणाऱ्या मुलांच्या एकूण गुणवत्तेत १० ते २०% सुधारणा झाली तर सामान्य किंवा अगदीच कमी गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १० ते १००% गुणवत्ता उंचावलेली दिसून आली. यात धावण्याचा वेग, दमसास, दोरीच्या उड्या, लांबउडी, लवचिकता या सर्वच निकषांवर मुलांची गुणवत्ता कमालीची उंचावलेली आढळली. एकंदरच अशा प्रकारच्या विशेष प्रशिक्षणाचे आणि पोषक आहाराचे महत्त्व ठळकपणे जाणवले. अशा प्रकारचे प्रशिक्षण सर्वच शाखांवर उपलब्ध करण्यासाठी पुढील वर्षी नियोजन करण्यात येणार आहे. याशिवाय विशेष गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पूरक आहार, योग्य त्या ठिकाणी उत्तम प्रशिक्षण, आवश्यक असे क्रीडासाहित्य उपलब्ध करण्यात येणार आहे.

**- डॉ. विनेश चंद्रकांत नगरे**

क्रीडा विभाग पालक

**विस्ताराचे पुढचे पाऊल :** ‘स्व’-रूपवर्धिनीच्या कामाचा विस्तार पुण्यामध्ये करीत असतानाच अशा प्रकारच्या कामाची/प्रकल्पांची अन्य जिल्ह्यात, अन्य राज्यातही आवश्यकता आहे. या दृष्टिकोनातून पुण्याबाहेरील विस्ताराच्या कामाला सुरुवात झाली आहे. यावर्षी सातारा येथील लक्ष्मी केशव प्रतिष्ठान या न्यासाबरोबर एक सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार या न्यासाने वर्धिनीचे उपकेंद्र म्हणून काम करण्यास मान्यता दिली आहे. उपेक्षित गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या या न्यासाशी वर्धिनीचे नाते जुळले असून यावर्षी झालेल्या वर्धिनीच्या दिवाळी शिबिरात या न्यासातील विद्यार्थी सहभागी झाले होते.




**आपले अंत:करण जोपर्यंत शुद्ध आहे तोपर्यंत कशाचीही भीती बाळगण्याची जरुरी नाही.**

## शाखा विभाग

वर्धिनीच्या कामाची उभारणी करताना किशाभाऊंच्या डोळ्यासमोर उद्दिष्टे अगदी स्पष्ट होती. या सामाजिक कामासाठी याच कामातून सेवेकरी निर्माण झाले पाहिजेत. हे काम अविरत चालू रहावे म्हणून त्यासाठीची आवश्यक यंत्रणा शाखेच्या दैनंदिन कार्यक्रमातूनच उभी रहावी अशी धारणा या मागे आहे. रोजच्या दैनंदिन शाखेचे काम उत्साहात परंतु नियोजितपणे चालू रहावे म्हणून पुढील काही व्यवस्थांची रचना केली आहे. या व्यवस्था याच कामातून तयार झालेले युवक म्हणजेच सेवेकरी सांभाळत आहेत.

दैनंदिन शाखेच्या व्यवस्थांची रचना पुढीलप्रमाणे आहे –

### शाखाप्रमुख

**मैदान प्रमुख**

खेळण्यासाठी एकत्र न येता एकत्र येण्यासाठी खेळणे हे उद्दिष्ट ठेवून मैदान विभाग काम करतो. 'खेळ खूप खेळूनी सतेज व्हायचे' ही ओळ दैनंदिन जीवनात आत्मसात करता यावी म्हणून नियोजित मैदान व्यवस्था सांभाळण्यासाठी मैदान प्रमुखाने काम करावे.

**कार्यक्रम प्रमुख**

प्रेरणा जागरण हा कार्यक्रमामागील मुख्य हेतू असल्याने ज्या कार्यक्रमामधून हे उद्दिष्ट साकारले जाईल अशा नैमित्तिक आणि नित्य तसेच शाखेवर व एकत्रित होणाऱ्या विविध कार्यक्रमातून सर्व कार्यकर्त्यांना कार्यरत ठेवण्यासाठी कार्यक्रम प्रमुखाने काम करावे.

**तासिका प्रमुख**

केवळ अभ्यासाच्या चौकटीत न राहता वेगवेगळ्या विषयातील मूलभूत संकल्पना स्पष्ट व्हाव्यात, प्रत्यक्ष कृतीतून गुणवत्ता व कौशल्य विकास, सर्जनशीलता साधण्यासाठी तासिका प्रमुखाने काम करावे.

**संपर्क प्रमुख**

शिक्षणातून संपर्क, संपर्कातून सहवास, सहवासातून सहअनुभूती, सहअनुभूतीतून समरसता, समरसतेतून समर्पण हे वर्धिनीचं उद्दिष्ट लक्षात घेऊन युवकाने वेगवेगळ्या माध्यमातून घेतलेली भेट, साधलेला संवाद केलेली चर्चा, समस्यांवर काढलेले उपाय म्हणजे संपर्क. प्रत्येक घर वर्धिनीशी कसं जोडलं जाईल या विचारांसाठी संपर्क प्रमुखाने काम करावे.

**कोणत्याही मनुष्याची योग्यता धंद्यावर, जातीवर अवलंबून नसून त्याच्या अंत:करणाच्या शुद्धीवर अवलंबून असते.**

## मैदान व्यवस्था वृत्त

● इतिहासप्रेमी मंडळांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात समर्थ रामकृष्ण शाखेच्या वर्धकांनी मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली. मुलांना स्किपिंग रोपच्या चित्रफिती दाखवल्या. सूर्यनमस्कार प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये प्रत्येक स्थिती व त्यातील आसन साधर्म्य हे सांगून त्याचा सराव घेण्यात आला. पदविन्यास प्रशिक्षण दिले. त्यामध्ये सगळी वृत शिकवण्यात आली.

● स्वामी अभेदानंद शाखेमध्ये फेब्रुवारी महिन्यात लांब उडी, १०० मी. धावणे, १० मिनिटे पळणे या स्पर्धा घेण्यात आल्या. रोज सूर्यनमस्कार घातले जातात.

● घोरपडे पेठ शाखेमध्ये दि. ९ जानेवारी ते १६ जानेवारीला जिम्नॅस्टिक्स या व्यायामप्रकाराचे प्रशिक्षण श्री. यतिन केळकर यांनी वर्धिकांना दिले.

● स्वामी श्रद्धानंद शाखेमध्ये दि. २० ते २५ जानेवारीला मैदानी स्पर्धा झाल्या. दि. ३० व ३१ जानेवारीला शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात आली.

● स्वामी योगानंद शाखेमध्ये विविध मैदानी व अन्य कार्यक्रमातील स्पर्धांसाठी वर्धकांची गटविभागणी करण्यात आली. त्यानुसार १२ मे ला फुटबॉल, खोखो, कबड्डी, दंडफेक, धावणे अशा विविध स्पर्धा झाल्या.

● स्वामी सुबोधानंद शाखेमध्ये 'फुटबॉल प्रकल्प' सुरू करण्यात आला. दर शनिवारी त्याचे प्रशिक्षण वर्धकांना दिले जाते. दर रविवारी शाखेअंतर्गत फुटबॉलचे सामने होतात.

● स्वामी अखंडानंद शाखेमध्ये मुलांची वैद्यकीय चाचणी घेण्यात आली. यात एकूण ३६ वर्धकांचे वजन, उंची व छाती यांची नोंद घेण्यात आली. शाखेत कबड्डीचे चार संघ तयार करून कबड्डीचे सामने झाले. वर्धकांनी उत्साहाने यात सहभाग घेतला.

● स्वामी विवेकानंद शाखेमध्ये २० सप्टेंबरला सायकलीवरच्या वेगवेगळ्या प्रात्यक्षिकांच्या स्पर्धा झाल्या. यात सर्वांनी उत्साहाने भाग घेतला. हनुमान जयंतीनिमित्त १० वीच्या मुलांनी १०८ सूर्यनमस्कार घातले.

● घोरपडे पेठ शाखेमध्ये दर शनिवार-रविवारी लाठीकाठी, भालाबोथाटी इ. मर्दानी खेळांचा सराव झाला.

### 'मल्लखांबावरील पक्षी'

५ ते ७ फेब्रुवारी २०१४ या कालावधीत 'इला फौंडेशन'च्या वतीने 'शिकारी पक्षी' या विषयावरच्या 'आंतरराष्ट्रीय पक्षी परिषदे'चे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला जगभरातील वीस देशांमधील पक्षीतज्ज्ञांनी सहभाग घेतला होता. या परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कला/क्रीडा क्षेत्रातील गौरवशाली परंपरेचे दर्शन विदेशी प्रतिनिधींना घडवावे या हेतूने एका कार्यक्रमाचे आयोजन 'इला फौंडेशन'च्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमात वर्धिनीच्या मल्लखांब संघाला सहभागी होण्याची संधी मिळाली होती. श्री. संतोष घाडगे या युवक कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली ८ जणांच्या चमूने मल्लखांबावरील चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

**समोर अंधार दिसत असला तरी त्यापलिकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.**

## कार्यक्रम व्यवस्था वृत्त

**समर्थ रामकृष्ण शाखा :** दि. १ फेब्रुवारीला वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

- दि. २२ जूनला पुण्यात आलेल्या वारकऱ्यांशी गप्पा मारण्यासाठी शाखेतील वर्धक गेले होते. 'वारकऱ्यांचे अनुभव, त्यांना वारीमध्ये येणाऱ्या समस्या' याविषयी वर्धकांनी जाणून घेतले. 'वारकरी' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.
- यंदाच्या गणेशोत्सवात 'गणेशपत्रिका' तयार करणे ही वेगळ्या प्रकारची स्पर्धा झाली. ज्याप्रमाणे वर्तमानपत्रातील 'पुरवणी' एखाद्या विषयाला वाहिलेली असते, त्याचप्रमाणे 'गणपती उत्सवा'वर आधारित पुरवणी तयार करण्याची ही स्पर्धा होती. यामधून मुलांचे वर्तमानपत्रवाचन व पुरवणी आकर्षक करण्यासाठी 'सजावटीची कल्पकता' दिसून आली. गणपतीवर आधारीत अशी चित्रकला स्पर्धा झाली. यामध्ये शाखेचे वर्धक कु. कुणाल उदागे तसेच कु. धुमाळ या दोघांची विशेष कलात्मकता दिसून आली.
- खडीचे मैदान येथील ऐतिहासिक 'तरवडे वाड्या'तील गणपतीसमोर २१ वेळा अथर्वशीर्ष पठण झाले.
- २२ ऑक्टोबरला वर्धिनीची स्वच्छता करून दीपोत्सव साजरा झाला. या कार्यक्रमाची मध्यवर्ती कल्पना 'मंगल मंगळयान' होती. यामध्ये श्री. सुनिल कुलकर्णी सरांचे 'मंगळयाना'वर व्याख्यान झाले.
- २३ ऑक्टोबरला 'पर्यावरण मित्र दिवाळी' या विषयावर नाटक स्पर्धा झाली. सर्व गटांनी नाटकातून चांगल्या पद्धतीने विषय मांडला.
- २४ ऑक्टोबरला वर्धकांच्या घरी जाऊन शाखेत रंगवलेल्या पणत्या व भेटकार्डे देऊन दिवाळीच्या शुभेच्छा पालकांना दिल्या.
- २५ ऑक्टोबरला ससून रुग्णालयामधील 'श्रीवत्स' ह्या संस्थेला केळी व फराळ भेट देण्यात आला. ७ वी, ८ वीचे वर्धकांचीही संस्था भेट झाली. शाखेतील युवकांनी महानगरपालिकेजवळील पदपथावरील १५ झोपड्यांमध्ये 'फराळ वाटपा'चा कार्यक्रम केला.
- २६ ऑक्टोबरला वर्धकांची 'खाना खजाना' स्पर्धा घेण्यात आली. 'स्टोव्ह, गॅसचा वापर न करता पौष्टिक पदार्थ बनवणे' ह्या विषयावर मुलांनी अनेक पदार्थ केले होते.

**स्वामी योगानंद शाखा :** शाखेने हनुमान टेकडी येथे भेट दिली. तेथे सर्व वर्धकांनी वृक्षारोपण केले. शाखेचे ग्रंथालय सुरू झाले. या ग्रंथालयात एकूण ३० पुस्तके आहेत. मे महिन्याच्या सुट्टीत दररोज शेवटचा अर्धा तास पुस्तक वाचन घेण्यात आले. प्रत्येक वर्धकाला १ पुस्तक अशी सर्व वर्धकांनी मिळून २० पुस्तके वाचली.

**स्वामी श्रद्धानंद शाखा :** दि. १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा घेण्यात आली. दि. २५ जानेवारीला 'व्यवस्थापन कौशल्यावर' आधारित खेळ घेण्यात आले. कु. उज्ज्वल वाघुले या विद्यार्थ्याने लेखक व पुस्तके यांची माहिती सांगितली.

**बलिष्ठ व निर्बल यांच्यात करार होत नाही.**

- मानसिक विकास बैठकीत 'युद्धाच्या काळातील भारत' या विषयांवर मुलांना माहिती दिली. शाखेने कोंढवा येथील 'इस्कॉन मंदिरा'ला भेट दिली. तेथील साधक श्री. संदेशदादा यांनी वर्धकांना सर्व मंदिर फिरवून मंदिराची माहिती दिली.
- श्रावण महिन्याचे धार्मिक महत्त्व जाणून मुलांना 'शिवतांडव स्तोत्र' शिकवले. त्याचे पाठांतर सर्वजण मिळून करतात.
- गुरुपौर्णिमेच्या दिवशी मुलांचे गट पाडून द्रोणाचार्य-एकलव्य या गुरुशिष्याच्या जोडीवर आधारित नाट्यस्पर्धा घेण्यात आली. तिला उत्तम प्रतिसाद मिळाला.
- वर्धक घरी किल्ले करतात पण त्यात अजून चांगली सुबकता, कल्पकता यावी म्हणून सर्वांनी संभाजी बागेतील किल्ले प्रदर्शनास भेट दिली.

**स्वामी अखंडानंद शाखा :** दर शनिवारी शाखेत शाखेच्या त्रैमासिक अंकातील 'जावे आठवणींच्या गावा' या सदराद्वारे जुन्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या आठवणी कथन केल्या जातात. त्यापैकीच शाखाप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळलेल्या सर्वश्री संजय तांबट, विनोद बिबवे व दत्ता सकट यांच्या मुलाखतींचे वाचन करण्यात आले. शाळेमध्ये निवासाला आलेल्या वारकऱ्यांबरोबर कबड्डी खेळ खेळण्यात आला. वारकऱ्यांना खूप आनंद मिळाला. शाखेविषयी माहितीही त्यांना सांगितली.

- गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने जवळपास २५ शिक्षकांकडे संपर्क झाला. हाताने तयार केलेले छोटे नारळ आणि रिबीनीपासून तयार केलेले गुलाब जाड पुठ्ठ्यांवर सजवून शिक्षकांना भेट दिले.
- १९ जुलैला गटशः 'आकाशवाणी स्पर्धा' घेण्यात आली. मुलांना स्पर्धेची सूचना आठवड्यापूर्वी देण्यात आली होती. मुलांनी त्याची उत्तम तयारी केली होती. त्याच दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक श्री. विजयसिंह पाटील हे शाखेवर आले होते. एका गटात त्यांची मुलाखत घेण्यात आली. त्यामुळे या स्पर्धेद्वारे त्यांचा सर्वांना परिचय झाला.
- २९ जुलै रोजी आदरणीय किशाभाऊ सरांच्या पुण्यतिथीनिमित्त वेगळ्या उपक्रमाने श्रद्धांजली वाहण्यात आली. या दिवशी युवकांनी आपल्या शाखेच्या वर्गातील वर्धकांना पत्रे लिहिली व ती पोस्टाने पाठविली. मा. किशाभाऊंनी त्यांच्या सामाजिक आयुष्यात या पत्रांच्या जोरावर खूप मोठ्या माणसांची मने जिंकून वर्धिनीशी जोडली.
- २ ऑगस्टला 'पाककला' ही स्पर्धा झाली. दुधापासून विविध पदार्थ जसे लस्सी, रबडी, बासुंदी, क्रीम, शिरखुर्मा, फ्रूट सॅलॅड इ. वर्धकांनी बनविले. या स्पर्धेचे परीक्षण कु. वैष्णवी भगेकर हिने केले.
- २४ ऑगस्टला सजावट कार्यशाळा झाली. मार्गदर्शन करण्यासाठी सौ. शोभना साठे यांनी दुधाच्या पिशव्यांपासून फुले, त्याच्या माळा तसेच झुरमुळ्या, कागदापासून चक्र, समोसा, फूल, कागदापासून बाऊल, सीडीपासून आकर्षक रांगोळी, नक्षी प्रत्यक्ष करवून दाखवल्या व त्यामध्ये काय विविधता असू शकते हे सांगितले व मुलांचे गट पाडून मुलांकडून ते बनवून घेतले.

**पुढचे पडले तर मागच्यांनी आपले कर्तव्य बजावणे यातच खरे समाधान आहे, रडण्यात नाही !**

- दि. २१ ऑक्टोबरला उपलब्ध साधनांमधून प्रतिकृतीद्वारा उद्यान, क्रीडा संकुल, गाव व आधुनिक शहर अशा संकल्पना वर्धकांनी सादर केल्या. मुलांच्या कल्पकतेला यातून वाव मिळाला. आधुनिक शहराच्या प्रतिकृतीला बक्षीस मिळाले.

**स्वामी दयानंद शाखा :** शाखेवर खालील पाच उपक्रम घेण्यात आले - १) दर शनिवारी माध्यम (मीडिया) या विषयावर एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी विविध खेळ व कार्यक्रम घेतले. २) विज्ञान दिन साजरा करण्यात आला. वर्धकांनी विविध प्रयोगांचे सादरीकरण केले. ३) श्री. ज्ञानेश पुरंदरे यांची मुलाखत घेण्यात आली. ४) चित्रपट बनविण्याची माहिती सांगितली. ५) दृष्टी सातत्य या संकल्पनेवर आधारित हॉलो क्राफ्ट व फ्लिपबुक तयार करण्यास शिकवले.

- एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या कु. पायलताई आणि त्यांच्या सात सहकाऱ्यांनी गत तीन महिने चालवलेल्या कार्यशाळेचा समारोप लक्षात राहील असा झाला. वर्धकांना दृष्टीसातत्य (पर्सिस्टंट ऑफ व्हीजन) या विषयाची माहिती काही रंजक खेळांच्या आधारे देण्यात आली. त्याचप्रमाणे चित्रपटसृष्टीची भारतात सुरुवात कशी झाली याचा इतिहास सांगण्यात आला. ॲनिमेशनच्या विविध प्रकारांची प्रात्यक्षिके मुलांना करून दाखवली.

**स्वामी शिवानंद शाखा :** पालखीचा मुक्काम पुण्यात असताना शाखेतील वर्धकांनी वि. स. खांडेकर शाळेत मुक्कामासाठी उतरलेल्या वारकऱ्यांशी गप्पा मारल्या. 'माऊलींबद्दलचे प्रेम' व 'विठ्ठलाची ओढ' यामुळेच वारीचे अंतर कधी संपते हे कळत नाही. हा सुखाचा सोहळा असतो, हे वारकऱ्यांच्या बोलण्यातून पदोपदी जाणवत होते.

**धर्मवीर शंभूराजे शाखा :** शाखेत मानसिक विकास बैठकीला श्रीमती सुधा मूर्ती यांच्या 'गोष्टी माणसांच्या' पुस्तकाचे वाचन केले.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा :** दि. १५ जूनला 'गणेश कला क्रीडा मंच' येथे आयोजित लोकमान्य टिळक यांची 'मंडालेहून सुटका' या शताब्दी वर्षानिमित्त झालेल्या कार्यक्रमाला शाखेतील वर्धक आवर्जून गेले होते. या कार्यक्रमाला बहुतांशी क्रांतिकारकांचे वंशज उपस्थित होते. वर्धकांनी त्यांच्याशी ओळख करून घेतली व त्यांच्या स्वाक्षऱ्या पण घेतल्या. या कार्यक्रमाला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे व पद्मविभूषण रघुनाथ माशेलकर उपस्थित होते. या दिग्गज व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा लाभ यावेळी वर्धकांना लाभला.

- वर्धकांनी शाखा ज्या शाळेत भरते त्या शाळेत मुक्कामासाठी आलेल्या वारकऱ्यांशी गप्पा मारून 'वारीचा आनंद काय असतो' हे जाणून घेतले. वरवंडहून आलेल्या वारकऱ्यांना वर्धकांनी २०० लाडूंचे वाटप केले.
- २८ नोव्हेंबरला शाखेत शिवप्रतापदिन साजरा झाला. प्रतापगडावरील अविस्मरणीय प्रसंगाचे वर्णन शाखेतील युवकाने केले. शिववंदनेने परिसर दुमदुमून गेला.

**राजर्षी शाहू शाखा :** दि. १४ जूनला २५ वर्धक व ५ युवकांनी सारसबाग, महालक्ष्मी मंदिर व कात्रज येथील 'राजीव गांधी सर्पोद्याना'ला भेट दिली. कात्रज उद्यानात वर्धक प्राणीविश्वात रमून गेले. विविध प्राणी

**कर्म थोडे करा किंवा जास्त करा ते कधी फुकट जात नसते. कर्माची सारखी वृद्धीच होत असते.**

पहात, माहिती मिळवत ती माहिती वहीत टिपून घेत होते.

**स्वामी विवेकानंद शाखा :** दि. २६ जानेवारीला गणतंत्र दिवशी वर्धकांकडून संकल्प करून घेतले व ध्वजाचा अपमान टाळण्यासाठी पूर्ण वस्तीत फिरून राष्ट्रध्वज जमिनीवर पडणार नाही यासाठी लोकजागृती केली.

- दिनांक ३ फेब्रुवारीला गणेश जयंतीनिमित्त विविध गुणदर्शन स्पर्धा झाली.
- परोपकार मित्र मंडळाच्या शिवजयंतीच्या कार्यक्रमामध्ये शाखेतील वर्धकांनी पोवाडे व पद्यांचे गायन केले व मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर केले.
- ५ नोव्हेंबरला डॉ. प्रकाश आमटे यांच्यावरील माहितीपट दाखवण्यात आला. मुलांना 'हेमलकसा प्रकल्पा'ची, डॉ. आमटे यांच्या कार्याची माहिती मिळाली.
- ६ नोव्हेंबरला लहान गटातल्या मुलांनी 'शिबिराचे फायदे-तोटे' यावर गटचर्चा केली. यात मुलांनी शिबिराचे झालेले फायदे उत्साहाने मांडले.
- मोठ्या गटातल्या मुलांना 'ABP माझा' या वाहिनीने तयार केलेला 'सिंहासन' हा लघुपट दाखवण्यात आला. लघुपटातून काश्मीरचा इतिहास व आजचे काश्मीर यांची तोंडओळख मुलांना झाली.
- ७ नोव्हेंबरला शाखेतल्या युवकांनी 'कविता कशी करावी' यावर छोटी कार्यशाळा घेतली. शाखेतल्या मुलांनी वेगवेगळ्या विषयांवर कविता केल्या व त्याचे वाचन झाले. यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला.

**स्वामी अभेदानंद शाखा :** १२ जानेवारीला स्वामी विवेकानंदांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त शाखेने तीन ठिकाणी पथनाट्य सादरीकरण केले. १) देना बँक, डेक्कन २) झाशीची राणी चौक, बालगंधर्व ३) फर्ग्युसन महाविद्यालय.

बुधवार १९ फेब्रुवारीला शिवजयंतीनिमित्त कथाकथन स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रथम क्रमांकावर कु. अक्षय मोरे, द्वितीय क्रमांकावर कु. हर्षद पेंढार, तृतीय क्रमांकावर कु. स्वराज म्हाळगी व कु. ओंकार साळुंखे या वर्धकांची निवड झाली.

- प्रत्येक शनिवारी, रविवारी पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे श्री. अमोल पाटील व त्यांचे सहकारी नाट्य प्रशिक्षणासाठी नियमित येत असतात.
- दि. १६ मार्चला होळीनिमित्त शाखेने 'कचरासुराची होळी' पेटवली व परिसरातील कचरा गोळा करून कचऱ्याच्या पेटीत टाकला.
- धुलिवंदनानिमित्त 'पाणी वाचवा व मतदान करा' असे आवाहन परिसरातील नागरिकांना करण्यात आले.
- मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा, ती अजून वाढावी ह्या उद्देशाने शाखेत 'टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणे' अशी स्पर्धा झाली. सर्वांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.
- १३ सप्टेंबरला शाखेत चांदणी भोजनाचा कार्यक्रम झाला. वर्धकांना 'ज्युरासिक पार्क' हा शास्त्रीय पण मनोरंजनात्मक चित्रपट दाखवला.

**भगिनी निवेदिता शाखा :** ६ जानेवारीला पत्रकार दिनानिमित्त 'चला पत्रकार बनू या' ही स्पर्धा घेण्यात

**तुम्ही आपल्या कर्माचा पडदा जर स्वच्छ काचेसारखा कराल तर त्यातून परमेश्वर दिसेल.**

आली. मुलींनी अतिशय सुरेख व उत्कृष्ट अशी वर्तमानपत्रे बनविली. या स्पर्धेनंतर वर्धिका शिल्पा पोफळे ताईने मुलींना मार्गदर्शन केले व वर्तमानपत्र बनविण्यासंदर्भातील प्रक्रिया समजावून सांगितली. मुलींना या निमित्ताने पत्रकारितेविषयीच्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली व नवीन माहितीही मिळाली. मुलींना ही स्पर्धा खूप आवडली.

- २५ जानेवारीला शाखेत 'पटकथा लेखन' स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुलींनी विविध विषय निवडून पटकथा लिहिल्या.
- दि. १२ मे ला शाखेत पोवाडे स्पर्धा झाली. या स्पर्धेत शाखेतील वर्धिका कु. समृद्धी यादव (७ वी) हिने मुलींना नवीन पोवाडा शिकवला व त्याचा अर्थही सांगितला.
- दि. १६ मे ला शाखेत 'आदर्श देशात काय असायला हवं ?' याबद्दल 'प्रतिकृती तयार करणे व त्याची मांडणी करणे' ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत त्यांनी देशातील सुव्यवस्था व राजकारण या मुद्द्यांवरही खूप उत्तम चर्चा केली.
- दि. १८ मे ला शाखेतील कु. श्रुतिका मोहिते (५ वी) व कु. सुफिया शेख (५ वी) या वर्धिकांनी मुलींना टाकाऊ वस्तूंमधून विविध प्रकारचे पेन स्टँड तयार करायला शिकवले.
- दि. २६ मे ला Tellus Organisation च्या वतीने पर्यावरणावर आधारित Animated Films गरवारे बालभवन येथे दाखविण्यात आल्या. तेथे शाखेतील सतरा वर्धिका उपस्थित होत्या.
- दि. ५ जूनला पर्यावरण दिनानिमित्त Tellus Organisation, लोकमत व दरोडे जोग बिल्डर्स यांच्यावतीने हनुमान टेकडी येथे वृक्षारोपण करणे व रॅली असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तेथे शाखेतील मुलींनी सहभाग घेतला.
- ८ ऑगस्टला शाखेत श्रावणी शुक्रवार निमित्त 'पावसातील कविता' हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात पालकांचाही सहभाग होता. या कार्यक्रमात वर्धिकांनी पावसाळ्यातील वेगवेगळ्या कविता सादर केल्या होत्या. वर्धिकांनी त्या कवितांना नवीन चालही लावली. या कार्यक्रमात विशेष म्हणजे काही वर्धिकांनी स्वत: कविता बनविल्या व सादर केल्या.
- १९ ऑक्टोबरला वर्तमानपत्राच्या कागदापासून आकर्षक आकाशकंदील बनवण्यास मुलींना शिकवले. हेच आकाशकंदील सर्वांनी घरी लावले होते. शाखेतील प्रत्येक वर्धिकेने किमान दहा पाकीटे उटणे घरोघरी फिरून विकण्याचा यशस्वी प्रयत्न केला. यामुळे वर्धिनीचा संपर्क व विक्रीचे कौशल्य या गोष्टी साध्य करता आल्या.

**घोरपडे पेठ शाखा :** दि. १४ जानेवारीला शाखेच्या परिसरातील शिपाई, कर्मचारी आणि उदरनिर्वाह न करू शकणाऱ्या बांधवांना तिळगूळ देऊन वर्धिकांनी संक्रांत साजरी केली.

- २६ फेब्रुवारीला स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृतीदिनानिमित्त सावरकर स्मारकाजवळ 'ने मजसी ने' या गीताचे गायन करण्यात आले.
- ११ व १२ मार्चला ७ वीची विद्यार्थिनी कु. प्रज्ञा चिंतामणी हिने भेटकार्डे बनवण्याचे प्रशिक्षण दिले.

**गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ करून देणे हे पवित्र कर्तव्य आहे.**

## तासिका व्यवस्था

**स्वामी श्रद्धानंद शाखा :** इयत्ता ७ वी च्या मुलांनी वर्धिनीत घेण्यात आलेल्या इतिहास व भूगोल प्रश्नमंजूषेत पहिला क्रमांक मिळविला. शाखेत मुलांनी सामान्य ज्ञानावरील प्रश्न स्वत: काढून ते दररोज सर्वांना विचारले. त्यामुळे त्यांचे सामान्य ज्ञान वाढण्यास मदत झाली. वर्धकांना विज्ञानातील मूलभूत संकल्पना कळाव्यात या हेतूने सूर्यमाला, मानवी शरीर रचना या विषयांवरील दृकश्राव्यफिती दाखवल्या. त्यानंतर प्रश्नोत्तर रूपात त्यावर चर्चा झाली.



२१ सप्टेंबरला 'अभ्यास कसा करावा ?' या विषयावर ज्ञानप्रबोधिनीतील श्रीमती शीतलताई यांनी मुलांना मार्गदर्शन केले. 'SMART' स्टडीचे महत्त्व त्यांनी असे सांगितले – S - Specific, M - Measurable, A - Achievable, R - Realistic. T - Timebound. येणाऱ्या सहामाही परीक्षेच्या तयारीसाठी या व्याख्यानाचा निश्चित फायदा झाला.

**स्वामी अखंडानंद शाखा :** दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत सौ. आशा देशपांडे यांनी संस्कृत प्रशिक्षण वर्ग घेतला. शाखेमध्ये विज्ञानदिन साजरा करण्यात आला. यावेळी वक्ते म्हणून श्री. सुनील कुलकर्णी सर उपस्थित होते. विज्ञानाची गोडी कशी निर्माण करायची ? याविषयाला अनुसरून त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमासाठी शाखेतल्या प्रत्येक मुलाला पाच प्रवेशिका देण्यात आल्या. वर्धकांनी शाळेतील व घराजवळील पाच मित्रांना आपल्यासोबत कार्यक्रमाला आणण्याचा प्रयत्न करावा असे ठरले होते. त्या दिवशी एकूण बाहेरची एकवीस मुले शाखेत उपस्थित होती.

- विज्ञानदिनामध्ये शाखेतील इ. ५ वी, ६ वीच्या विद्यार्थ्यांनी पवनउर्जेवर आधारित प्रतिकृती तयार केली होती. इ. ७ वीच्या मुलांनी 'सौरचूल' या विषयाचे संगणकाच्या साहाय्याने सादरीकरण केले. 'अपारंपारिक ऊर्जास्रोत ही काळाची गरज असून आपण सर्वांनी त्याचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे' असे परीक्षकांनी सांगितले.
- दि. १ ते १० मार्च : इंग्रजी व गणित तसेच मराठी, हिंदी, व्याकरणाचा सराव व अभ्यास घेण्यात आला.
- दि. १५, १६, १७ मार्चला शाखेची वार्षिक परीक्षा घेण्यात आली. विज्ञान, गणित इंग्रजीचा संपूर्ण अभ्यासक्रम व उजळणी घेऊन ही परीक्षा घेण्यात आली.

**गरीब परंतु बुद्धिमान विद्यार्थ्यास अधिक उत्तेजन दिल्यानेच देशात विद्येची अभिवृद्धी जास्त होण्याचा संभव आहे.**

- श्रीमती वनमाला जोशी यांचे 'परीक्षेची तयारी व घरातील वातावरण' या विषयावर बोलणे झाले.
- २६ जुलैला अभ्यासपूरक कौशल्ये वाढवण्यासाठी श्री. प्रवीण दामजी यांनी हस्ताक्षर कार्यशाळा घेतली. अक्षर कसे वळणदार काढावे ? काना, मात्रा, वेलांटी कसे द्यावेत हेही सरांनी सांगितले. सरांनी एक-एक अक्षर शिकवले. लिहीत असताना कोणत्या चुका होतात आणि चुका होऊ नये म्हणून काय करावे, हे सांगितले.
- वर्धकांमधील विविध कौशल्य सुधारण्यासाठी शिक्षकदिनानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक इयत्तेतील एका वर्धकाने त्याच इयत्तेवर गणित, विज्ञान, इंग्रजी हे विषय शिकविले.



- ७ वी ते ९ वीच्या वर्धकांसाठी 'अभ्यास तंत्र' ह्या विषयावर व्याख्यान झाले. टाटा मोटर्सच्या सोनम ताई यांनी वर्धकांना या विषयावर मार्गदर्शन केले.
- १० ते १६ नोव्हेंबरला अभ्यास कौशल्य वर्ग घेण्यात आला. हस्ताक्षर वाचन, टिपण, इंग्लिश भाषा कौशल्य हे विषय घेण्यात आले. अभ्यास वर्गाचा समारोप श्री. शिरीष पटवर्धन सरांनी केला.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा :** २२ सप्टेंबरला सहामाही परीक्षेच्या दृष्टीने 'अभ्यास करण्याचे तंत्र' या विषयावर सौ. वनमाला जोशी यांचे ५ वी ते ७ वी या गटासाठी व २८ सप्टेंबरला ज्ञान प्रबोधिनीतील जयश्रीताईंचे ८ वी ते १० वी या गटासाठी व्याख्यान झाले.

**स्वामी शिवानंद शाखा :** शाखेतील ८ वी, ९ वी, १० वीच्या वर्धकांचा संगणक प्रशिक्षणवर्ग सुरू करण्यात आला. दर रविवारी हा वर्ग होतो. तसेच वर्धकांचे हस्ताक्षर व शुद्धलेखन सुधारण्याच्या दृष्टिकोनातून विविध उपक्रम घेण्यात आले.

- शाखेमध्ये इयत्ता १० वीसाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आले. त्यामध्ये इंग्रजी भाषेविषयी एक सत्र झाले. 'इंग्रजी कसे बोलावे ?' याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.
- स्वामी अखंडानंद शाखेने आयोजलेल्या 'अभ्यास तंत्र' या व्याख्यानासाठी सर्व वर्धक गेले होते. मुलांना सहामाही परीक्षेसाठी या मार्गदर्शनाचा चांगला फायदा झाला.

**धर्मवीर शंभूराजे शाखा :** भागश: झालेल्या विज्ञानदिनी शाखेतील वर्धकांनी 'अपारंपारिक ऊर्जास्रोत' या विषयावर प्रकल्प सादर केले. पवनचक्की ही भविष्यामध्ये एक उपयुक्त ऊर्जा स्रोत आहे हे वर्धकांनी प्रकल्प सादरीकरणामधून मांडले.

**इतर नैसर्गिक मनोवृत्तींप्रमाणे गायनाभिरुचीसहि चांगले वळण देणे हे सुशिक्षणाचे एक प्रधान अंग आहे.**

- दि. १६ जूनला शाळा शुभारंभ दिनी शाखेत श्री. ज्ञानेश पुरंदरे यांचे कथाकथन झाले. 'अभ्यासाचे सातत्य असेल तर प्रत्येक परीक्षा आपण उत्तमरीत्या देऊ शकतो. सरावाने प्रत्येकजण परिपूर्ण होतो' हा संपूर्ण कथेचा गाभा होता.
- जुलै महिन्याचे अभ्यासाचे नियोजन देण्यात आले. रात्रकार्यक्रमाला आंबेगाव पठार येथील PSI श्री. क्षीरसागर सर यांच्याशी मनमोकळा संवाद झाला. पोलिस खात्याची ओळख, पोलीस भरती, शारीरिक, बौद्धिक परीक्षा या संदर्भात त्यांनी वर्धकांना अनौपचारिक मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्या सहकारी कॉन्स्टेबल श्रीमती राणी शिंदे याही उपस्थित होत्या.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा :** पु. ल. देशपांडे उद्यानास भेट देऊन तेथील जैवविविधतेची माहिती वर्धकांना सांगण्यात आली.

आषाढी वारीची मुलांना ओळख व्हावी म्हणून ९ जुलैला 'वारी' या विषयावर निबंध लेखन स्पर्धा झाली. ४ नोव्हेंबरला ज्ञानप्रबोधिनीच्या युवकांनी विज्ञानाचे प्रयोग मुलांना दाखवले.

**राजर्षी शाहू शाखा :** 'अक्षर शोध' ही नाविन्यपूर्ण स्पर्धा शाखेवर झाली. विविध अक्षरं देऊन, शब्द शोधून त्याला इंग्रजी शब्द शोधणे अशी ही स्पर्धा होती.

**स्वामी विवेकानंद शाखा :** १७ सप्टेंबरला 'हिंदी दिन' साजरा झाला. प्रत्येक वर्धकाचे दोन मिनिटे हिंदी भाषा, हिंदी दिन व त्याचे महत्त्व याबद्दल माहिती सांगितली. ७ नोव्हेंबरला शाखेतल्या युवकांनी कविता कशी करावी यावर छोटी कार्यशाळा घेतली. शाखेतल्या मुलांनी वेगवेगळ्या विषयांवर कविता केल्या व त्याचे वाचन झाले. यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला.

**स्वामी अभेदानंद शाखा :** शनिवार ८ फेब्रुवारीला श्री. विक्रांत दिघे यांनी 'वाचन वेग' या विषयाचे सत्र घेतले.

**भगिनी निवेदिता शाखा :** १२ जानेवारीला शाखेतील मुलींसाठी 'हस्ताक्षर वर्ग' घेण्यात आला होता. १९ जानेवारीला अक्षरभारतीच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेसाठी शाखेतील श्रावणी जाधव, डिंपल कांबळे व शगुफ्ता शेख या मुलींची निवड झाली. या तिनही वर्धिका उपान्त्य फेरीपर्यंत पोहोचल्या. अक्षरभारतीच्या वतीने प्रशिस्तपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

दि. २८ जूनला गणितातील गमतीजमती या विषयावर श्रीमती मनीषाताई पाठक यांचे व्याख्यान झाले. पाढे, वर्ग कसे तयार करायचे, गणिताचा अभ्यास कसा करावा हे ताईंनी समजावून सांगितले.

शाखेत 'हिंदी दिन' साजरा करण्यात येतो. तसेच आठवड्यातील बुधवार व गुरुवार या दिवशी सर्वजण एकमेकांशी हिंदीतून संवाद साधतात.

❖ ❖ ❖

**संकटांनी न डगमगता कार्य सिद्धीस नेणारे पुरुष ज्या चळवळीस मिळतात त्याच चळवळीला जिवंत चळवळ म्हणतात.**

# संपर्क व्यवस्था

**वस्तीशी संपर्क सोडणार नाही :**

संपर्क हा वर्धिनीच्या कामाचा आत्मा समजला जातो. शाखा सुटल्यावर रोज युवक वर्धकांच्या घरी जाऊन वर्धकांची प्रगती, घरातील अडचणी अशा अनेक विषयांवर अनौपचारिक गप्पा मारून घराला वर्धिनीशी जोडण्याचा प्रयत्न करतात.

शिवानंद शाखेचा शाखाप्रमुख स्वप्नील कुंभारकर गेल्या सहा महिन्यांपासून शाखेत कार्यरत आहे. शाखेतील वर्धकांची संख्या कमी असल्याने तळजाई टेकडीच्या वस्तीत त्याने व इतर सहकाऱ्यांनी कसून संपर्क सुरू केला. स्वप्नील जेव्हा वस्तीमध्ये फिरला, अनेक घरांशी संवाद साधून त्याची या वस्तीशी बांधिलकी निर्माण झाली. म्हणूनच अगदी सहजपणे तो म्हणून जातो की 'सर, काही झाले तरी ही वस्ती सोडणार नाही. संपर्क चालूच ठेवणार आहे. वस्तीतील जास्तीत जास्त मुलांना आपल्या कामाचा लाभ कसा देता येईल यासाठी कार्यरत राहीन.' वर्धिनीच्या कामातून शाखेपुरती असलेली बांधिलकी एका वस्तीशी अगदी सहजरीत्या कशी निर्माण होते याचे हे उत्तम उदाहरण.

पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या ।
आम्ही भिन्न ना त्यांचिया पासूनी ।।

**पालकांच्या दृष्टीने वर्धिनीची शाखा :**

स्वामी ब्रह्मानंद शाखेच्या पालकसभेत वर्धिनीविषयीचे पालकांना मत विचारले असता विविध प्रतिक्रिया आल्या. एका पालकांनी सांगितले, 'एकीकडे आम्ही पाहतो की, शेजारच्या मुलांचे क्लास (खाजगी शिकवणी)वाले घरी फीसाठी वारंवार फोन करतात. पैसे कधी देणार याचा तगादा लावतात, तर दुसरीकडे वर्धिनीचे मेहनती युवक आमच्या मुलांच्या प्रगतीसाठी महिन्यातून एकदा घरी येतातच. मुलांच्या अभ्यासाची चौकशी करतात. घरची सामाजिक परिस्थिती पाहून आवश्यक ती मदत करतात. वर्धिनीच्या युवकांनी आमच्यापेक्षा जास्त जीव आमच्या मुलांना लावला.'

❖ ❖ ❖

स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवकाच्या घरी संपर्काचा हा पुढचा अनुभव. वर्धक ५ वीपासून शाखेत. तसा मजबूत संपर्क आजतागायत चालू आहे. दिवाळीत संपर्काला गेलेलो असताना युवकाच्या आईच्या डोळ्यात संवाद करता करता पाणी आले. यावर त्यांना शांत करून विचारले. त्या मला म्हणाल्या की, 'आमच्या मुलाचा सख्खा मामा पण जितक्या वेळा घरी आला नाही तितक्या वेळा तुम्ही घरी आलात. प्रत्येक बारीक गोष्ट आपण लक्षात ठेवली. घराच्या सुखदु:खात सहभागी झालात. योग्य मार्गदर्शन, कौतुक केले. वडीलांच्या तब्येतीची चौकशी केली. सख्ख्या नातेवाईकांपेक्षा वर्धिनीच्या युवकांनी जवळचे नाते निर्माण केले.'

❖ ❖ ❖

**कोणत्याही चळवळीला जिवंतपणा येण्यास माणसे एकनिष्ठ लागतात.**

## व्याख्याने

वर्षभरामध्ये शाखेत झालेली व्याख्याने पुढीलप्रमाणे :

| विषय | वक्ते | शाखा |
|---|---|---|
| सावित्रीबाई फुले | कु. तेजश्री शिंदे | घोरपडे पेठ शाखा |
| नेताजी सुभाषचंद्र बोस | श्री. ज्ञानेश पुरंदरे | घोरपडे पेठ शाखा |
| अभ्यास कौशल्य | कु. ऐश्वर्या गुंदे | घोरपडे पेठ शाखा |
| एकाग्रता | डॉ. गुप्ते | समर्थ रामकृष्ण शाखा |
| शिवचरित्र | श्री. सौरभ अग्निहोत्री | समर्थ रामकृष्ण शाखा |
| स्वामी विवेकानंद | श्री. सुरेश पाटील | स्वामी विवेकानंद शाखा |
| सर्प - माझे मित्र | श्री. अभिजित दिघे | स्वामी विवेकानंद शाखा |
| गुरु-शिष्य संकल्प सोहळा | श्री. संजय चितळे | स्वामी विवेकानंद शाखा |
| दसरा | श्री. हर्षल सोनार | स्वामी विवेकानंद शाखा |
| ग्रेट भेट | डॉ. राजेंद्र हिरेमठ | स्वामी विवेकानंद शाखा |
| सावित्रीबाई फुले | श्री. संदीप मोरे | स्वामी अखंडानंद शाखा |
| प्रवचन | श्री. ओंकार गायकवाड | स्वामी अखंडानंद शाखा |
| शिवचरित्राचे वाचन का, कशासाठी ? | श्री. कृष्ण भीमपल्ली | स्वामी श्रद्धानंद शाखा |
| गोपाळ गणेश आगरकर | श्री. सुहास आगरकर | स्वामी अभेदानंद शाखा |
| राजर्षी शाहू महाराज | श्री. विपुल शेलार | स्वामी अभेदानंद शाखा |
| गुरुचे महत्त्व | श्री. प्रकाश पारखी | स्वामी अभेदानंद शाखा |
| बद्रीनाथ व वैष्णोदेवीची माहिती | श्री. प्रदीप कुमार | भगिनी निवेदिता शाखा |
| शिवचरित्र | श्री. संजय चितळे | भगिनी निवेदिता शाखा |
| गप्पाष्टक | श्री. निलेश धायरकर | भगिनी निवेदिता शाखा |
| भारुड | कु. अहिल्या धायगुडे | भगिनी निवेदिता शाखा |
| पाणी | श्री. विलास कुलकर्णी | भगिनी निवेदिता शाखा |
| अहिल्याबाई होळकर | सौ. दीक्षित | धर्मवीर शंभूराजे शाखा |
| सकारात्मक विचारसरणी | सौ. सुजाता शेणई | स्वामी ब्रह्मानंद शाखा |
| लोकमान्य टिळक | श्री. निलेश धायरकर | स्वामी ब्रह्मानंद शाखा |

**राष्ट्रीय हितासारखा मोठा लाभ करून घेण्यास प्रत्येकाने काही तरी झीज सोसलीच पाहिजे.**

## वर्धापन दिन

**समर्थ रामकृष्ण शाखा :** शाखेचा ३४ वा वर्धापन दिन दि. १३ मे ला साजरा करण्यात आला. वर्धापनदिनी वर्धकांना पेशवे ऊर्जा उद्यान येथे नेण्यात आले. अनेक साहसी खेळांचा आनंद मुलांनी लुटला.

**स्वामी श्रद्धानंद शाखा :** शाखेचा १० वा वर्धापनदिन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ श्री. जनार्दन इंगळे उपस्थित होते. वर्धापनदिनाच्या निमित्ताने वर्धकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. महेश ढवळे या युवकाने वर्धकांचे 'माऊली माऊली' हे गीत बसविले व कार्यक्रमात सादर केले. सुजीत तिवारी या ६ वीतील वर्धकाने ''हम को मन की शक्ती देना'' हे वैयक्तिक गीत सादर केले. प्रवीण पासलकर या युवकाने ३० वर्धकांच्या मनोऱ्यांचे प्रात्यक्षिक बसविले होते. शाखेतील काही वर्धक युवकांनी आपली मनोगते याप्रसंगी मांडली.

**स्वामी अखंडानंद शाखा :** १२ ऑक्टोबर रोजी शाखेचा 'वर्धापनदिन' साजरा झाला. कार्यक्रमास श्री. अनंत अभंग प्रमुख वक्ते होते. सभागृहाच्या बाहेर रांगोळी काढून, प्रदर्शनी मांडून सजावट केली होती. कार्यक्रमाची सुरुवात ओंकार पूजनाने व 'डॉ. प्रकाश आमटे' चित्रपटातील प्रार्थना गीताने झाली. सहामाही आढाव्यानंतर छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रम झाला. त्यात गणेशवंदना, कोळीगीत, अभंग व 'सांस्कृतिक प्रदूषण' हे पथनाट्य सादर झाले. श्री. अभंग सरांनी मुलांना प्रश्नोत्तर रूपात गप्पा मारून मार्गदर्शन केले. शाखेत वर्धापनदिनानिमित्त सूर्यनमस्कार, जोर स्पर्धा, योगासने, गटश: कबड्डी, खोखो अशा मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

**स्वामी दयानंद सरस्वती शाखा :** वर्धापन दिन : ९ ऑगस्ट. शाखेचा यंदा १२ वा वर्धापन दिन साजरा झाला. वर्धापनदिनानिमित्त 'स्व'-रूपवर्धिनीची ओळख' या विषयावर १०० मुलांनी महानाट्य सादर केले. यावेळी साधारण ४०० पालक उपस्थित होते. शाखेच्या 'त्रैमासिका'चे प्रकाशन झाले. प्रमुख पाहुणे धनंजय महाडीक (मा. ऑलिंपिक खेळाडू (हॉकी), सध्या S.T.I.) सरांनी त्यांनी केलेल्या स्वकष्टाचे व ऑलिंपिकचे अनुभव सांगितले. वक्ते म्हणून श्री. ज्ञानेश पुरंदरे लाभले होते.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा :** ३ ऑगस्टला शाखेचा वर्धापनदिन साजरा झाला. शाखेने १२ व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त शाखेने सकाळी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. २७ रक्तपिशव्यांचे संकलन झाले. तसेच संध्याकाळच्या कार्यक्रमात सूर्यनमस्कार व योगासनांची प्रात्यक्षिके झाली. श्री. श्रीकांत यादव सरांच्या हस्ते विशेष बक्षिसे दिली गेली.

आदर्श खेळाडू – कु. दिलीप अटके.<br>
आदर्श अभ्यासू – कु. अथर्व जाधव (लहान गट)<br>
– कु. शंकर कुमावत (मोठा गट)<br>
आदर्श वर्धक – कु. वैभव सकपाळ

श्री. श्रीकांत यादव यांनी आपल्या भाषणातून 'आजच्या काळात 'स्व'-रूपवर्धिनीची गरज' हा विषय

जन्ममृत्यु ही केवळ एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत जाण्याची द्वारे आहेत.

त्यांच्या वर्धिनीतील लहानपणीच्या आठवणीतून मांडला.

**नरवीर तानाजी मालुसरे शाखा :** यंदा शाखेचा ४ था वर्धापन दिन संस्थेचे उपाध्यक्ष श्री. उदय गुजर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळेस मुलांनी 'ग्रामीण स्वच्छता' ह्या विषयावर पथनाट्य केले. शाखेच्या वर्धकांनी शाखेमुळे चांगल्या सवयी कोणत्या लागल्या याविषयी मनोगत व्यक्त केले.

**स्वामी विवेकानंद शाखा :** वर्धापन दिन : ४ जुलै. यंदाच्या वर्धापनदिनाला जगन्नाथ राठी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्राध्यापक श्री. कानिटकर सर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. शाखेने लाठीकाठी, सूर्यनमस्कार, योगासने यांचे प्रात्यक्षिक सादर केले. डोळ्याला पट्टी बांधून २० वर्धकांनी सामुहिक सूर्यनमस्कार घातले. कानिटकर सरांनी दैनंदिन शाखेचा भविष्यात होणाऱ्या लाभांची पालकांना माहिती दिली. एकूण उपस्थिती १५० होती.

**स्वामी अभेदानंद शाखा :** शाखेचा १७ वा वर्धापन दिन २६ ऑक्टोबरला साजरा झाला. यात एकूण १०० संख्या उपस्थित होती. पालकांना शाखेच्या कामाची ध्वनीचित्रफित दाखवण्यात आली. वर्धापन दिनानिमित्त 'रक्तदान शिबिर' आयोजित केले होते. एकूण २१ रक्तपिशव्या संकलित झाल्या. सायं. ६.३० ते ८.३० या वेळेत वक्ते श्री. शिरीषराव आपटे यांनी समाजामधील व्यक्तींमध्ये वागताना, त्यांच्यामध्ये राहताना कशा प्रकारे रहावे, आदर्श व्यक्ती बनण्यासाठी काय काय करावे याबद्दलचे मार्गदर्शन केले.

**भगिनी निवेदिता शाखा :** यावर्षी १ जूनला शाखेचा २६ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाला प्रमुख वक्त्या म्हणून सौ. अंजली देशपांडे (अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्या) उपस्थित होत्या. त्यांनी पालकांना 'मुलांना चांगल्या सवयी कशा लावाव्यात, मुलांनी सर्व भाज्या खाल्ल्या पाहिजेत याचे महत्त्व व त्यासाठी काय करता येईल, मुलींचा अभ्यास कशा प्रकारे घ्यावा' अशा विषयांवर पालकांसोबत चर्चा केली. शाखेतील वर्धिकांनी निवेदन, सामुहिक गीत व नानचाकूचे प्रात्यक्षिक सादर केले. शाखेला २५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त शाखेवर एक माहितीपट तयार करण्यात आला. त्यामध्ये पालकांचे मनोगत, मुलींचे व युवतींचे अनुभव तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिक युवतींचे अनुभव यांचा समावेश होता. शाखेतील वर्धिका कु. शगुफ्ता शेख (इ. ८ वी) हिच्या आईचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी शाखेचे खूप कौतुक केले. असा वाढदिवस मुद्दाम लक्षात ठेऊन साजरा केला गेला हे त्यांना खूप भावले. शाखेच्या वर्धापन दिनाला एकूण ७० संख्या उपस्थित होती व तसेच घोरपडे पेठ शाखाही उपस्थित होती.

**घोरपडे पेठ शाखा :** शाखेचा पहिलाच वर्धापन दिन साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून श्री. विश्वास ननावरे व प्रमुख वक्ते म्हणून श्री. ज्ञानेश पुरंदरे लाभले होते. स्त्री भ्रूण हत्या हा विषय घेऊन मुलींनी नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमास एकूण उपस्थिती ५२ होती. निमंत्रण पत्रिका टाकाऊ वस्तूंपासून बनवल्या होत्या.

❖ ❖ ❖

**आपले हजारो देशबांधव विपन्नावस्थेत असताना जे नाक धरून घरात बसतात ते ढोंगी आहेत.**

## विद्याधनम् योजना

'टाटा' हे नाव उद्योगविश्वात जितके परिचित आहे तितकेच ते समाजकार्यातील योगदानासाठीही परिचित आहे. टाटा उद्योगसमूहातर्फे देशभर सामाजिक समस्या, प्रश्न, तसेच समाजबांधणीचे काम करणाऱ्या अनेक संस्थांबरोबर काम चालू आहे.

यंदाच्या वर्षीपासून 'स्व'-रूपवर्धिनीबरोबर पुणे येथील टाटा मोटर्स लि. कंपनीच्या समाजविकास विभागाने काम करण्यास सुरुवात केली आहे. Corporate Social Responsibility अंतर्गत विद्याधनम् योजनेच्या माध्यमातून शिक्षण हे माध्यम निवडून वर्धिनीबरोबर जून २०१४ पासून काम सुरू झाले आहे. इ. ८ वी ते इ. १० वी हा वयोगट केंद्रस्थानी ठेवून कार्यक्रम आखून काम करीत आहोत. उपक्रमात एकूण १००० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

१) विद्यार्थी शिष्यवृत्ती २) तासिका मार्गदर्शन वर्ग ३) सहशालेय उपक्रम ४) पायाभूत सुविधा

यातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकास वाढ हा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. याचबरोबर सहशालेय उपक्रमांतून वर्धक-वर्धिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू विकसित व्हावे हा सुद्धा उद्देश या योजनेचा आहे. या योजनेअंतर्गत १५० विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च उचलण्यात आला आहे. पुढील तीन वर्षे 'स्व'-रूपवर्धिनी व टाटा मोटर्स लि. समाजविकास विभाग एकमेकांच्या सहकार्याने विद्यार्थी सर्वांगीण विकासाचे कार्य करीत राहतील.

## क्षण आनंदाचा... अभिमानाचा

शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दरवर्षी सामाजिक आणि उद्योग व्यवसाय क्षेत्रातील संस्थांचा सन्मान करण्यात येतो. यावर्षीच्या कार्यक्रमात 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रु.२५,०००/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मानपत्रामध्ये संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांनी घेतलेल्या अपार श्रमांचा आणि उभ्या केलेल्या कार्याचा यथोचित शब्दांमध्ये सन्मान करण्यात आला आहे.

या सन्मानाबद्दल शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरियल ट्रस्टच्या सर्व विश्वस्तांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

दि. २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य मातंग संघटना यांच्यातर्फे दिला जाणारा
*'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार'* वर्धिनीला मिळाला.
सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविल्याबद्दल हा पुरस्कार
वर्धिनीला प्रदान करण्यात आला.
'सन्मानचिन्ह' असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

**स्त्रीस जसे पातिव्रत्य तसे तत्त्वनिष्ठ पुरुषास तत्त्वप्रतिपालन !**

## अनुभव - एक अंकुर जोपासण्याचा !

**- सौ. वल्लरी खलाटे, सातारा**

शिक्षणासाठी आम्ही साताऱ्यातील कामाठीपुरा परिसरात राहण्यासाठी आलो. बऱ्यापैकी स्थिर झाल्यावर रोज आम्ही अजिंक्यतारा परिसरामध्ये फिरायला जाऊ लागलो. रोज ये-जा करत असताना वैदुवाडी आणि कोल्हाटवाडी हा भाग मला रस्त्यात लागायचा. ही वस्ती पाहिली की माझे मन अस्वस्थ व्हायचे. रस्त्यावर बरीच शाळकरी मुले नुसतीच खेळताना, भांडताना दिसायची. 'संध्याकाळी दिवेलागणीस या मुलांनी कधी 'शुभं करोती' म्हटले असेल का ? कोण जाणे ?' असा विचार एक दिवशी माझ्या मनात आला आणि ठरविले, की मुलांसाठी आपणच संस्कारवर्ग सुरू करायचा.

'ओम मेडिकल'च्या दादांची औषधांमुळे थोडी ओळख झाली होती. त्यांना मी 'वस्तीमध्ये तुमच्या ओळखीचे कोणी असल्यास 'दुर्गामाता मंदिर' संस्कारवर्गासाठी मिळेल का' असे विचारण्यासाठी 'तुम्ही याल का ?' असे विचारले. या दादांनी मला खूप मोठे साहाय्य केले. या मंडळाचे उपाध्यक्ष श्री. राजेश कर्नाटके यांच्याशी भेट घडवून आणली. 'मी मुलांसाठी मोफत संस्कारवर्ग व अभ्यासिका वर्ग घेईन. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. या मुलांसाठी हे काम करावे असे मनापासून वाटते. आज भेटीचा योग आला' असे काही सांगून त्यांचे मन मंदिर मिळण्यासाठी वळवले. लगेच दुसऱ्या दिवशी संपर्क करून त्या दिवशी संस्कारवर्ग सुरू केले. दि. १४ जुलै रोजी वर्ग सुरू झाला.

पहिल्याच दिवशी २५ मुले उपस्थित राहिली. श्री. कर्नाटके यांनी वस्तीतील बरीच मुले पाठवून दिली. वर्ग आता छान चालू आहे. ॐकार, गुरुर्ब्रम्हा, गायत्री मंत्र, प्रार्थना, मनाचे श्लोक, मारूती स्तोत्र, करुणाष्टक, काही गाणी व शेवटी पसायदान अशा पद्धतीने वर्गाचा आता रोजचा दिनक्रम सुरू झाला. मुले कधी कधी ४०-५० पर्यंत येतात. काही मुले मध्येच तीन-चार दिवस गैरहजर राहतात. आता यावर उपाय म्हणून वरचेवर वस्तीत जावेच लागते. आता बऱ्याच मुलांचे मारुती स्तोत्र, पसायदान, मनाचे श्लोक पाठ झाले आहेत. त्यातच सहामाही-चाचणी, शिष्यवृत्ती या परीक्षा आल्या आणि त्यामुळे एकदम मुले कमी झाली. 'मुले नुसती गाणी म्हणतात, अभ्यास नाही' असे पालक म्हणू लागले म्हणून दि. २० ऑगस्टपासून अभ्यासिका सुरू केली.

अभ्यासिका सुरू केल्यावर लक्षात आले येथील इ. पहिली, दुसरी तर जाऊच द्या, पण तिसरी, चवथीच्या मुलांना अ, आ देखील येत नाही. तोंडी पाठांतर खूपच छान आहे. कविता अगदी सुरा-तालातच म्हणतात. काहीजण तर अभिनय पण खूप चांगला करतात. पण अभ्यासाची प्रगती पाहता झोपच उडाली. इ. पहिली ते इ. पाचवी तर काही इ. सहावी, इ. सातवीच्या वर्गातील आवडीने येऊ पाहणारी पण घरात पालक अभ्यास करू देत नाही अशी सातवीच्या वर्गातील दोन मुली येऊ लागल्या. मी एकटीच पडले. माझी फजिती होऊ लागली.

**कोणचीही चळवळ यशस्वी होण्यास शरीराची पर्वा न करणारे तरुण त्या चळवळीच्या भजनी आहेत असे प्रथम सिद्ध व्हावे लागते.**

नेमके कधी कुणाला शिकवावे कळेना. पण अभ्यासिकेसहीत शाखा पाहिजेच असे मनापासून वाटत होते. 'इच्छा तेथे मार्ग' याप्रमाणे मार्ग मिळाला. मला आमच्या घराशेजारची मुलगी कु. प्रिया नलावडेही मिळाली. माझे काम जरा सोपे झाले. ती मुलांचे गणित, इंग्रजी, विज्ञान हे विषय घेऊ लागली. मुलांचा टी.व्ही. दोन ते अडीच तास बंद झाला. एवढेच नव्हे तर मुले आवडीने टीव्हीलाच 'इडीयट बॉक्स' म्हणू लागली.

मी श्रीमती पुष्पाताईंना व श्री. गणेश पवार यांना वरचेवर फोन करून वर्गाचे अनुभव सांगू लागले, त्यांनाही वर्गाची ओढ वाटू लागली. त्यांनीही बरेच मार्गदर्शन केले.

गणपती बसले. आता मुलांमध्ये खूपच फरक पडला. मुलांना आता आपल्याला खूप आग्रह करून वर्गावर आणावे लागते, याची खंत वाटू लागली. कधी कधी अठरा ते वीसच मुले येऊ लागली. आपण खूप कमी पडतो आहोत का ? असे वाटू लागले. यासाठी आता खेळ सुरू करायचे ठरवले.

मुलांमध्ये दोन गट मध्यंतरी पडले. ती सोडवताना नको नको झालं. यावर उपाय म्हणून श्रावणात 'रक्षाबंधन' कार्यक्रम घेतला. वर्धिनीच्या कार्यकर्त्या सौ. छाया गायकवाड यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले. त्या आनंदाने लगेच आल्या. या कार्यक्रमाची अनुभूती म्हणजे 'इच्छा तेथे मार्ग' हे दाखवून देणारी ठरली. दि. २० ऑगस्ट २०१४ रोजी हा कार्यक्रम ठरला. नेमक्या त्याच दिवशी येथे दंगल झाली. सातारा बंद झाला. मला मुलांसाठी खाऊ घेऊन जाता येईल की नाही याची रुखरुख लागली. एका मिठाईवाल्यांना विनंती केली, त्यांनी 'म्हैसूरपाक' आतून आणून दिला. त्याला पैसे देऊन पुढे आले. पण राखीच मिळेना आणि राखीच नसेल तर आजचा कार्यक्रम कसा पार पाडणार ? याची चिंता वाटू लागली. बरीच दुकाने अर्धवट उघडी होती पण राखी मिळेना. एका व्यक्तीने एक दुकान सुचवले ते नेमके दुर्गामाता मंदिराचे अध्यक्ष श्री. प्रदिप गुडे यांचेच निघाले. त्यांनी सर्व राख्या प्रेमाने 'तशाच' दिल्या.

मुलांना आदल्या दिवशी, कुणी रांगोळी काढायची, ताट कुणी आणायचे, फुले कुणी आणायची, राखी कोण वाटणार, कसे बसायचे, स्वागतगीत कोण म्हणणार अशा सूचना दिल्या होत्या. 'पाहुण्यांनी आपल्याला छानच म्हटले पाहिजे, शिस्तीतच वागायचे, आपण चांगली मुले आहोत' असे सांगितले. मुले देखील इतकी छान वागली की, सौ. छायाताई तर खूपच भारावून गेल्या. त्यांच्या डोळ्यात पाणीच आले. कार्यक्रम अगदी नेहमी होत असल्याप्रमाणे सराईतपणे पार पडला. सौ. छायाताईंना आम्ही वर्ग कसा घेतो तेही दाखविले. त्यांनी मुलांना एक गोष्ट सांगितली, त्यावर आधारित प्रश्नही विचारले, 'या गोष्टीत भिकारीण राणी होते व ती आजारी पडते, इलाज होत नाही, आता काय करायचे ?' असा प्रश्न मुलांना केला. तेव्हा इ. तिसरीतील मुलगा गौरव म्हणाला, ''आपल्याला देवाने जसे दिले तसे आपण रहावे.'' याचे हे उत्तर ऐकून आम्ही चाट पडलो.

मुले आता धीट झालीत. पहिल्या दिवशी नावही न सांगणारी मुले आता एकमेकांच्या परिस्थिती व घरातील

**देशाची जर काही उन्नती व्हावयाची असेल तर ती जोमदार तरुण पिढीच्या हातूनच पुढे होणार आहे.**

वातावरण यावर सहज बोलतात. यांच्यात आता मैत्री वाढली आहे. अभ्यास येत नसला तरी रोज दप्तर घेऊन येणारी ही मुले आहेत ! हुशारी असणारी पण थोडी बुजरी आणि म्हणूनच ही लपून बसणारी मुले आहेत ! या वस्तीचे अनुभव खूपच छान आहेत. श्री. राजू कर्नाटके यांनी आपणहून मला मुले गोळा करण्यास मदत केली. हाच तो पहिला 'श्रीगणेशा' !

गणपतीच्या दिवसात वर्गाच्या वेळेस एक तास स्पीकर बंद होतो, तोही न सांगता ! मंदिराबाहेर अभ्यासिकेबाहेरची खूप मुले मोबाईल घेऊन नुसती बोलत बसलेली असायची. त्यांची संख्या एकदम कमी झाली तीही न सांगता !

गणपतीत मी आरती करावी ही तेथील कॉलेजच्या वयातील मुलाची प्रेमाची विनंती होती व त्यातूनच या मुलांशी मैत्रीचं नातं जोडलं गेलं.

गणपती गावाला गेले आणि मंदिरात पत्ते माझ्या वेळेत सुरू झाले. सगळी प्रौढ माणसे होती. मी मंदिराबाहेर उभी होते. मुले दप्तर घेऊन आली. एक व्यक्ती येऊन मला सांगू लागली, 'मॅडम आज सुट्टी द्या उद्या या' मी म्हणाले, 'मी पलीकडच्या ओट्यावर अभ्यास घेते, असू द्या दादा !' हा संवाद एका बाईने ऐकला व ताबडतोब मंदिरात जाऊन 'त्यांच्या खास भाषेतून' काही बोलली. दोनच मिनिटात मंदिर रिकामे. काहीही न बोलता खाली मान घालून सर्व प्रौढ माणसे क्षणात खेळ मोडून गेली. मला या प्रसंगाने तर त्या माणसांबद्दल खूपच आपुलकी वाटू लागली आणि त्या बाईंबद्दल कृतज्ञता वाटली.

माझ्या सासूबाईंचे भरणी श्राद्ध होते. म्हणून मी फलटणला जाणार होते, वर्ग कोणाकडे द्यावा याचा विचार करत होते. तेव्हा विकी मामा म्हणून तेथील सिव्हील ड्राफ्टस्मनचा अभ्यास करणाऱ्या मुलाने वर्ग घेतला. आता मुलांची प्रार्थना पाठ आहे. एकदा मुले प्रार्थना म्हणत होती ते एका रस्त्यावरच्या व्यक्तीने ऐकून सर्व मुलांना बिस्कीटे आणून वाटली. पालकही मुलांच्या त्रिसूत्रीचे कौतुक करतात. मुले पाया पडतात. म्हणून आनंद व्यक्त करणारे पालक आहेत. जेवताना प्रार्थना करतात, हे सांगणारे पालक आहेत. 'काही अडचण असेल तर सांगा. कोण त्रास देत असेल तर सांगा' अशी बोलणारी माणसे आहेत.

मी मंदिरात एक बल्ब बसवला तेव्हा श्री. प्रदीप गुड व श्री. राजू कर्नाटके यांनी पैसे घेण्याची खूप विनंती केली. अशी साधी पण आपल्यासाठी कोणी थोडं जरी करत असेल तर त्याला सहकार्य करणारी ही माणसे आहेत.

मी रात्री ७ ते ९ पर्यंत वैदुवस्ती व कोलाटी वस्तीत असते, म्हणून भीती दाखवणारीही माणसे आहेत. आपण जेव्हा कोणतेही चांगले कार्य करतो, तेव्हा चांगलेच आपल्या वाट्याला येते. असा माझा येथील आतापर्यंतचा अनुभव आहे.

❖ ❖ ❖

**सुखाने कधी स्वराज्य मिळत नसते. ते मिळण्यास तुरुंगवास, फटके, इतकेच काय पण मरणासही तयार झाले पाहिजे.**

**ताम्हिणी साप्ताहिक शाखा :**

ताम्हिणी गावात 'विंझाई देवी हायस्कूल' येथे गेले वर्षभर साप्ताहिक शाखा सुरू आहे. वर्धिनीच्या फिरत्या प्रयोगशाळेमुळे या गावातील शाळांशी संपर्क झाला. विशेष म्हणजे स्थानिक गावकऱ्यांच्या सहभागातून येथे माध्यमिक शाळा सुरू झाली. या शाळेत ताम्हिणीच्या जवळपासच्या डोंगरातील गावांतून शेतकऱ्यांची मुले शिकायला येतात. रोजचे जाणे-येणे खूप कष्टाचे. त्यांच्यातील शिकण्याची उमेद बघून भारत विकास परिषदेचे श्री. दत्ता चितळे यांनी या मुलांसाठी परिषदेचे वसतीगृह सुरू केले. शालेय शिक्षणाबरोबर त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलावे, त्यांना इतर संस्कार मिळावेत या हेतूने वर्धिनीने इथे साप्ताहिक शाखा सुरू केली. शाखेत येणारी मुले खूप कष्टाळू, चिवट व स्वावलंबी आहेत. जिल्हा पातळीवरील वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये त्यांना बक्षीसे मिळाली आहेत. वसतीगृहासाठी लागणारा भाजीपाला ते स्वत: पिकवतात.

ही साप्ताहिक शाखा घेण्यासाठी पुण्यातून दर रविवारी चार वर्धक जातात. येथे होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांमुळे मुलांना शाखेची गोडी लागली आहे. त्यातील विशेष उपक्रम खालीलप्रमाणे -

- 'स्व'-रूपवर्धिनीच्या मकर संक्रमण उत्सवाचे महानाट्य सादरीकरण बघण्यासाठी मुले शनिवारवाड्यावर उपस्थित होती. कार्यक्रमाआधी मुलांनी वर्धिनीच्या इमारतीची संपूर्ण माहिती घेतली.
- Epic हा ॲनिमेशनपट दाखवला. श्री. आकाश जाधव यांनी मुलांना समजेल अशा भाषेत चित्रपट समजून सांगितला.
- 'टीम वर्क' ही संकल्पना मुलांना समजावण्यासाठी विविध प्रकारचे मैदानी खेळ आणि कृतीसत्र घेण्यात आले.
- 'महाभारतातील कर्ण' या विषयावर श्री. आकाश जाधव यांनी मुलांना गोष्टी सांगितल्या. यामध्ये कर्णाची शूरता, दानशूर व्यक्तिमत्त्वाचा कर्ण मुलांना भावला.
- श्री. संदेश मनवल आणि श्री. प्रसाद मोहोळ यांनी जम्मू-काश्मीर दौऱ्याचे अनुभव कथन केले. दोन महिन्यांच्या अभ्यास दौऱ्यामधील आलेले अनुभव मुलांना सांगितले.
- स्वामी विवेकानंद यांच्या आयुष्यातील काही समर्पक गोष्टी व दहशतवाद, आतंकवाद, माओवाद, नक्षलवाद या संदर्भात माहिती सांगण्यासाठी कु. किरण बेंडगे शाखेवर आला होता.
- आरोग्य आणि सुदृढ शरीर कसे राखावे या विषयावर माहिती देण्यासाठी श्री. निखिल कुंभार आले होते. माहिती देण्याबरोबरच त्यांनी मुलांकडून व्यायाम प्रकारही करून घेतले.
- 'सुंदर माझा गड' अशी एक स्पर्धा शाखेवर घेण्यात आली. मुलांनी उपलब्ध असलेल्या वस्तूंमधून गड तयार केले होते. स्पर्धेच्या परीक्षणावेळी मुलांनी स्वागतगीत, पद्य, पोवाडे, घोषणा, गडाची माहिती असे सादरीकरण केले.
- छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र श्री. आकाश जाधव यांनी सांगितले.

**तुरुंगात गेलो तरी बेहत्तर; पण माझ्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध मी अन्यायाला व जुलुमाला मदत करणार नाही.**

## ꧁ युवा विभाग ꧂

**अभ्यास दौरा :**

जानेवारी महिन्यात वर्धिनीतील काही युवक हे गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त आदिवासी भागाच्या अभ्यास दौऱ्यासाठी गेले होते. या संपूर्ण दौऱ्याचे संगणकीय सादरीकरण तसेच अनुभव कथनाचा कार्यक्रम बुधवार दि. १२ फेब्रुवारी रोजी वर्धिनीत घेण्यात आला. यामध्ये सहभागी युवकांनी नक्षलवाद्यांची स्थानिकांमध्ये असणारी दहशत, त्या दहशतीमुळे युवकांवर होणारा परिणाम तसेच पोलिस व शासन यांच्याबद्दल आदिवासींमध्ये असलेला अविश्वास असे अनेक अनुभव सांगितले. या कार्यक्रमास अभ्यासिका तसेच युवक विभागाचे कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी प्रश्नोत्तरे घेण्यात आली.

**संस्था भेटी, सहल व कार्यशाळा :**

**१) आयुका - पुणे विद्यापीठ :**

बुधवार, दि. १६ एप्रिलला ४१ युवक-युवतींनी आयुका या संस्थेला भेट दिली. कार्यालय विभाग व महिला विभागाचे प्रतिनिधीही उपस्थित होते. आयुकाजवळील सायन्स पार्कमध्ये मांडलेल्या प्रयोगांची माहिती घेण्यात आली. उदा. चंद्र व मंगळावरील आपले वजन मोजणारा काटा, सूर्यावरचे घड्याळ, मोबाईलमधील तरंगाचे उपकरण इ. नंतर आयुकामध्ये आलेले प. बंगालमधील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिवांकर घोष यांनी सर्वांशी संवाद साधला. 'विज्ञानातील एखादी संकल्पना मोठ्यातील मोठ्या वैज्ञानिकाला सांगता येत नाही. ती तुमच्यासारखी मुलं सहज सांगू शकतात. त्यामुळे विज्ञान हे फार कठीण नाही. सतत प्रयोग करीत रहा.' आयुका सायन्स सेंटरमधील वेगवेगळे प्रयोग श्री. अशोक रुपनेर व श्रीमती विदुला म्हैसकर यांनी करून दाखवले. पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये एम.फिल. करणारे श्री. सागर शिंदे व श्री. अजित पाल सिंग यांनी पुणे विद्यापीठाच्या निर्मितीचा इतिहास सांगितला. ४८० एकर जमिनीवर उभारण्यात आलेल्या या विद्यापीठात १५६ पेक्षा जास्त विभाग असून सर्वात जास्त परदेशी विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येत असल्याचे सांगितले. नंतर सर्वांनी जयकर ग्रंथालय पाहिले. यामध्ये असणाऱ्या पुस्तकांची माहिती घेतली. पुस्तकांची रचना, त्यांची मांडणी व पुस्तक शोधण्याचे सॉफ्टवेअर हेही जाणून घेतले.

**२) महाराष्ट्र गांधी स्मारक निधी - गांधी भवन :**

दि. १८ एप्रिलला ३३ युवक-युवतींनी गांधी भवनाला भेट दिली. श्री. संदीप बर्वे यांनी गांधी भवनची माहिती दिली. गांधीजींच्या जीवनावर आधारित मराठीमधील माहितीपट दाखवण्यात आला. या माहितीपटात गांधीजी स्वत: असल्याने त्यांचे राहणीमान तसेच त्यांचा दांडीयात्रेदरम्यानचा प्रवास अनुभवायला मिळाला. माहितीपटानंतर श्री. बर्वे यांनी संपूर्ण गांधी भवन फिरवून संस्थेची माहिती सांगितली. यात महात्मा गांधींचा पुतळा, गांधी भवनचे सभागृह तसेच तेथील ग्रंथालयाची माहिती युवकांना मिळाली. कार्यक्रमाच्या शेवटच्या सत्रात महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी व डॉ. अन्वर राजन यांनी युवकांशी संवाद साधला. यामध्ये श्री. सप्तर्षी यांनी पुरोगामी-प्रतिगामी म्हणजे काय ते सांगितले. त्यांच्या महाविद्यालयीन

नुसत्या गोड शब्दांचे तेज पराक्रमी व कर्तबगार माणसांवर पडत नाही.

जीवनात विद्यार्थी चळवळींमधील सहभागाची माहिती दिली. आंतरजातीय विवाह करण्यासंदर्भात व ते का होणे जरुरीचे आहे ते सांगितले. जगण्यासाठी कुठल्या कुठल्या मूल्यांची आवश्यकता असते याचे विवेचन केले. तसेच जग कळण्यासाठी माणसांशी संवाद करावा लागतो, यंत्रांशी नाही हेही आवर्जून मांडले.

**३) मानव्य संस्था, भूगाव :**

सोमवार, दि. २१ एप्रिलला १४ युवकांनी मानव्य संस्थेला भेट दिली. मानव्यमध्ये गेल्यानंतर सुरुवातीला युवकांनी तेथील मुलांची गाणी घेतली व त्यांच्याशी मैत्री केली. जेवणानंतर विवेकानंद शाखेच्या युवकांनी नाटक सादर केले. त्यानंतर संस्थेतील मुलांनी नाटक सादर केले. संस्था भेटीच्या शेवटी संस्थेत काम करणाऱ्या श्रीमती भाग्यश्री महाजन यांनी तेथील कामासंदर्भातील माहिती दिली. यामध्ये -



- HIV +ve म्हणजे काय, तो कसा होतो ?
- संस्थेतील मुलांच्या आहाराची व औषधाची काळजी कशी घेतात ?

**४) कार्ले-भाजे लेणे :**

दि. २४ एप्रिलला १६ युवक-युवतींची सहल भाजे लेणे येथे गेली होती. श्री. प्रसाद बर्वे यांनी कार्ले-भाजेच्या लेण्यांविषयी माहिती दिली. सुरुवातीला त्यांनी स्तूप म्हणजे काय ? स्तूप व विहार यात काय फरक आहे हे सांगितले. तसेच महाराष्ट्रात लेणी खोदण्यास कधी सुरुवात झाली. भगवान बुद्धांचा इतिहास तसेच बुद्ध अस्तातील तत्त्वे-बौद्ध भिख्खूंचे आचरण याविषयी सांगितले. पुढे प्रत्यक्ष लेण्याच्या ठिकाणी, ते लेणे कोणी प्रयोजित केले, ते कसे ओळखायचे, ब्राह्मी भाषेतील शिलालेख इ. बद्दल माहिती दिली. सुरुवातीला भाजेची लेणी दाखवण्यात आली व त्यानंतर कार्ले येथे नेण्यात आले.

**५) करियर मार्गदर्शन कार्यशाळा :**

युवक-युवतींना करियरसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी प्रसिद्ध वक्ते प्रा. विजय नवले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी १३० च्या वर विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यामध्ये वर्धिनी व्यतिरिक्तही काही संख्या होती. प्रा. विजय नवले यांनी विद्यार्थी व पालकांना करियर करणे म्हणजे चांगले पैसे मिळवणे एवढेच नसून आपल्या आवडीच्या क्षेत्रात मनापासून काम करणे हे आहे असे सांगितले.

**नेतृत्व विकसन वर्ग :**

वर्गाचा उद्देश - नेतृत्व विकसन, गटकार्य आणि गटबांधणी व संपर्कासाठीचे संवाद कौशल्य निर्माण करणे. श्री. संदीप मोरे यांनी संपर्क या विषयावर पहिले सत्र घेतले. त्यांच्या मांडणीतील मुख्य मुद्दे -

- संपर्क म्हणजे काय - एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन, ते कार्य साध्य करण्याकरिता एका व्यक्तीने

**राष्ट्रात जे थोर पुरुष निर्माण होतात ते एक प्रकारच्या अदृष्ट बलानेच निर्माण होतात.**

दुसऱ्या व्यक्तीकडे स्वत:हून कोणत्याही माध्यमातून भेट घेणे, संवाद साधणे, चर्चा करणे, किंवा समस्यांचे निराकरण करणे.

- उद्दिष्ट – समस्या जाणून घेणे, त्यासंबंधी विविध पर्यायांचा चौकस विचार करणे, शक्य असेल तर ताबडतोब अथवा चर्चेने निराकरण करणे.
- कौशल्य – उत्तम श्रोता असणे, वक्तृत्व उत्तम असावे, वैयक्तिक व सामाजिक स्थितीची जाणीव उत्तम असावी, समस्यांचे निराकरण जमले पाहिजे, वेळप्रसंगी समुपदेशन करावे.
- कार्यकर्त्याची भूमिका : संघटक, मार्गदर्शक, नेहमी नावीन्याचा झरा, प्रेरणा देणारा, मध्यस्थ, उत्तम समुदेशक. नियोजन कौशल्य या विषयावर श्री. महेन्द्र सेठिया यांचे व्याख्यान झाले. त्यांनी मांडलेले प्रमुख मुद्दे असे होते –
- नियोजन का करावे – गोंधळ होऊ नये, भूमिकांचे समयोजन व्हावे, आढावा घेता यावा, गोष्टींचे व्यवधान रहावे यासाठी करावे. नियोजन करताना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या लक्षात ठेवणे.

पद्धती –

| Imp & Not Urgent | Imp & Urgent |
|---|---|
| Not Imp But Urgent | Not Imp Not Urgent. |

- वर्षभराचे नियोजन करावे व त्याचे वार्षिक, सहामाही, मासिक, साप्ताहिक पातळीवर विभाजन करावे.

श्री. निलेश धायरकर यांनी विविध मॅनेजमेंट गेम्स घेतल्या, काही प्रेरणादायी फिल्म्सही दाखवल्या.

बाबा आमटे म्हणतात : भान ठेवून योजना करा आणि बेभान होऊन काम करा.

❖ ❖ ❖

**My Role in My Life & In Wardhinee :**

संख्या : ५५ युवक (सर्व वरिष्ठ महाविद्यालयीन युवक व युवती)

स्थान : पी.सी.आर.आर.– भुकूम.

कालावधी : २६–२७ जुलै. पहिल्या रात्री वादसंवाद सत्र घेण्यात आले. एकूण चार गट करून त्यांना – १) ११, १२ वी २) वरिष्ठ महाविद्यालय ३) पदवीधर व व्यावसायिक ४) पूर्णवेळ कार्यकर्ता अशा भूमिका दिल्या होत्या. प्रत्येक गटाला खालील मुद्द्यांद्वारे मांडणी करावी लागली.




मुद्दे : १) असे घडवितो करिअर २) सामाजिक उपक्रमात सहभाग ३) अन्य गटांतून आपल्या अपेक्षा ४) गटांच्या चांगल्या भूमिका.

या मांडणीमुळे गटांसमोर येणाऱ्या समस्या, त्यावरील उपाय, त्याद्वारे आपल्या करिअरचा मार्ग कसा निश्चित करता येईल हे समजले.

**दडपशाहीने व अन्यायाने सत्पक्षाचा नाश न होता तोडलेल्या झाडाप्रमाणे तो पुन: अधिकच बळावतो.**

❖ रात्री १२ ते पहाटे ३.३० या वेळात पद्यांचा कार्यक्रम झाला.

❖ सकाळी उपासना झाल्यावर आपल्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी, आपला मार्ग आपण निश्चित करण्यासाठीचे लिखाण झाले. यासाठी दिलेला एक तासाचा वेळ सर्वांनाच अपुरा वाटला.

❖ यशोवर्धन वाळिंबे यांनी सामाजिक कामातील भूमिका यावर युवकांशी संवाद साधला (कृतज्ञ : मदतीची जाणीव असणारा, कृतघ्न : जाणीव नसणारा, कृतकृत्य : कामाचे समाधान असणारा) या भूमिका त्यांनी उदाहरणासह समजावून सांगितल्या.

मदत करताना मार्गदर्शकांची भूमिका 'मी तुझ्या पाठीशी आहे' अशी असावी. व्यक्तिगत आयुष्यात वडासारखे अथांग पसरून अनेकांना आपली छाया देता आली पाहिजे असे विचार त्यांनी व्यक्त केले.

❖ 'वर्धिनीच्या इतिहासाची सोनेरी पाने' अशी सर्व जुनी कार्यवृत्त वाचनास घेऊन प्रत्येक गटाने त्यामधील महत्त्वाचे क्षण आपल्या नाट्यातून सादर केले. ज्यामध्ये ज्ञानेश पुरंदरे यांची पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून कामाची सुरुवात, विश्वास सरांचे अंधव्यक्तींना शिक्षणासाठीचे सहाय्य, गणेश राऊत सर यांनी शिक्षणासाठी प्रवृत्त करणे हे क्षण, शिरीष अडके सर यांना विवेकानंद शाखा स्थिर करताना आलेली अडचण त्यावर योजलेले उपाय, किशाभाऊंची रोजनिशी लिहिण्याची सवय, त्याचा अनुभव आलेले विनेश नगरे सर, अशा अनेक क्षणांनी वर्धिनीच्या अनेक पानांना स्पर्श केला.

❖ त्यानंतर ज्ञानेश पुरंदरे यांनी, संजय तांबट सरांनी १९९३ व ९४ मध्ये वर्धिनीच्या संस्कारांची आपल्या मनावर होणारी जडणघडण याविषयी लिहिलेले पत्र वाचून वर्धिनीच्या कामाची प्रेरणा सदर उताऱ्याद्वारे सांगितली.

❖ ❖ ❖

**व्यवस्था प्रमुखांचे प्रशिक्षण :**

दि. २० व २१ सप्टेंबर २०१४ ला रानडे बालक मंदिर येथे शाखांवरील सर्व व्यवस्था प्रमुखांचे प्रशिक्षण झाले. रात्री ८.३० वाजता 'भूत बडा या भूख' याविषयी लघुचित्रपट दाखविण्यात आला. गरिबी, भूक, अंधश्रद्धा याविषयी भाष्य करणारा चित्रपट होता. 'अंधश्रद्धेमुळे समाजात असलेली एक भीती भुकेल्या मुलातून नाहीशी होते व भुकेसाठी माणूस काही करू शकतो' असा चित्रपटाचा विषय आहे.

त्यानंतर रात्री विलास कुलकर्णी सरांचे गप्पासत्र झाले. त्यामध्ये वर्धिनीने केलेल्या संस्कारांमुळे अनेक प्रसंगांना सामोरे जाता आले. विविध प्रकारच्या नवीन जबाबदाऱ्या पेलण्याची सवय निर्माण झाली. प्रत्येक वेळी सर्व परीक्षांमध्ये प्रथमच असावे असा किशाभाऊंचा असणाऱ्या हट्टाला पूर्ण करण्यासाठी सदैव प्रयत्न चालू असायचे. सकाळी ५ वाजता उठून विश्वास सरांसोबत १०८ सूर्यनमस्कार घालणे, योगासने करणे या सर्व गोष्टी अजूनही नित्यनियमाने चालू आहेत. ३६५ दिवस १०८ सूर्यनमस्कारांचा विक्रम त्यांच्या वर्गातील अजून तरी कोणीच केला नाही. आपल्या दिनक्रमात ५ तास झोप, व्यायाम, घर, अभ्यास, कॉलेज, शाखा, व्यवसाय, मित्र संपर्क, पर्यटन यांचे असलेले नियोजन अशा अनेक आठवणी ऐकताना आपल्यातल्याच सरांबद्दल आदरभाव आणि आपुलकी निर्माण झाली.

सकाळी ६.१५ वाजता सर्व युवकांची मानसिक विकास बैठक झाली. श्री. शिरीष पटवर्धन व श्री. सुजय पैलवान

**प्रत्यक्ष परमेश्वर येऊन 'दारू प्या' म्हणून सांगू लागला तर त्याच्यावरदेखील बहिष्कार टाका.**

यांनी शाखेवरील बैठकीचे महत्त्व, भविष्यातील शाखेवरील जबाबदार कार्यकर्ते घडवण्यासाठीच्या योजना, वैयक्तिक पडताळणी असे अनेक महत्त्वाचे मुद्दे यामध्ये मांडले. मग भागश: कबड्डीचे सामने झाले. संपर्क हा वर्धिनीच्या उभारणीतील सर्वात महत्त्वाचा घटक, जो किशाभाऊंनी शेवटपर्यंत जपला. त्या किशाभाऊंच्या संपर्कातील आठवणी, संपर्काची पद्धत अशा अनेक गोष्टींविषयी गप्पा मारण्यासाठी वर्धिनीचे श्री. श्रीहर्ष सगरे सर आले. संपर्कातून सर्वांगीण विकास होणे हे खूप महत्त्वाचे आहे असे त्यांनी आवर्जून मांडले. यानंतर भागश: शिबिर नियोजन बैठका झाल्या. दुपारी व्यवस्थाश: नियोजन व आढावा बैठक झाली. मैदानाचे प्रशिक्षण श्री. शिंदे सर (शारीरिक शिक्षण शिक्षक, आगाशे विद्यालय), अभ्यास वर्गाचे मार्गदर्शन श्री. सुनील कुलकर्णी सर यांनी तर कार्यक्रम व संपर्क श्री. संदीप मोरे सर यांनी केले.

वर्गातील युवकांनी एकत्रित पुस्तक वाचन करून त्याविषयी स्वत:चे मनोगत मांडले. ज्यामध्ये विविध लेखकांची मनोगते, लेखन, विचार वाचले गेले. श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी वाचलेली पुस्तके, आपल्या आयुष्यातील पुस्तकांचे महत्त्व, त्यांच्यामुळे झालेली जडणघडण समारोपातून मांडली.

**लक्ष्मी केशव प्रतिष्ठान, सातारा येथील कामाचे संक्षिप्त वृत्त**
**(‘स्व’-रूपवर्धिनीचे उपकेंद्र)**

प्रतिष्ठानच्या वतीने सध्या खालील तीन ठिकाणी शाखा चालू असून सुमारे १०० विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. १) समर्थ शाखा, सोमवार पेठ २) छत्रपती शिवाजी शाखा, बुधवार पेठ ३) दुर्गा शक्ती केंद्र (वैदूवाडी, गोडोली). या तीनही शाखांचे काम सहा युवक-युवती कार्यकर्ते पहात आहेत. गेल्या वर्षभरामध्ये अनेक कार्यक्रम, उपक्रम प्रतिष्ठानमार्फत घेण्यात आले. त्यातील महत्त्वाचे खालीलप्रमाणे :

१) ‘स्व’-रूपवर्धिनीच्या वतीने दिवाळीमध्ये घेण्यात आलेल्या शिबिरात चार युवक आणि सात युवती सहभागी झाल्या होत्या. शिबिरामुळे दैनंदिन शाखा चालवण्यासाठीचे उत्तम प्रशिक्षण या कार्यकर्त्यांना मिळाले. त्याचा उपयोग दैनंदिन शाखा चालवताना होतो आहे.

२) दोन सहलींचे आयोजन या कालावधीत झाले. पळशी धरण आणि सोळशी शनी मंदिर या ठिकाणांना भेटी देण्यात आल्या.

३) क्रांतिकारकांच्या कथा सांगण्याचा उपक्रम युवक-युवती कार्यकर्त्यांनी सुरू केला असून आत्तापर्यंत तीन क्रांतिकारकांच्या कथा त्यांनी मुलांना सांगितल्या आहेत.


४) मासिक निवासी वर्गाला सुरुवात झाली असून आत्तापर्यंत तीन मासिक वर्ग घेण्यात आले.

५) १४ डिसेंबर रोजी प्रतिष्ठानचा वर्धापन दिन कार्यक्रम संपन्न झाला. ज्ञानप्रबोधिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. वामनराव अभ्यंकर हे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

६) स्वच्छता अभियानाची सुरुवात डिसेंबर महिन्यात करण्यात आली. सातारा येथील जिल्हा परिषदेसमोरील परिसर स्वच्छ करण्याचे काम प्रतिष्ठानच्या विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी केले. यामध्ये संस्थेचे ज्येष्ठ कार्यकर्ते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व डॉ. अविनाश पोळ हेही सहभागी झाले होते.

**दारुचे परिणाम पिणाऱ्याच्या शरीरासच नव्हे तर राष्ट्रासही घातक आहेत.**

**सायकल सहल (दि. २५ ते २८ डिसेंबर २०१४) :**



**पुणे ते दिवेआगर**

संख्या : युवक - ७०, व्यवस्थेतील युवक - १०.

दि. २५ डिसेंबरला सकाळी ६.३० वाजता पौड फाट्याजवळ या सहलीची सुरुवात झाली. त्यावेळी तेथे ४० संख्या उपस्थित होती. यावेळी वर्धिनीचे कार्याध्यक्ष कल्याण वर्दे सर, पुष्पाताई नडे आदी मंडळी उपस्थित होती. अंबडवेटच्या दत्तमंदिरात न्याहारी झाल्यावर पुढे लगेचच ताम्हिणीच्या दिशेने ३० किमीचा प्रवास सुरू झाला. ताम्हिणीच्या शाळेत सर्वांचे मनसोक्त जेवण झाले. कित्येक स्वारांना पहिल्या मुक्कामाच्या ठिकाणी माणगावला पोहोचण्याचा ध्यास लागला होता. संध्याकाळी ४.३० ला पहिला सायकलस्वार १०६ किमी पार करून निवासस्थानी पोहोचला. नंतर पुढील तीन तासातच बाकी सर्व युवक त्याठिकाणी पोहोचले.

दुसऱ्या दिवशी दिवेआगरचा ५० किमीचा टप्पा सर्व युवकांनी दुपारच्या बाराच्या आतच पूर्ण केला आणि सर्वांनी मनसोक्त समुद्रस्नानाचा आनंद घेतला. त्यानंतर भोजन करून त्या दिवशीच्या मुक्कामासाठी म्हसळा येथे सर्वजण संध्याकाळी ७ पर्यंत पोहोचले. ज्या ठिकाणासाठी ही सायकल सहल होती ती दोनच दिवसात पूर्ण झाल्याने युवक थोडेसे खट्टू झाले.

तिसऱ्या दिवशी मात्र भला मोठा ताम्हिनीचा घाट सर्वांची वाट बघत होता. सर्वांना आदल्या दिवशी ज्ञापुंचे कडू औषध मिळाल्याने प्रत्येकजण तो घाट लवकरात लवकर सर करण्यास आतुर होता. ताम्हिणीचा घाट उतरताना जेवढा आनंद होत होता त्याहूनही अधिक चढताना जिरणार असे सर्वांच्या तोंडावरून दिसत होते. त्यादिवशी एकूण ८३ किमीचा टप्पा व त्यात ताम्हिणीचा घाट ! पण तरीदेखील सर्व युवक सायंकाळी ७.३० च्या आत ताम्हिणी शाळेत पोहोचले. रात्री ताम्हिणीच्या शाळेतील मुलांच्या हातच्या भाकऱ्यांनी सर्वांची भूक भागली. रात्री शेकोटीच्या प्रकाशात या सर्व मित्रांबरोबर रंगलेल्या पद्यमंजुषेतून या संपूर्ण खडतर प्रवासातील थकवा दूर झाला.

तिसऱ्या दिवशी ताम्हिणीतील संरक्षित वनक्षेत्र बघताना सर्वांना पर्यावरणीय सौंदर्य अनुभवता आले. त्यानंतर सर्व आठवणींचे गाठोडे बांधून परतीचा प्रवास सर्वांनी सुरू केला. या आधीच्या सायकल सहलींच्या तुलनेत ही सहल सर्वाधिक लवकर संपली. सायंकाळी ४.४५ वाजता चांदणी चौकात समारोप झाला.

सहलीच्या शेवटी गप्पा मारत असताना समजले की या सहलीला येण्यासाठी अभेदानंदचा युवक कार्यकर्ता राहुल इंगळे हा सायकल सहलीत सहभागी होण्यासाठी ४ दिवसात सायकल चालवायला शिकला आणि या अनुभवावर पुढील ४ दिवसांची ३५० किमी अंतराची सायकल सहल मोठ्या उत्साहाने त्याने पार पाडली. असे किती तरी युवक आपल्या कामातून वेळ काढत सर्व युवकांच्या बरोबरीने आयुष्याला पुरेल असा अनुभवांचा सागर जमवला होता.

❖ ❖ ❖

**दु:ख सोसल्याशिवाय दु:ख कमी होत नसते.**

## पाकोळी बालवाडी

**मकर संक्रमण उत्सव (रौप्य महोत्सव सांगता समारंभ) :**

'स्व'-रूपवर्धिनीच्या पाकोळी बालवाडीला २५ वर्षे पूर्ण झाली. दि. ७ जानेवारी २०१४ रोजी दुपारी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे मकर संक्रमण उत्सव व रौप्य महोत्सव सांगता समारंभ एकत्रितपणे संपन्न झाला. मनाला आनंद देणारी, बाल जगात घेऊन जाणारी अशी श्री. सलील कुलकर्णी यांची गाणी ही या कार्यक्रमाची संकल्पना होती. ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सौ. अंजली सलील कुलकर्णी (प्रसिद्ध गायिका) उपस्थित होत्या. तसेच अध्यक्ष म्हणून न्यू इंग्लिश स्कूल(टिळक पथ)चे मुख्याध्यापक श्री. एकनाथ बुरसे सर लाभले होते.

पाकोळी बालवाडीत इंग्रजी व संस्कृत विषय शिकवला जातो याचे प्रात्यक्षिक म्हणून काही बालगोपाळांनी इंग्रजी कविता व संस्कृत श्लोकांचे पठण केले. ह्या व्यतिरिक्त 'अडम-तडम', 'पाऊस फुलांचा', 'आटपाट नगर' अशी इतर अनेक गाणी नृत्यासह सादर करण्यात आली. पाकोळी बालवाडी शिक्षिका वर्षभर विद्यार्थ्यांवर जी मेहनत घेतात त्याचे कौतुक म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला. सौ. मेघा नगरे ह्यांनी शिक्षिकांसाठी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतली होती. त्यातील विजयी शिक्षिकांना बक्षीसे देण्यात आली.

प्रमुख अतिथी सौ. अंजलीताई यांनी 'दरवर्षी या कार्यक्रमाला यायला नक्की आवडेल' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली. अध्यक्ष श्री. बुरसे सर यांनी 'मुलांचे चांगले मित्र बना' असा संदेश या प्रसंगी सर्व पालकांना दिला.

**बाहुला-बाहुलीचे लग्न :**

१४ मार्च रोजी बाहुला-बाहुलीचे लग्न झाले. मोठ्या गटाचा बाहुला होता. मधल्या गटाची बाहुली होती. बाहुल्याचे नाव आरव, बाहुलीचे नाव अक्षरा होते. छोटा गट वऱ्हाडी मंडळी होती. उपासना मंदिर लग्नमंडपासारखे सजवले होते. सनई वाजंत्रीच्या गजरात वरात काढून लग्न लागले. मंडपात सुंदर रुखवत मांडले होते. पालकांना पेढे व मुलांना मिष्टान्नाचे जेवण देण्यात आले. पालकांनी आहेराच्या रूपात वर्धिनीला देणगी दिली.

**निवासी शिबिर :**

दि. १५ एप्रिलला मोठ्या गटातील ४० मुलांचे एक दिवसाचे निवासी शिबिर झाले. गटाला भूप, भिमपलास, यमन या रागांची नावे दिली होती. या रागातील छोटी गाणी श्रीमती गुळवणी ताईंनी मुलांना शिकवली. मुलांना शाहू उद्यानात खेळायला नेले होते. तेथेच त्यांची उपासनाही झाली. मुलांकडून क्रेप पेपरचे झाड, छोट्या दगडावर रंगकाम, खाऊच्या माळा अशा वस्तू बनवून घेतल्या. श्रीमती सोहनी ताईंनी मुलांना विज्ञानातील गंमती व गोष्टी सांगितल्या. मुलांच्या व शिक्षकांच्या मनोगताने समारोप झाला.

**दुःखाशिवाय सुखालाही चव येत नाही.**

## बालवाडी शिक्षिका शिबिर

| क्र. | शिबिरांचे विषय | वक्ते |
|---|---|---|
| १. | प्रेरणासत्र | बागेश्रीताई पोंक्षे |
| २. | कविता, कीर्तन | डॉ. प्रदीप आगाशे सर |
| ३. | अनुभव कथन | माधवीताई पटवर्धन |
| ४. | भयविरहित शिक्षण | गौरीताई देशमुख |
| ५. | समुपदेशन खेळ | उषाताई दांडेकर |

शाळेची पूर्वतयारी म्हणून दिनांक ३-६-२०१४ ते ७-६-२०१४ पर्यंत शिक्षिकांचे शिबिर झाले. शिबिरामध्ये शिक्षिकांनी बालवाडी अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या विषयांवर अभ्यासपूर्वक स्पष्टीकरण केले. त्यांच्यामध्ये बोलण्याचे धाडस व आत्मविश्वास निर्माण झाला. शिबिरामध्ये वक्त्यांचे मार्गदर्शन व शिक्षिकांना मिळालेली संधी यांचा छानच संगम झाला.

**बालवाडीचे नवीन वर्ष :**

बालवाडी १६ जून २०१४ ला सुरू झाली. यावर्षी छोट्या गटात ६५, मधल्या गटात ५५ व मोठ्या गटात ६० मुले आहेत. मुलांचे स्वागत करण्यासाठी सर्व वर्ग कागदी फुलांनी सजवले होते, फळ्यांवर सुंदर चित्रे काढली होती व दारात रांगोळ्या काढल्या होत्या. मोठ्या गटातील बरीच मुले पहिल्या दिवशीच शाळेच्या गणवेशात आलेली बघून सर्वांना आश्चर्य वाटले, पण त्यातून त्यांची शाळेशी झालेली गट्टी बघून मन सुखावले. बालवाडीत आपल्या संस्कृतीची, सणांची माहिती व्हावी म्हणून वर्षभर मुलांच्या सहभागातून वेगवेगळ्या उपक्रमातून सर्व सण साजरे केले जातात. त्यातील विशेष -

**पालखी :** ९ जुलै रोजी विठ्ठलनामाचा गजर करीत रिंगण खेळत पालखी सोमवार पेठेतील विठ्ठल मंदिराच्या दिशेने निघाली.

'बोला पुंडलिक वरदा... हरी विठ्ठल,
श्री ज्ञानदेव... तुकाराम, पंढरीनाथ महाराज की... जय,
ज्ञानेश्वर महाराज की... जय, सब संतन की... जय'

असा गजर करीत वाजत गाजत पालखी कण्वाश्रम मंदिरात पोहोचली. शाखेची मुले वारकऱ्याची तसेच, संताची वेशभूषा करून आली होती. छोट्या मुलांची विठ्ठल रखुमाईची वेशभूषा पाहून लोक कौतुक करत होते. पालखी सोहळ्यामध्ये पालकांचाही सहभाग मोठा होता. शाखेच्या मुलांनी 'कर्मयोग' याविषयी सुंदर कीर्तन केले.

**नवरात्र उत्सव :**

नवरात्रात तीनही गटांचे तीन दिवस भोंडला खेळला गेला. मोठ्या गटातील मुलांनी छोट्या कुंड्यांमधून धान्य पेरून आणले होते. त्याचे हत्तीभोवती सुशोभन करण्यात आले. शिक्षकांनी सौ. सुजाता खंडुगोळ या माजी

**दुष्ट मनुष्यें आपल्या कर्मानेच मरत असून त्यांना मारणारा फक्त निमित्तमात्र असल्यामुळे मारणाऱ्याकडे त्याचा दोष येत नाही.**

पालकांच्या देवीच्या देवळात श्रीसुक्ताचा कार्यक्रम केला. खंडेनवमीला सर्व मुलांचा एकत्रित सरस्वती पूजनाचा कार्यक्रम झाला.

**बालमेळावा :**

दि. २६ नोव्हेंबरला बालमेळावा झाला. नूतन बालक शिक्षण संघाच्या सहकार्यवाह सौ. प्रीतीताई आठवले यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्‌घाटन झाले. बालमेळाव्यात शिक्षिकांच्या मदतीला एस. एन. डी. टी. महाविद्यालयातील (Home Science) गृहविज्ञानाच्या १८ विद्यार्थिनी व नूतन बाल शिक्षण संघाच्या बालवाडीच्या तीन शिक्षिका होत्या. भाषा, गणित, विज्ञान, कला, ग्रंथालय, पपेट शो, जीवनव्यवहार या विषयांची वेगवेगळी दालने मांडली होती.

भाजी मंडईचा उपक्रम नवीनच होता. आकर्षक मांडणीमुळे भाजी खरेदी मुलांनी भाव विचारून केली.

बालमेळावा बघण्यासाठी हुजूरपागा, भावे प्राथमिक, आपटे प्रशाला, स.ल.रास्ते शाळा, एस.व्ही.युनियन शाळा, पूर्व प्राथमिक शाळा, आगरकर शाळा येथील मुले, शिक्षक, शिक्षिका, मुख्याध्यापिका यांनी भेट दिली. पिरंगुट येथील बालवाडीच्या शिक्षिका सर्व मोठ्या गटातील मुलांना घेऊन आल्या होत्या. सर्व विद्यार्थ्यांचा मेळाव्यास चांगला प्रतिसाद मिळाला. 'जीवनात येणाऱ्या प्रसंगांची अनुभूती विद्यार्थ्यांना कशी देता येईल, याचा विचार प्रत्येक दालन मांडताना शिक्षकांनी केला आहे' असा अभिप्राय देऊन जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी श्री. सदाशिव चव्हाण व श्री. पिराजी पाटील यांनी बालवाडीच्या शिक्षिकांचे कौतुक केले.

**'पाकोळी' बालवाडी विशेषांक प्रकाशन :**

'पाकोळी' बालवाडीला पंचवीस वर्षे होण्याच्या टप्प्यावर विशेषांकाचे प्रकाशन झाले. २६ जुलै रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला. शिक्षिकांचे, कार्यकर्त्यांचे, विद्यार्थ्यांचे, तज्ज्ञांचे अनुभव, लेख या विशेषांकामध्ये समाविष्ट आहेत. या कार्यक्रमासाठी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा धुमाळ हे प्रमुख अतिथी म्हणून तर प्रमुख वक्ते म्हणून श्री. विवेक पोंक्षे सर लाभले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. गीताताई बोधे यांनी तर प्रास्ताविक सौ. अनुराधाताई वखारकर यांनी केले. बालवाडी शिक्षिकांनी 'माणूस सुंदर घडवू या' हे पद्य सादर केले. या पद्यासाठी श्री. सबनीस सरांचे मार्गदर्शन व संगीत साथ मिळाली होती.

वारकरी, पक्षी, भारतमाता असे वेष परिधान करून बालवाडीमधील काही छोटे मित्र पुस्तक प्रकाशनासाठी मंचावर उपस्थित होते. श्री. विवेक पोंक्षे सरांनी याप्रसंगी यथोचित मार्गदर्शन केले. कधी कधी आपल्याकडे न सुटणारा प्रश्न असतो. मुलांना तो प्रश्न विचारला की नंतर मुलांकडून अनेक उत्तरे मिळतात व मुले आपल्या कल्पनाशक्तीने उत्तरे देतात. त्यातून आपल्याला योग्य उत्तर मिळू शकते. शिक्षिकेने मुलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून वेगवेगळे उपक्रम राबवावेत. मुलांना इतर भाषा शिकवाव्यात, परंतु आपली मातृभाषा मुलांना आलीच पाहिजे असे विचार त्यांनी व्यक्त केले. आभार सौ. अक्षताताई यांनी मानले आणि प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

❖ ❖ ❖

**दृढनिश्चय व एकजुटीची कृती यांनाच कर्मभूमीत यश मिळत असते.**

# ၈ शारदामणी महिला विभाग ଓ

## मकर संक्रमण उत्सव २०१४

गुरूवार दि. ३० जानेवारी २०१४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मालधक्का चौक येथे उत्साहात महिला विभागाचा मकर संक्रमण उत्सव साजरा झाला. ह्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सौ. वर्षाताई लड्डा-उंटवाल(निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी-सहाय्यक आयुक्त:मागासवर्ग कक्ष) आणि प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ लेखिका सौ. वीणा देव लाभल्या होत्या. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व ओंकार पूजन झाले. सहा. परिचर्या वर्गाच्या विद्यार्थिनींनी 'करीत संक्रमण मनामनातून' हे गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. सौ. संध्याताई साबणे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती पुष्पाताईंनी पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला. सौ. मंजूषाताई कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सहा. परिचर्या वर्गाच्या शिक्षिका सौ. लता सत्तूर व विद्यार्थी कु. विशाल कानडे ह्यांनी अहवाल वाचन केले. संवादात्मक स्वरूपातील या अहवाल वाचनाचे व्यासपीठावरील मान्यवरांनी कौतुक केले. वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन सर यांचा महापालिकेने प्रजासत्ताकदिनी विशेष सत्कार केला, त्यानिमित्ताने त्यांचा या कार्यक्रमात अध्यक्षांच्या हस्ते पुस्तक भेट देऊन वर्धिनीच्या परिवाराकडून गौरव करण्यात आला. ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. चंदन हायगुंडे यांचाही पत्रकारितेतील पुरस्काराबद्दल या प्रसंगी गौरव करण्यात आला.

त्याचप्रमाणे सहा. परिचर्या वर्गाची माजी विद्यार्थीनी कु. अमृता फाले हिने हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेत G.N.M. अभ्यासक्रम पूर्ण केला व प्रत्येक वर्षी उत्कृष्ट विद्यार्थीनीचा किताब मिळवला. याबद्दल कु. अमृताचे टाळ्यांच्या गजरात कौतुक करण्यात आले. तसेच कु. वीरश्री वानखेडे हिने A.N.M. अभ्यासक्रम पूर्ण करून प्रथम क्रमांक मिळवला. म्हणून तिचाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सौ. मृदुला ताईनी आभार प्रदर्शन केले. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण झाले. सहाय्यक परिचारिका वर्गाच्या तीनही शाखांनी वेगवेगळी गीते व नृत्ये सादर केली. प्रौढ साक्षरता वर्गानेसुद्धा भारूड सादर करून अंधश्रद्धा निर्मूलनाचा विषय सर्वांसमोर मांडला. शिवणवर्गातल्या विद्यार्थीनींनी देशभक्तीपर गीत सादर केले. बालवाडीतील शिक्षकांनी नृत्य सादर करून एक वेगळा आनंद कार्यक्रमात भरला.

## आवळा पाककृती कार्यशाळा

४ जानेवारी २०१४ ला 'स्व'-रूपवर्धिनी, शक्ती व पर्सिस्टंट फौंडेशन ह्या तीनही संस्थांनी मिळून महिलांसाठी 'आवळा पाककृती कार्यशाळे'चे आयोजन केले होते. ह्या कार्यशाळेद्वारे महिलांना आवळ्यापासून तयार होणारे पदार्थ उदा. आवळा सरबत, आवळा सुपारी, आवळा चटणी तसेच शतावरी कल्प व दाडिमा अवलेह असे पदार्थ बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

महिलांनी उत्साहाने ह्या कार्यक्रमात भाग घेतला. ह्या कार्यक्रमासाठी एकूण ७२ महिला उपस्थित होत्या. महिलांनी खूप उत्सुकतेने हे सर्व पदार्थ शिकून घेतले. आपणास काही वेगळे शिकायला मिळाले याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

**देशकार्य हे केवळ बुद्धीवर अवलंबून नसून दीर्घोद्योगावर व स्वार्थ-त्यागावरच अवलंबून आहे.**

**महिला दिन – ११ मार्च २०१४ :**

हा कार्यक्रम दोन सत्रात झाला. महिलांमधील सभाधीटपणा वाढावा या हेतूने वक्तृत्व स्पर्धा झाली. स्पर्धेत वर्धिनीतल्या सर्व विभागातील १९ महिलांनी भाग घेतला. स्पर्धेचे विषय – १) माझी कामातील भूमिका २) मला भावलेली सामान्य स्त्री ३) महिलांचे संघटन आवश्यक आहे का ? सौ. मेघाताई नगरे व सौ. अरुणाताई देशपांडे या स्पर्धेच्या परिक्षिका होत्या. 'जेव्हा आपण स्वत: काम करायचे ठरवतो तेव्हा ते आपण आपल्या आवडीने निवडलेले असते. म्हणून ते काम पूर्णत्वास नेणे ही आपली स्वत:ची जबाबदारी असते.' हा विचार सगळ्यांनाच आवडला. 'वेगवेगळ्या स्त्रियांच्या चरित्रातून त्यांचे गुण आपण कसे आत्मसात करायला हवेत, संघटनेमुळे महिलांच्या प्रश्नांना वाचा फुटते, त्यांना मार्गदर्शन होते.' असे विचार महिलांनी मांडले. सहाय्यक परिचारिका वर्गाच्या मुलींसाठी 'लहान मुलांसाठी आधुनिक गोष्टी' या विषयावर निबंध स्पर्धा घेतली. यात ३० मुलींचा सहभाग होता.

स्पर्धेच्या बक्षिस वितरणास प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. अनघाताई बिनीवाले व शिक्षणाधिकारी श्रीमती गरीमा गुप्ता या उपस्थित होत्या.

**असंघटित महिलांचे संघटीत शिबिर :**

१० मार्चला महिलांचे दोन दिवसांचे शिबिर घेण्यात आले. शिबिरात ५० महिला सहभागी होत्या. यामध्ये विविध विषयांवर वक्त्यांनी आपले विचार मांडले. सौ. मेघा विनेश नगरे – दैनंदिन जीवनक्रम सुखकर कसा कराल ?, श्री. उमेश विश्वाद – स्वत:ला ओळखा, मंजुषा कुलकर्णी – पालकत्व.

श्रीमती गरीमा गुप्ता यांनी शिबिराचा समारोप केला.

**विपश्यनेचे अनुभवकथन :**

वर्धिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक कॅप्टन सनत भाटे तथा दादा यांनी 'विपश्यनेची आवश्यकता' हा विषय वर्धिनीतल्या सर्व विभागाच्या महिलांसमोर मांडला. आपली घडण होताना आपल्या शरीरावर, मनावर जी आवरणे, पुटे चढत जातात ती झटकून टाकून आपल्या स्वत:ची नवीन ओळख करून घेतली पाहिजे. आपण जे जे काम करतो ते योग्य किंवा अयोग्य आहे हे तपासून बघण्यासाठी विपश्यना उपयोगी पडते. कोणतेही काम योग्य पद्धतीने, चांगले व उच्च पातळीचे झाले पाहिजे हा विचार दादांनी मांडला.

**आपले हृदय – कार्यशाळा :**

२६ एप्रिलला 'आपले हृदय' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. हृदयरोगाची पूर्वकल्पना करून देण्यासाठी साने केअर, माधवबाग यांच्या वतीने डॉ. अभिषेक झिपरे व श्री. बावीस्कर आले होते. वेगवेगळ्या स्लाईडद्वारा आपली हृदयरचना, त्याचे कार्य कसे चालते, हृदयात अडथळे कसे होतात, अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी म्हणजे काय, आपण आपल्या शरीराची व हृदयरोग होऊ नयेत म्हणून कशी काळजी घ्यावी या गोष्टी सविस्तर समजावून सांगितल्या.

**सहाय्यक परिचारिका वर्ग :**

दि. १५ व दि. १६ फेब्रुवारीला पुणे, येरवडा, नसरापूर येथील सर्व विद्यार्थिनींचे निवासी शिबिर घेण्यात

**आपण सर्व स्वदेशभक्त आहातच; पण देशाकरिता जो मरावयास तयार झाला तोच खरा देशभक्त होय.**

आले. एकूण ६३ विद्यार्थिनी, २ विद्यार्थी, ५ शिक्षिका व श्रीमती पुष्पाताई शिबिरास उपस्थित होत्या. शिबिरात वेगवेगळ्या सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

जनकल्याण रक्तपेढीला विद्यार्थिनींनी भेट दिली. तेथे त्यांनी रक्त कसे घेतात, कसे साठवितात ही माहिती घेतली. 'एक पिशवी रक्ताचा उपयोग तीन व्यक्तींना केला जातो. रक्तदानाविषयी जनजागृती गरजेची आहे' याची सर्वांना जाणीव झाली. त्यानंतर शिबीरस्थानी सौ. संध्याताई साबणे यांनी 'सावित्रीबाई फुले' हा एकपात्री प्रयोग सादर केला. डॉ. मेधा यांनी 'जीवनशैली व आरोग्य' यावर व्याख्यान दिले. 'सहजीवनाच्या उंबरठ्यावर' हा कार्यक्रम ज्ञानप्रबोधिनीच्या श्रीमती साधना सेठिया व श्रीमती अनिता गुजर ह्यांनी सादर केला. भावी आयुष्यात जीवनसाथीची निवड कशी करावी, नवीन नाती कशी टिकवावी याविषयी विवेचन केले. श्री. सुहासराव काणे यांनी एका तासात अंटार्क्टिकाची सफर घडवून आणली. बर्फाच्या वादळात पेंग्विन पक्षी एका ठिकाणी ६० दिवस उभे राहतात. जागा सोडून जात नाही. पण मानव मात्र एखादे संकट आले तर पळपुटा बनू शकतो. ह्या पक्ष्याकडून आपण शिकण्यासारखे असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.



- १६ फेब्रुवारीला सकाळी सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण श्री. जयंत कवठेकर सरांनी घेतले. याच दिवशी कचरा व्यवस्थापनाची चित्रफीत दाखविली गेली. त्यातून अनेक गोष्टी समजल्या. त्यानंतर नंदिनी जाधव यांनी अंध:श्रद्धा निर्मूलनाविषयी सप्रयोग कार्यक्रम सादर केला. पाण्यात दिवे पेटविले. काडेपेटी न वापरता निरंजन पेटविले. अखंड नारळातून बांगडी, काळा दोरा वगैरे गोष्टी काढून दाखविल्या. संमोहनाचा परिणाम कसा घडतो याचे प्रात्यक्षिक दाखविले.
- माजी विद्यार्थीनी वीरश्री वानखेडे यांनी आपले अनुभव कथन केले. त्यांनी अतिशय अडचणीतून मार्ग काढून प्रगती केली. ते ऐकून मुली स्तंभीत झाल्या. त्यानंतर डॉ. नेवासे यांनी 'प्रसुतिशास्त्र व शरीरशास्त्र' यावर ध्वनीचित्रफितीच्या साहाय्याने व्याख्यान झाले. त्यांनतर डॉ. येरलेवाड या दंतवैद्यांनी 'दातांची काळजी' हे संगणकाद्वारे सचित्र सांगितले. मुलींना ते भावले. कवयित्री श्रीमती हेमा लेले यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. परिचारिका कशी असावी ? ह्याविषयी त्यांनी त्यांच्या अपेक्षा व्यक्त केल्या.

**माजी विद्यार्थी मेळावा (परिचारिका वर्ग व शिवणवर्ग)** दि.९ मे ला परिचारिका वर्ग व शिवणवर्गाच्या मुलींचा मेळावा झाला. 'आपले काम व वर्धिनीची शिकवण' या विषयावर सौ. हर्षाताई जैन यांनी गटचर्चा घेतली. मुलींना कामातून आलेले अनुभव व त्यांना झालेला अभ्यासक्रमाचा फायदा लक्षात आला. स्टरलाईट

**देशरक्षणार्थ लढाईमध्ये आनंदाने मरण्यास देशाच्या ठायी आपलेपणाची भावना असल्याखेरीज कोणीही तयार होणार नाही.**

कंपनीचे श्री. पाटील व सौ. अंकुर अग्रवाल कार्यक्रमास उपस्थित होत्या. सौ. अंकुर ताईंनी नर्सिंग मुलींच्या मुलाखती घेतल्या. सर्व मुलींनी शिक्षकांशी मोकळेपणाने गप्पा मारल्या. नोकरी व व्यवसायामुळे सर्व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खूप वाढल्याचे लक्षात आले. अभ्यासक्रमाशिवाय शिबिरातून व इतर वेळेला होणाऱ्या बौद्धिक, वैचारिक सत्रांचा वैयक्तिक व कामात फायदा होत असल्याचे मुलींनी सांगितले.

२०१०-११ च्या माल्याच्या वर्गातील कु. सोनाली केसवड व कु. कल्याणी वाघवले या दोघी लवळे फाट्याहून सकाळच्या तीन ऑपरेशनला मदत करून ४ वाजता सगळ्यांशी भेट होईल या इच्छेने आल्या होत्या. या वर्गातील खूपशा मुलींनी गावाची वेस कधी ओलांडली नव्हती. पण प्रॅक्टिकलच्या कारणाने या मुली बसने पुण्यात आल्या आणि त्यामुळे सर्वजणींचा आत्मविश्वास खूप वाढला. कल्याणीने आपल्या पगारातून बहिणीच्या लग्नासाठी घेतलेले १.२५ लाखाचे कर्ज फेडले.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ :**

३१ जुलैला पुणे, नसरापूर, येरवडा या सहाय्यक परिचारिका वर्गांचा पारितोषिक वितरण समारंभ ‘अल्पबचत भवन’ येथे झाला. कार्यक्रमाला स्टरलाईट कंपनीच्या संचालिका सौ. ज्योतीताई आगरवाल आणि विशेष मार्गदर्शन करण्यासाठी आर्य समाजाच्या प्रचारिका श्रीमती निलोफरजी उपस्थित होत्या.

श्रीमती पुष्पाताई नडे यांनी प्रास्ताविक केले. यावर्षी परीक्षेला ६३ मुली बसल्या होत्या. वर्गाचा निकाल ९९% लागला. पारितोषिकप्राप्त विद्यार्थिनींना वर्धिनीकडून श्री. चंद्रकांत कुलकर्णी व श्री. बी. जी. नातू यांच्या बक्षीसासाठीच्या कायमनिधीतून रोख बक्षिसे देण्यात आली. स्टरलाईट कंपनीकडून सर्वांना घड्याळे भेट म्हणून देण्यात आली.

स्टरलाईट कंपनीच्या संचालिका श्रीमती ज्योतीताई आगरवाल यांनी सर्व मुलींचे जिद्दीने, चिकाटीने हा वर्ग पूर्ण केल्याबद्दल खूप कौतुक केले. प्रमुख पाहुण्या श्रीमती निलोफरजी मुलींना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, ‘‘वर्ग अनेक अडचणींवर मात करून तुम्ही पूर्ण केला आहे त्याप्रमाणे इथून पुढे ही येणाऱ्या सर्व अडचणींना धैर्याने सामोरे जात हाती घेतलेले काम तडीस न्या. यातच खरा पराक्रम आहे. यासाठी आपले ज्ञान व शक्ती सदैव जागृत ठेवा. असे करताना ईश्वर आपल्या पाठीशी सदैव असतो.’’

**नवीन वर्गांची सुरुवात :**

१ जुलै २०१४ रोजी माले येथे नर्सिंग वर्ग सुरू झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून टाटा पॉवरचे सिनीअर मॅनेजर श्री. देशमुख सर उपस्थित होते. श्री. देशमुख सरांनी मुलींचे कौतुक केले व नर्सिंग कोर्सचे फायदे समजावून सांगितले. त्यानंतर अन्य पाहुण्यांनी मनोगते व्यक्त केली. एक स्त्री शिकली की ती स्वतःच्या कुटुंबाला, गावाला, पर्यायाने ती समाजाला घडवत असते. त्यामुळे स्त्रीचे शिकणे किती महत्त्वाचे असते हे पुष्पाताईंनी मुलींना समजावून सांगितले. पुणे येथील वर्ग १५ जुलैला सुरू झाला.

**शिक्षक दिन : ५ सप्टेंबर**

वर्धिनीच्या कार्यालय व ग्रंथालय विभागाने पुण्यातील मुलींशी संवाद साधून वर्गात शिक्षक दिन साजरा झाला. ‘स्व’ची ओळख, व्यक्तिमत्त्व विकास कसा करावा याविषयी खेळ, गटचर्चा यातून सर्वांना मार्गदर्शन

**कोणत्याही देशातील, काळातील व परिस्थितीतील देशाभिमानी मनुष्य स्वार्थत्याग करणारा व परोपकारी असलाच पाहिजे.**

मिळाले. माले वर्गातील मुलींनी परिचारिका वर्गाचे विषय तयारी करून प्रश्नोत्तर रूपात शिकवले. यामुळे स्वयंअध्ययनाचे कौशल्य मुलींना अवगत झाले.

या वर्गातील ३० मुली प्रथमच घरापासून लांब राहून शिकत आहेत. त्यामुळे त्यांचा उत्साह वाढावा, मन रमावे अशा हेतूने २२ व २३ सप्टेंबरला रांगोळी व मेंदी स्पर्धा घेण्यात आली.



१० सप्टेंबरला टाटा पॉवर कंपनीने 'पोषण आहार दिन' साजरा केला. डॉ. वृंदा यांनी 'पोषक आहार' या विषयावर सर्वांना मार्गदर्शन केले. श्रीमती पुष्पाताईंनी रोजच्या आहारातल्या न्याहारीचे व मोड आलेल्या कडधान्यांचे महत्त्व सांगितले.

**संस्था भेट :**

दि. १४ ऑक्टोबरला पुण्याच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांची 'सन्मती बाल निकेतन संस्था, मांजरी' येथे संस्था भेट झाली. मा. सिंधूताईंची मुलगी ममताताई हिने संस्थेची माहिती दिली. प्रश्नोत्तर रूपात त्यांच्याशी गप्पा झाल्या. सर्व मुलांनी मिळून संस्थेला रु. २,२००/- देणगी दिली.

❖ ❖ ❖

**उद्योग शिक्षण वर्गातून आम्हाला काय मिळाले ?**

श्री. श्रीकांत शिंदे - K.E.M. हॉस्पिटलमध्ये मामा म्हणून काम करत होतो. आता तिथेच अतिदक्षता विभागामध्ये परिचारक म्हणून काम करतो.

श्रीमती सुवर्णा सोनवणे - वर्धिनीमुळे वाढलेल्या आत्मविश्वासाने ANM कोर्स पूर्ण करून के. ई. एम. मध्ये नोकरी करत आहे.

श्रीमती माधुरी भालसाकळे - मिळालेली मशीन वर्धिनीची सतत आठवण देत असते. या मशीनमुळे संसार व्यवस्थित स्थिरावला आहे.

श्रीमती अर्चना सांगळे - वर्धिनीतल्या संस्कारांमुळे दु:खी, गरीब रुग्णांकडे बघण्याची दृष्टी बदलली व सेवाभावी वृत्तीने अजूनही काम करत आहे.

श्रीमती कविता शेंडे - आजारी काकूची प्रकृती गंभीर झाल्यावर तिला ऑक्सिजन लावून कृष्णा हॉस्पिटलमध्ये हलवून तिला वाचवू शकले. यामुळे अभ्यासक्रम केल्याचे पूर्ण समाधान मिळाले आहे.

**देशाभिमानाची कल्पना मनुष्याच्या अंत:करणात सहज उद्भवणाऱ्या परोकारबुद्धीपासूनच उत्पन्न होते.**

## वरदान - वर्धिनीचं

मी मीनाक्षी. अगदी सर्वसामान्य मुलगी. घरच्यांच्या हो मध्ये हो मिळवणारी. २५ व्या वर्षी लग्न झाले. दोन मुलं (मुलगा, मुलगी) झाली. २००७ साली विधवा झाले.

आजही आपल्या समाजात एका विधवा बाईला काहीही स्थान नाही. फारसे शिक्षण नव्हते. पदरी दोन मुलं. मी के.इ.एम. मध्ये १० वर्षे आयाचे काम करत होते. काम करत असताना मी 'स्व'-रूपवर्धिनीच्या मुलींशी परिचारिका वर्गाची चौकशी केली. मला त्यांचा खूप हेवा वाटला. मनात आलं, की आपणही हा अभ्यासक्रम करावा. माझे पती, वडील भाऊ हे सगळे उच्च पदावर नोकरीत होते. त्यामुळे मलाही वाटत होते. आपणही यातून पुढे जावे. माझेही अकरावीपर्यंत शिक्षण झाले होते. मी 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये प्रवेश घेतला. तेव्हाच माझा आत्मविश्वास जागा झाला. माझी शिकण्याची इच्छा होती; पण काही कारणामुळे शिकू शकले नाही.

तीन महिन्यात अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाल्यावर प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. वेगवेगळ्या रुग्णालयात जाऊन काम शिकायचे. सराव (Practical) करायचे असा प्रघात होता.

मला आमच्या वर्गशिक्षिका सौ. विजयाताई कुलकर्णी यांचा खूप पाठिंबा होता. वयाच्या ४५ व्या वर्षी हा अभ्यासक्रम करत असताना काही जण टोमणे मारायचे तर काहीजण कौतुक करायचे. मी माझी नोकरी करून, सराव (Practical), मुलांचा अभ्यास सांभाळत होते. सरावाच्या वेळी परिचारिकेचा गणवेष, तर माझ्या कामाच्या वेळी आयाचा गणवेष असे चालू होते. यातून घरी तीन-तीन दिवस जात नव्हते. पण वर्धिनीचा आधार, मुलांसाठी पैसे कमावण्याची जिद्द या गोष्टींनी बळ आले व सारे निभावून नेले.

रुग्णसेवेबरोबर समाजसेवाही हातून घडत आहे. त्यामुळे जगण्याची आवड निर्माण झाली. नोकरीत कायम झाले. यशाच्या शिखरावर पोहोचताना माझी मुले माझ्याबरोबर आहेत, आईवडिलांची मोलाची साथ मिळाली आणि वर्धिनीने आधाराचा हात दिला.

वर्धिनीचा हा अभ्यासक्रम माझ्यासारख्या अर्धवट शिक्षण राहिलेल्यांसाठी व इतरांसाठी वरदानच आहे. वर्धिनीतले संस्कार, अंध:श्रद्धा बाजूला ठेवून समजावून घेऊन साजरे केले जाणारे सणवार, मुलींच्या ज्ञानात भर पडावी म्हणून त्यांच्यासाठी आयोजित केलेली विविध वक्त्यांची व्याख्याने व दर आठवड्याचे श्रीमती पुष्पाताईंचे व्याख्यान या सर्वांतून मी घडत गेले आणि त्याप्रमाणे मी माझ्या मुलांना घडवले. आज माझी मुलगी बी.एस्सी.च्या शेवटच्या वर्षाला आहे. मुलगा आठवीत शिकत आहे.

माझ्या आत्तापर्यंतच्या वाटचालीत वर्धिनीचा जो महत्त्वाचा वाटा आहे तो मी कधीच विसरू शकत नाही.

**- मीनाक्षी अशोक गायकवाड**

**देशाभिमानामध्ये दुसऱ्याच्या दु:खाच्या निरसनाकरिता स्वत:च्या सुखाचा त्याग करण्यास तयार होणे ही बुद्धि प्राधान्येकरून असावी लागते.**

**शिवणवर्ग :** यावर्षी जुलै २०१३ ला पुणे येथे वर्ग सुरू झाला व त्या वर्गाला एकूण १० मुलींनी प्रवेश घेतले. या सर्वजणी आतापर्यंत ११ कपडे शिवण्यास शिकल्या. त्यांनी शिवणाबरोबर इतरही उपक्रमात भाग घेतला होता. या वर्षी विंग या गावात पहिल्यांदाच शिवणाचा वर्ग सुरू झाला. त्याला ग्रामीण महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील या महिला कपड्यामध्ये अनेकानेक वैविध्य आणण्याचा प्रयत्न करत आहेत. पंधरवड्यातून एकदा पुण्याहून अन्य शिक्षिका वर्ग घेण्यास जात होत्या. गावातील एकूण २० महिलांनी प्राथमिक शिवणाचा वर्ग (ऑगस्ट २०१३ ते फेब्रुवारी २०१४ पर्यंत) पूर्ण केला. त्यांना २८ एप्रिल रोजी प्रशस्तिपत्रक दिले गेले. त्या वर्गातील अनेक महिलांनी शिवणवर्ग पूर्ण झाल्यानंतर काय केले, त्याचा फायदा काय झाला, यावर आपले मनोगत व्यक्त केले. त्यातीलच एका गरजू महिलेस शिवणाचे मशीन बक्षीस म्हणून देण्यात आले व इतर महिलांना शिवणाचे साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले. ह्या कार्यक्रमाला स्टरलाईट फौंडेशनचे श्री. चंद्रकांत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'स्व'-रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. उदय गुजर यांचेही मार्गदर्शन लाभले.



**बचतगट महिला मेळावा :** दि. १८ मे ला झालेल्या मेळाव्यास २० महिला उपस्थित होत्या. ओंकार स्तवनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. मेळाव्याचा उद्देश श्रीमती पुष्पाताईंनी सांगितला. गटात आल्याने विचारांची देवाणघेवाण होते. यातून एकमेकींची ओळख होऊन सर्वांनी मिळून नवीन उपक्रमांची सुरुवात करणे सोपे जाते. महिलांच्या बचतगटातील अनुभव कथनाने पुढील कार्यक्रम रंगला. त्यातील काही अनुभव :

सौ. वैद्य – जमाखर्चाचे नियोजन दैनंदिन जीवनात चांगले करता येऊ लागले.

सौ. सुरेखा माळी – सर्वात जुना गट आहे. गटाला १० वर्षे झाली. साडी विक्री, अत्तर बनवून त्याची विक्री, दागिने विक्री हे व्यवसाय गटाने केले.

सौ. नरवडे – बचतगटाच्या व्यवसाय शिबिरातून साबण पावडर व हँडवॉश तयार करायला शिकलो. सुरुवातीला ह्याची विक्री केली पण सध्या घरासाठीच बनवत आहे.

ज्ञानदा प्रतिष्ठानचे श्री. मनोज कुलकर्णी यांनी या वर्षापासून सुरू झालेल्या 'नळदुरुस्ती व घरगुती देखभाल' ह्या महिलांसाठीच्या प्लंबिंग व्यवसाय प्रशिक्षणाची माहिती सांगितली. महिलांच्या शंकांचे निरसन केले.

**समर्थ बचतगट, बिबवेवाडी :** नवरात्र उत्सवात परिसरातल्या महिलांना एकत्र करून भोंडल्याचा व भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. भजनी मंडळात बचत गटातील महिलांचा सहभाग होता. गटाने 'अखंडानंद' शाखेला शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त फुटबॉल भेट दिला.

गेल्या वर्षी वर्धिनीचे १५ गट होते. या नवीन वर्षात चार गट नव्याने सुरू झाले आहेत.

**साक्षरता वर्ग :** या वर्गाचा ३० महिला लाभ घेत आहेत. यामुळे यातील काही महिला 'मनाचे श्लोक' पठणात नित्य सहभागी होत आहेत. सहाय्यक परिचारिका वर्गातील मध्य प्रदेशातील विद्यार्थिनीने या वर्गाचा लाभ घेतल्याने ती आता मराठी लिहू व वाचू शकते.

**हिंदुस्थानातील समाजांपैकी बऱ्याच मोठ्या भागात जर काही सामान्य एकीचे लक्षण असले तर ते धर्मच होय.**

## स्पर्धा परीक्षा केंद्र

**गुणवंतांचा सत्कार सोहळा :**

दि. १६ फेब्रुवारी रोजी पूर्व परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सचिन गावडे (डेप्युटी कमांडट NDRF) तर अध्यक्ष म्हणून श्री सतीश पाटील सर उपस्थित होते. यशस्वी गुणवंतांनी आपले मनोगत व्यक्त केले. कु. योगिता ढोले (नायब तहसिलदार) यांनी अभ्यास कसा करावा, नोटस् कशा काढाव्यात तसेच वर्धिनीत अभ्यास केल्याचा कसा फायदा झाला, सतीश पाटील सरांचे कसे मार्गदर्शन मिळाले, या सर्व आठवणी नमूद केल्या. त्यांनी सांगितलेली Star Fish ची कथा प्रत्येकाच्या मनात घर करून गेली. श्री. संदीप भंडारे यांनी अतिशय खेळकर शब्दांत आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले तर श्री. कैलास अंडील यांनी लहानपणापासून वर्धिनीत शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांतून जास्तीत जास्त यश मिळवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्री. नवनाथ वाघ याने आईस्क्रीमची गोष्ट सांगून कार्यक्रमाची रंगत वाढवली. मनोगतानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सतीश पाटील सर यांनी अधिकारी झाल्यावर कसे बोलावे, कसे वागावे आणि स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत कशी उपलब्ध करून द्यावी याविषयी चांगले मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. गावडे सर यांनी विद्यार्थ्यांना अपयशातही यश कसे लपून असते हे सांगितले. त्याचप्रमाणे मेहनतीला पर्याय नाही असा कानमंत्र विद्यार्थ्यांना दिला. त्याचप्रमाणे त्यांच्या कामातील काही अनुभव सांगितले. उदा. जम्मू काश्मीरमधील काही प्रसंग, मुंब्रा बिल्डिंग दुर्घटना. कार्यक्रमाचा समारोप व आभार प्रदर्शन श्री. गोरख लवाटे यांनी केले.

**सत्कार मूर्तींचा परिचय :**

अनेक वर्षे ग्रंथपाल म्हणून काम करणाऱ्या ''आव्वा'' उर्फ श्रीमती नीला कुंडलिंगार यांचे व्यक्तिमत्त्व खूप शिकवून जाण्यासारखे आहे. लहानपणीच लग्न होऊन आव्वा महाराष्ट्रात आल्या. प्रतिकूल परिस्थितीशी झगडून आपल्या मुलांना उच्चशिक्षणास प्रोत्साहन देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे केले. मूळ भाषा कन्नड त्यामुळे उत्तम मराठी शिकल्या व ग्रंथपाल हा अभ्यासक्रम पूर्ण करून गेल्या काही वर्षांपासून वर्धिनीत कार्यरत आहेत. हसतमुख व प्रेमळ स्वभावाच्या आव्वा वाचनाचा छंद जोपासण्यास प्रोत्साहन देतात. तसेच दर्जेदार अवांतर वाचनाची पुस्तके उपलब्ध करून देतात.

आपण जिथे अभ्यास करतो, उपासना करतो त्या जागेची स्वच्छताही खूप महत्त्वाची असते. अभ्यासिका व सभागृह येथे स्वच्छतेचे काम करणाऱ्या सर्वांशी हसत-खेळत मिळून मिसळून वागणाऱ्या श्रीमती सुरेखा चिवे मावशी व श्रीमती नंदा कांबळे मावशी यांना पुष्प व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभानंतर प्रमुख वक्त्या सौ. मंजूषाताई कुलकर्णी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या,

ज्याच्या योगाने आपला देशच नव्हे तर सर्व जग सुरळीत चालले आहे तोच धर्म होय.

'सर्वांच्या जडणघडणीत 'स्व'-रूपवर्धिनीचा बहुमोल वाटा आहे. वर्धिनीच्या शिकवणुकीची आपल्या कार्यक्षेत्रात काम करताना प्रत्यक्ष सांगड घालण्याचे कौशल्य आपण दाखविले पाहिजे.' त्यानंतर अभ्यासिकेतील विद्यार्थिनी सौ. रेश्मा लेंगरे यांनी ''होय मी सावित्रीबाई ज्योतिबा फुले बोलतेय'' हे भाषण सादर केले. आज जर सावित्रीबाई असत्या तर त्यांनी आजच्या स्त्रीशी कसा संवाद साधला असता हेच डोळ्यासमोर उभे राहिले. 'खरंच आजची स्त्री उच्चशिक्षित होऊन उच्चपदांवर कार्यरत आहे. अरुंधती भट्टाचार्य, राही सरनोबत, रूपा रेगे, कविता राऊत यांसारख्या महिला त्यांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणासाठी समाजाचा विरोध, अपमान सहन केला पण त्या डगमगल्या नाहीत. त्याचप्रमाणे स्त्रीने निर्भय होऊन एकमेकींना प्रोत्साहित करत आत्मविश्वासाने पुढे जायला हवे. अब्दुल कलामांनी म्हटल्याप्रमाणे, ''ऐरण झालीस तर घाव सोस पण हातोडा होण्याची वेळ आली तर घाव घाल.'' अशा प्रकारे सामाजिक प्रबोधनाचे उत्तम विचार या कार्यक्रमात सादर झाले.

**अभ्यास सहल :**

''तुम्ही एखादे चांगले काम करण्यास सुरुवात केल्यावर लोक तुमची परीक्षा घेतात, परंतु तुम्ही शेवटपर्यंत टिकून राहिलात, तर तेच तुम्हाला कार्य पूर्ण करण्यास मदत करतात''.

'बी' मातील पडले की ते रुजते. त्यापासून अंकूर, अन् अंकुरापासून एक विशाल झाड निर्माण होते हे वैश्विक सत्य पाहाण्यासाठी स्पर्धा-परीक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल २१ फेब्रुवारीला हिवरे बाजार आणि राळेगणसिद्धी येथे गेली. सध्याचे हिवरे-बाजारचे उपसरपंच मा. श्री. पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून हे आदर्श गाव साकार झालं. त्यांच्या ओजस्वी बोलण्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व विकासाचे अनेक पैलू उलगडत गेले. त्यांच्या मते, ''माणूस शिकून केवळ साक्षर न करता, तो सुसंस्कारित कसा होईल याचा प्रयत्न'' हाच विकासाचा पाया. त्यांनी शाळेतील बालकांपासून वृद्धांपर्यंत 'कार्यतत्पर विकासाची' व्याख्या रुजविली. त्यांनी प्रथम 'स्त्री' ची 'अस्मिता' ओळखून तिला कुटुंबाप्रमुखाचे स्थान मिळवून दिले. महिला बचत गटांची बांधणी केली. तसेच आजपर्यंत विहीर तेथे पवनचक्की, स्वच्छता अभियान, निर्मलग्राम, तंटामुक्त गाव, पाणलोट विकास, पाण्याचे वितरण महिलांकडे, धार्मिक मंदिरांची उभारणी, श्रमदान आदी गोष्टींचा लोकसहभागातून विकास साधला आहे. स्वयंप्रेरणेतून सामाजिक कार्य केल्याने या गावाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न १४.५ कोटी रुपये झाले आहे. पोपटराव पवार यांनी 'पंचायत राज' आणि 'पर्यावरण' एवढेच स्वत:चे कार्यक्षेत्र निवडले आहे.

राळेगणसिद्धी मध्येही मा. आण्णा हजारेंनी लोकांना प्रेरित करून आदर्श गावाचा संकल्पना साकारली आहे. या सगळ्यातून गावातील लोक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन एकत्र आल्यास महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील ग्रामस्वराज्याची संकल्पना साकार होण्यास विलंब लागणार नाही याची प्रचिती आली. तेथील Media Centre आणि 'पुरस्कारांचे दालन' बघून आम्ही सर्वजण अवाक् झालो आणि राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची नवी उमेद

**सतत कर्माकडे प्रवृत्ति ठेवून सदाचरण करावे याखेरीज दुसरे काही धर्म शिकवीत नाही.**

आमच्यात निर्माण झाली.

**कारगील विजय दिन :**

कारगील विजयदिनाच्या निमित्ताने विशेष अतिथी आणि मुख्य मार्गदर्शक म्हणून लेफ्टनंट जनरल व्ही. एम. पाटील (PVSM, AVSM) (निवृत्त उपलष्कर प्रमुख) लाभले होते. 'कारगील विजयाची पंधरा वर्षे आता पुढे काय ?' या विषयावर आपले विचार मांडताना श्री. पाटील म्हणाले, ''कारगील विजयाला पंधरा वर्षे झाली, तरीसुद्धा त्या युद्धाच्या आठवणी आजपर्यंत जाग्या आहेत. वारंवार युद्धबंदीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पाकिस्तानला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर देऊन आक्रमण थोपवून विजय मिळवला.'' मुख्य मार्गदर्शनानंतर काश्मीरची वर्तमान स्थिती, पाकिस्तानची युद्धनीती, पाकिस्तानचे इतर देशांशी संबंध, भारताची सीमेची वर्तमान स्थिती या विषयावरील प्रश्नांना श्री. पाटील यांनी उत्तरे दिली. या कार्यक्रमासाठी काही काश्मिरी पंडितांची विशेष उपस्थिती होती. पनुन कश्मिर या संघटनेची भूमिका व काश्मिरी पंडिताची व्यथा आणि वर्तमान स्थिती या संदर्भातील निवेदन श्री. सुनील धर या काश्मिरी युवकाने याप्रसंगी केले. याच दिवशी संध्याकाळी झालेल्या विशेष सत्रात श्री. सारंग जोशी यांनी 'भारत व शेजारील देश' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

दि. २७ जुलै संध्याकाळी श्री. प्रसाद बर्वे यांचेही एक विशेष चर्चासत्र झाले. या सत्रासाठी हे आले होते. 'भारत व बांग्ला देश समस्या व उपाय' हा विषय त्यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून मांडला.

**शिष्यवृत्ती बॅच उद्‌घाटन समारंभ :**

दि. १० ऑगस्ट रोजी कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी विशेष प्रमुख पाहुणे म्हणून वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी डॉ. श्री. शिवाजी जगताप (उपजिल्हाधिकारी) आले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. त्याशिवाय आपली वाटचाल योग्य होऊ शकणार नाही. प्रशासनामध्ये मला कशासाठी यायचे आहे ? त्यामागची माझी भूमिका काय आहे ? हे स्पष्ट करायला हवं.''

**गणेश उत्सव :**

'अभ्यासयज्ञ आणि प्रबोधन सत्र' अशा दोन उपक्रमाची जोड देऊन यंदाचा उत्सव 'स्व'-रूपवर्धिनी अभ्यासिकेत संपन्न झाला.

उत्सवाच्या कालावधीमध्ये जास्तीत जास्त तास अभ्यास करणे हा मुख्य उद्देश होता. उत्सव कालावधीमध्ये एकूण आठ प्रबोधन सत्रे संपन्न झाली ती याप्रमाणे - १) अदम्य आमुची ध्येयासक्ती - श्री. सचिन कुलकर्णी २) छत्रपती शाहू महाराज - श्री. सुधीर नेर्ले ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - श्री. सागर शिंदे ४) शहीद भगतसिंग - श्री. इंद्रजीत देशमुख ५) महात्मा फुले - श्री. संदीप मोरे ६) थोरांचे बालपण - श्री. मयुर कर्जतकर ७) चंद्रशेखर आझाद - श्री. राजेंद्र उपरे ८) सावित्रीबाई फुले - श्री. अर्जुन खेडकर.

**स्वार्थत्याग करावयास जो मनोनिग्रह लागतो, तो मनोनिग्रह करावयास धर्म शिकवील, धर्माने मनाचे संकुचितत्व जाते.**

आरतीसाठी वॉचमन मोरे काका, मेसवाले मुढे काका-काकू, चहावाले काका, सफाई काम करणाऱ्या चिवे काकू, ट्रान्सपोर्टचे काम करणारे शिंदे काका यांना बोलावले होते.

**भारताची अवकाश भरारी :**

२४ सप्टेंबर २०१४ हा दिवस सर्व भारतीयांसाठी विजयाचा आणि आनंदाचा ठरला. या दिवशी भारताने पहिल्याच प्रयत्नात मंगळावर यशस्वीरित्या यान पाठवले आणि असे करू शकणारा जगातील पहिलाच देश ठरला.

या मोहिमेची यशस्वीता आणि भारताची अवकाश तंत्रज्ञानातील प्रगती या विषयावरील अभ्यासपूर्ण कार्यक्रम २३ सप्टेंबरला झाला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री. सुनिल कुलकर्णी (निवृत्त शास्त्रज्ञ) HEMRL) हे लाभले होते. Slide show, videos, photos अशा विविध माध्यमांच्या सहाय्याने भारताची अवकाश तंत्रज्ञानातील प्रगती, भारतातील महत्त्वाची प्रक्षेपण स्थळे, यशस्वी झालेल्या मोहिमा, भविष्यातील अवकाशातील ग्रहांची स्थिती, सजिव सृष्टीचे अस्तित्व याच बरोबर अवकाशातील सध्या घडणाऱ्या सर्व घडामोडी अशा विषयांवर सरांनी मार्गदर्शन केले.

**पुरंदर सहल :**

पुरंदर किल्ल्यावर दि. १२ ऑक्टोबरला सहल आयोजित केली होती. हा एक अभ्यास दौरा होता. सहलीत साठ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रवासादरम्यान दोन गटात वादविवाद स्पर्धा झाली. पुरंदरला पोहोचल्यावर किल्ल्यावर घोषणा देत चढायला सुरुवात केली. केदारेश्वराचे मंदिर म्हणजे पुरंदरचे सर्वोच्च शिखर. मंदिरात सगळ्यांनी मिळून उपासना केली. गड उतरताना सर्वांनी 'स्वच्छता अभियान' राबवले. पायथ्याशी असलेले सभागृह स्वच्छ करून मोहिमेचा शेवट झाला.

**माळीण अभ्यासदौरा :**

फक्त ज्ञानार्थी अधिकारी न घडवता अभ्यासकाळातच विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना योग्य आकार प्राप्त व्हावा म्हणून अनेक उपक्रम योजले जातात. त्यातीलच एक उपक्रम म्हणजे दि. ३० ऑगस्टला केंद्रामार्फत आयोजित केलेला माळीण अभ्यासदौरा.

या अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्ती व तिचे परिणाम नेमके कसे होऊ शकतात याविषयी सविस्तर माहिती मिळाली व तेथील लोक व त्यांची जीवनशैली यांचा आम्ही सविस्तर अभ्यास केला. तिथे जाऊन आम्ही भातलावणीचा उपक्रम राबवून माळीणवासियांना मदतीचा हात दिला. या अभ्यास दौऱ्याचे हेतू खालीलप्रमाणे होते :-

१) नैसर्गिक आपत्ती येण्यामागची कारणे शोधणे.

२) माळीणवासियांच्या दु:खात सहभागी होऊन त्यांना मदतीचा हात व भावनिक आधार देणे.

३) भूस्खलन का घडते व त्याचा परिणाम काय होतो याचा सविस्तर अभ्यास करणे.

४) अपघातात मृत्यू पावलेल्या लोकांना श्रद्धांजली वाहणे.

**उच्च कल्पना, अत्युच्च कल्पना लोकांस शिकवून, जातीजातींतील भेद नाहीसे करून आपण सारे एकत्र आहोत असे वाटावयास लावणे हे खरे धर्मशिक्षण आहे.**

माळीण पश्चिम घाटात वसलेलं एक चिमुकलं गाव. हे गाव दि. ३० जुलैला महाराष्ट्राच्या नकाशात नावापुरतंच राहिलं. राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (NDRF), राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) व सेवाभावी सामाजिक संस्था यांसारख्या संस्थांनी या नैसर्गिक आपत्तीत वेगाने बचावकार्य करून शक्य होते तेवढ्या लोकांचे प्राण वाचवले. या दुर्घटनेत एकूण १५६ व्यक्ती मृत्यू पावल्या.

एकूणच १०० विद्यार्थी संख्या असणाऱ्या या अभ्यासदौऱ्याचे योग्य व्यवस्थापन व्हावे म्हणून भूकंप गट, त्सुनामी गट, ज्वालामुखी गट आणि ढगफुटी गट अशा चार गटात विद्यार्थ्यांचे विभाजन केले होते.

घोडेगांव येथील एका मंगल कार्यालयात विद्यार्थ्यांचा निवासी मुक्काम होता. श्री. निलेश धायरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील एक प्रसंग सांगून आपणही माळीणमध्ये कसे काम करू शकतो हे सांगितले. श्री. चंदन हायगुंडे यांनी भगतसिंगांच्या आयुष्यातील प्रसंग सांगून आपणही कामात स्वर्ग कसा शोधू शकतो यासंबंधी विचार मांडले.

घोडेगांवमधून निघून माळीणमध्ये पोहोचल्यावर तेथील शांततेने आमचे मन हेलावून गेले. जिथे एकेकाळी लहान मुलांचा आणि पक्षांचा किलबिलाट असायचा, रहदारी असायची व देवळाचे शिखर सूर्योदयाचे स्वागतासाठी ताठ मानेने उभे असायचे, आज तेच माळीण शून्यवत झाले होते. आम्ही सर्वांनी क्षणभर शांत उभे राहून मृत व्यक्तींना श्रद्धांजली वाहिली. कामासाठी दोन गट करून शेतांमध्ये भातलावणीसाठी गेलो. ज्यांच्या शेतामध्ये आम्ही भात लावण्यासाठी गेलेलो त्या झांजरे कुटुंबाने आपल्या घरातील ११ व्यक्तींना गमावले होते तर दुसरीकडे पोटे नावाच्या कुटुंबाने आपल्या ७ जिवाभावाच्या माणसांना काळाच्या स्वाधीन केले होते. या दौऱ्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी माळीणवासियांना साहाय्य करण्याचा मनापासून प्रयत्न केला. एकूण १ एकर शेतात विद्यार्थ्यांनी भात लावणी करून या कुटुंबांना मोलाची मदत केली. प्रत्येक विद्यार्थ्याने अगदी मनापासून कामात सहभाग घेतला. सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत आम्ही भातलावणीचा हा कार्यक्रम पूर्ण केला.

हा संपूर्ण अभ्यासदौरा यशस्वी करण्यासाठी आम्हाला 'वनवासी कल्याण आश्रमा'चे पूर्णवेळ काम करणारे श्री. ज्ञानेश्वर वडेकर व श्री. विनोद अस्वले व श्री. विजय यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सौ. मनीषाताई नर्डेकर, श्री. चंदन हायगुंडे व डॉ. विनेश नगरे यांनी मार्गदर्शन केले.

**इंद्रधनुष्य – संस्था भेट :**

२२ मार्चला 'जागतिक जलदिन' साजरा केला. सर्वत्र पाण्याचे महत्त्व, पाणी बचतीचे महत्त्व सांगणारे विविध उपक्रम या दिवशी केले जातात. भावी प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाणी व्यवस्थापन, पाणी समस्या, त्या संदर्भातील योजना इ. माहीती व्हाव्यात यासाठी 'जागतिक जलदिना'च्या दिवशी पुण्यातील 'इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्रा'स भेट दिली.

❖ ❖ ❖

**निर्णय करणे हे काम बुद्धीचे आहे. निर्णयाला बळकटपणा आणणे हा मनाचा धर्म होय.**
**म्हणून धैर्य हा गुण मन आणि बुद्धी यांच्या साहाय्याने उत्पन्न होतो असे म्हटले पाहिजे.**

| स्पर्धा परीक्षा केंद्र - २०१४ मधील यशस्वी विद्यार्थी | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | निवड झालेले पद |
| १. | राहुल पाटील | वरिष्ठ लिपिक - सेंट्रल रेल्वे |
| २. | मनोज पारधी | मल्टीटास्किंग स्टाफ सिलेक्शन कमिशन |
| ३. | रत्नदीप वानखेडे | मल्टीटास्किंग स्टाफ सिलेक्शन कमिशन |
| ४. | कैलास अन्डील | नायब तहसीलदार |
| ५. | डॉ. राजीव बाबळे | नायब तहसीलदार |
| ६. | शीला जमदाडे | नायब तहसीलदार |
| ७. | वैभव खराबी | गटविकास अधिकारी |
| ८. | कु. योगिता ढोले | नायब तहसिलदार |
| ९. | रविराज जाधव | नायब तहसिलदार |
| १०. | प्रशांत खेडकर | प्रभाग अधिकारी |
| ११. | संदीप भंडारे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| १२. | शुभांगी पाटील | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| १३. | विजय गोटे | सहाय्यक विक्रीकर आयुक्त |
| १४. | कु. मेघा ढोले | मंत्रालय सहायक |
| १५. | अविनाश अतकड | मंत्रालय सहायक |
| १६. | स्वप्निल बोरसे | डेपो मॅनेजर - एस.टी.महामंडळ |
| १७. | निलेश थोरात | डेपो मॅनेजर - एस.टी.महामंडळ |
| १८. | कैलास चव्हाण | पर्यवेक्षक - पशुसंवर्धन मंडळ |
| १९. | प्रशांत शेंडे | विकीकर निरीक्षक |
| २०. | अमर चव्हाण | लिपिक - देना बँक |
| २१. | सौ. शिल्पा जमदाडे | नायब तहसीलदार (वर्ग २) |
| २२. | श्री. कैलास अंडील | नायब तहसीलदार (वर्ग २) |
| २३. | वैभवी खराबी | गट विकास अधिकारी (वर्ग २) |

- स्पर्धा परीक्षा केंद्राचे माजी विद्यार्थी व मार्गदर्शक श्री. रामदास मिरकर पुणे विद्यापीठात एम.ए.(राज्यशास्त्र) विषयात सर्वप्रथम आले.
- शिष्यवृत्ती योजना २०१३-१४ या गटाचा विद्यार्थी श्री. योगेश पाटील पुणे विद्यापीठात एम.ए.(राज्यशास्त्र) विषयात बहिस्थ विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम.
- सहायक यंत्र अभियंता वर्ग २ या पदासाठी सर्वश्री स्वप्नील बोरसे, निलेश थोरात तर विधी अधिकारी म्हणून अविनाश विश्वास यांची निवड झाली. 'स्व'-रूपवर्धिनी परिवारातर्फे सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

**मनुष्यांचे धैर्य व परमेश्वराची मदत यांचे प्रमाण समच आहे, व्यस्त नाही हे लक्षात ठेवा.**

## अभिनंदन

- भारत सरकारने वर्धिनीचे सन्माननीय सभासद ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना पद्मविभूषण तसेच वर्धिनीचे दुसरे सन्माननीय सभासद आणि 'सकाळ' वृत्तसमूहाचे अध्यक्ष श्री. प्रतापराव पवार ह्यांना पद्मश्री ह्या अत्यंत श्रेष्ठ पुरस्कारांनी सन्मानित केले.
- प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पुणे महापालिकेच्या वतीने वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन सरांना शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.
- वर्धिनीचे कार्यकर्ते, कार्यकारिणीचे सदस्य आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे पालक श्री. चंदन हायगुंडे यांना इंडियन एक्स्प्रेसमधील सह्यादी व्याघ्र प्रकल्पावरील विशेष शोध लेखमालेबद्दल स्व. इंदिरा गांधी राष्ट्रीय कला अकादमी, दिल्ली येथे Young Environmental Journalist Award ने सन्मानित करण्यात आले.
- वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. सुमीत पाटील आणि श्री. संदेश मनवल हे चार्टर्ड अकाऊंटंट परीक्षेचे दोन्ही ग्रुप पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झाले.
- श्री. सुनील कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनामुळे कु. अभिराज मेंगाणे आणि कु. आर्चिस कुलकर्णी हे इयत्ता ६ वीतील विद्यार्थी डॉ. होमी भाभा अखिल भारतीय बाल वैज्ञानिक परीक्षेच्या अंतिम फेरीत दाखल झाले.

### जायचे पुढे पुढे, निश्चय हा ठाम !

'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यकर्ते सर्वश्री सुमित डोळे, गणेश काठे, मंदार रायरीकर आणि मंदार पारगावकर हे चौघे जण गेली काही वर्षे अत्यंत परिश्रमाने 'स्वप्न उद्योग' या शीर्षकाखाली यशस्वीपणे उद्योग क्षेत्रात वाटचाल करीत आहेत. व्यवसायातील नफ्याचा काही भाग नियमितपणे दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी वर्धिनीत येऊन ते वर्धिनीस अर्पण करीत असतात. वर्धिनीतील व्यावसायाभिमुख तरुणांना हे चौघे जण वेळोवेळी प्रोत्साहन व मार्गदर्शन देत असतात. व्यवसायातील व्यस्त वेळापत्रकातूनही वर्धिनीच्या औपचारिक-अनौपचारिक कार्यक्रमांसाठी ते आवर्जून वेळ काढत असतात.

*अशा 'स्वप्न उद्योग'चे 'स्वप्न उद्योग प्रायव्हेट लिमिटेड'मध्ये रूपांतर झाल्याप्रसंगी सर्व वर्धिनीयांतर्फे या चारही संचालकांचे*

***मन:पूर्वक अभिनंदन !***

**दुसऱ्याला शिव्या देण्यापेक्षा दुसऱ्याच्या शिव्या संथपणे ऐकून घेणे अधिक धैर्याचे लक्षण आहे.**

## कार्यालय विभाग

**संस्था भेट :**

यावर्षी कार्यालय विभागातील श्रीमती प्रगती तांबट, श्रीमती नीला कुडलिंगार, व श्री. दत्ता तुपे यांनी मकरसंक्रांतीच्या निमित्ताने मुलांना तिळगुळ देण्यासाठी श्रीवत्स या लहान मुलांच्या संस्थेस भेट दिली.

तिथे गेल्यावर तेथील कार्यकर्त्यांनी संस्थेची सविस्तर माहिती सांगितली. सध्या संस्थेमध्ये वय वर्षे ० ते ६ वर्षांपर्यंतची एकूण ७९ मुले व मुली आहेत. ज्यांच्याकडून या मुलांचे पालनपोषण व्यवस्थित केले जाऊ शकते अशा जोडप्यांना ही मुले दत्तक दिली जातात. या संस्थेतील मुलांची अतिशय चांगल्या पद्धतीने व्यवस्था केलेली आहे. चित्रकला काढण्यासाठी छानशी टेबल खुर्ची होती. तसेच मुलांचे भोजनगृह अतिशय स्वच्छ व नीटनेटके होते. ही सर्व व्यवस्था पाहून मनाला खूपच समाधान वाटले. या सर्व मुलांना चांगले आई-बाबा मिळावेत ही देवाचरणी प्रार्थना.

**रंगात रंगून जाऊयात :**



यंदाही डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिवशी वर्धिनीच्या वास्तूत चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. चित्रकला स्पर्धेचा विषय हा 'इमारतीच्या बाहेरील भागाचे सुशोभन' हा होता.

स्पर्धा परीक्षा केंद्र, नर्सिंग कोर्स, शिवणवर्ग आणि अभ्यासिका या सर्व विभागामधून एकूण ६२ स्पर्धकांनी भाग घेतला. स्पर्धकांनी उत्तम कल्पना सुचवल्या, त्याचा उपयोग नक्की होईलच.

वर्धिनीच्या सर्वात जुन्या कार्यकर्त्या आणि ग्रंथपालिका श्रीमती नीला कुडलिंगार यांच्या हस्ते पहिल्या ३ विजेत्यांना बक्षीस देण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. कपिल भापकर | प्रथम पारितोषिक | स्पर्धा परीक्षा केंद्र |
| २) | कु. रश्मी दिनेश बच्छाव | द्वितीय पारितोषिक | सहाय्यक परिचारिका वर्ग |
| ३) | कु. तेजस तुकाराम गाडवे | तृतीय पारितोषिक | अभ्यासिका विभाग |
| | कु. गौरी संजय शिंदे | (विभागून) | अभ्यासिका विभाग |

**संगणक माहिती सत्र :**

दि. ११ ऑक्टोबरला वर्धिनीतच 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यकर्ते श्री. निशिकांत वाईकर यांनी 'संगणक सॉफ्टवेअर्स'ची माहिती दिली. संगणकाचे सर्व भाग, सेंट्रल प्रोसेसिंग युनिट (सी.पी.यू.)चे सर्व भाग, त्याचे कार्य, संगणकाची स्वच्छता, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह कसे वापरावे याची माहिती अतिशय सोप्या भाषेत त्यांनी सांगितली. संगणकाच्या वापरातील सर्व शंकांचे निरसन त्यांनी केले. या 'माहिती सत्रा'त

**धंदे शिक्षणावाचून हल्लीच्या व्यापारी चढाओढीच्या काळात स्वत्व राखण्यास दुसरा मार्गच नाही.**

कार्यालयाबरोबरच स्पर्धा परीक्षा केंद्र, महिला विभाग, बालवाडी विभाग यांचा सहभाग होता.

**स्वच्छता अभियान :**

भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छ भारत अभियाना'ची घोषणा करून ते स्वत: त्यात सहभागी झाले. संपूर्ण देश या कार्यामध्ये सक्रिय झाला. १९ नोव्हेंबरला या अभियानाचा उपक्रम वर्धिनीच्या परिसरात घेण्यात आला.

दुपारी ३ ते ५ या वेळेत वर्धिनीतील कार्यालय विभाग, नर्सिंग विभाग, स्पर्धा परीक्षा केंद्र, युवक विभाग आणि अभ्यासिका विभाग यातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व कर्मचारी सहभागी झाले होते. वर्धिनीची इमारत केंद्र मानून तीन गटात सिंचन भवन, तोडकर हॉस्पिटल व टुरिस्ट हॉटेलपर्यंतचा परिसर सेवाभावी वृत्तीने समाजाला स्वच्छतेचा मंत्र देत सर्वांनी स्वच्छ केला.

अभियानाचा समारोप श्री. शिरीष पटवर्धन सरांच्या प्रबोधनाने झाला. 'स्वच्छ भारताचे स्वप्न' हे काही एका दिवसात पूर्ण होणार नाही. यात प्रत्येक दिवस महत्त्वाचा आहे. तसेच प्रत्येक नागरिकाचे योगदान जरुरीचे आहे. 'यासाठी आपण प्रत्येकजण जागरुकतेने वागण्याचा मनोमन प्रयत्न करू या' असे त्यांच्या आवाहनाचे सूत्र होते.

**स्नेहमेळावा :**

१४ नोव्हेंबर २०१४, 'स्व'-रूपवर्धिनी परिवाराच्या कार्यालय व इतर विभागातील सर्व कार्यकर्त्यांना नेहमीच्या बंदिस्त दिनक्रमातून बाहेर पडून जरा बदल म्हणून आयोजित केलेला स्नेहमेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये कार्यालय, स्पर्धा परीक्षा केंद्र व युवक विभागातील बावीस जण सहभागी झाले होते.

खूप दिवसानंतर/वर्षांनंतर खेळायला मिळणार या उत्साहात ''संगीत खुर्ची''चा खेळ सुरू झाला. संगीताची जबाबदारी कार्यालयीन विभाग प्रमुख मेघाताईंनी, तर छायाचित्रणाची डॉ. विनेश नगरे सर यांनी स्वीकारली. रांग करणे, संगीताचा ठेका, स्पर्धा, चुरस, धावाधाव आणि स्पर्धेतही आलेली गंमत आणि पुन्हा लहान होऊन मनसोक्त खेळण्याचा आनंद हा या कार्यक्रमाचा विशेष.

त्यानंतर सगळ्यांचा आवडता ''लिंबू-चमचा'' खेळ पार पडला. तिसरा व महत्त्वाचा खेळ - ''पाणी भरा''. दहा-दहाचे दोन गट करून ओंजळीने पाणी एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमित करून कमाल पाणी बाटलीत भरणे. खेळ संपल्यानंतर विजेत्यांचे श्रीमती पुष्पाताई नडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. 'संगीत खुर्ची'मध्ये श्री. रुपेश जाधव, 'लिंबू चमचा'मध्ये श्रीमती तांबट वहिनी आणि 'पाणी भरा' खेळात गट 'अ' विजेता ठरला. त्यानंतर कार्यालय सहायक श्री. निरंजन अभंग व वाहनचालक श्री. दत्ता तुपे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या तसेच 'स्व'-रूपवर्धिनीचे प्रांगण स्वच्छ करणाऱ्या सौ. सुरेखा चिवे मावशी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

❖ ❖ ❖

**योग्य वाटेल ते ध्येय पसंत करावे आणि मग त्या ध्येयाकरिता जन्मभर स्वत:ला वाहून घेऊन त्याचे फळ देशाला वाहीन असा निश्चय मनाशी करावा.**

## फिरती प्रयोगशाळा

“सर, आज काय आणलंय ?”,
“आज ना, प्राण्यांची खेळणी आणलीत खेळायला !”
“आज मजा आहे.” वर्धिनीची गाडी शाळेत आली की दारातच मुलांशी होणारे अशा प्रकारचे संवाद वेगळाच हुरूप घेऊन येतो. विज्ञानातील प्रत्येक पाठावरील प्रयोग हा एक खेळच असतो. प्राण्यांच्या खेळण्यांबरोबर खेळताना आपण वर्गीकरण करायला कधी शिकलो, चुंबकांबरोबर खेळता-खेळता त्याच्या गुणधर्मांशी ओळख कधी झाली, भाजलेले शेंगदाणे सोलून दाणे वेगळे करून शेवटी गट्टम केल्यावर लक्षात येते की मिश्रणातील घटक वेगळे कसे करायचे हे आपल्याला समजू लागले. या आणि अशा अनेक खेळांच्या सहाय्याने पुस्तकातील प्रयोग, धडा सोपा वाटू लागतो. आणि विज्ञानाशी दोस्ती कधी जमते हे कळतच नाही. ह्याचे उदाहरण --
७ वीचा वर्ग चालू असताना अचानक वर्गात साप येतो आणि काही कळायच्या आतच सेवकाकडून मारला जातो. मग अचानक सापाच्या शरीरात हाडे कशी असतात ह्यावर चर्चा सुरू होते. ह्या मेलेल्या सापाचाच त्यासाठी उपयोग करायचे ठरते. त्याला पाण्याच्या टाकीजवळ समारंभपूर्वक पुरण्यात येते. २५-३० दिवसानंतर सापळा बघताना मुलांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो तो एकदम लाजवाब !
राजगुरूनगर परिसरातील दहा गावांमधील ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हा असा उपक्रम सुरू आहे. एकूण १२०० मुले ह्याचा लाभ घेत आहेत. आठवड्यातील तीन दिवस, एका दिवशी दोन शाळा ह्या पद्धतीने हा प्रकल्प चालतो. श्री. सुनील कुलकर्णी यांना या कामात श्री. मुरलीधर देशपांडे व सौ. भारतीताई देशपांडे यांचे मौलिक साह्य मिळते आहे.
प्रयोग, खेळ, प्रश्नमंजुषा, प्रासंगिक व्याख्याने, शैक्षणिक सी.डी. हेही उपक्रम या प्रकल्पांतर्गत घेतले जातात. ह्या प्रकल्पासाठी राजगुरूनगरमधील बिलकेअर फौंडेशनचे महत्वपूर्ण योगदान आहे.

**बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग :**



खेळता-खेळता शिकणारे बालवैज्ञानिक

मुंबई विज्ञान शिक्षक संघातर्फे दरवर्षी इयत्ता ६ वीतील विद्यार्थ्यांसाठी बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा घेतली जाते. ह्यासाठी मार्गदर्शन वर्ग ‘स्व’-रूपवर्धिनीत आयोजिले जातात. यंदा ह्या वर्गात एकूण ९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सर्व विद्यार्थी इंग्लीश माध्यमातील होते. परीक्षेस संपूर्ण महाराष्ट्रातून ४०,००० विद्यार्थी बसले होते. त्यातील ७.५% विद्यार्थी पुढील प्रात्यक्षिक परीक्षेस पात्र ठरतात. वर्धिनीतून एकूण ५ विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले. त्यातून पुढील मुलाखत व प्रकल्पासाठी (१०%) निवडले जातात. अंतिम स्पर्धेत वर्धिनीच्या वर्गातील २ विद्यार्थ्यांना रौप्य पदक मिळाले तर दोन विद्यार्थ्यांचे कांस्यपदक अर्ध्या गुणाने हुकले. विद्यार्थ्यांना श्री. सुनील कुलकर्णी सरांनी मार्गदर्शन केले.

उच्चतर ध्येयाची मर्यादा इतकी श्रेष्ठतर आहे की
मनुष्य या मार्गाने जाता जाता अखेर त्याला परमेश्वराचे तादात्म्य प्राप्त होते.

# आर्थिक वृत्त

'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्याचा विकास वेगाने होतो आहे. प्रत्येक विभाग आपली उद्दिष्टं निश्चित करून त्याप्रमाणे काम करताना दिसतो आहे. अर्थ विभागानेही स्वत:च्या विभागाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे ठरविले आहे.

'सर्व विभागांनी नियोजित केलेली उद्दिष्टं पूर्ण होण्यास लागणारा निधी वेळच्या वेळी उपलब्ध करून देणे.' यासाठी लागणारे आर्थिक नियोजन, देणग्या गोळा करणे व योग्य पद्धतीने खर्च होतो आहे का ? याकडे लक्ष ठेवणे, या सर्व गोष्टींकडे अर्थ विभाग लक्ष देत आहे.

मागील वर्षी सुरू केलेल्या पद्धती यावर्षी सुधारितरित्या पुढे नेत आहोत. सर्व विभागांकडून आर्थिक नियोजन करून त्याप्रमाणे दर महिन्याला त्याचा आढावा सादर करीत आहोत. निधी संकलनासाठी समिती गठित झाली आहे. त्या माध्यमातून काम सुरू झाले आहे. खरेदीसाठी स्वतंत्र काम करणाऱ्या समितीचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे चांगल्या गोष्टी योग्य भावात घेतल्या जातात व त्यातून बचतही होते यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. परंतु अजूनही त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे.

कार्यविस्तार, बदलती परिस्थिती व खरी गरज ओळखून खर्चावर नियंत्रण कसे ठेवले जाईल याचा प्रयत्न करीत आहोत. मागील वर्षी झालेला एकूण खर्च रु. ६४ लाख होता. त्याची स्थूलमानाने विभागणी पुढीलप्रमाणे आहे - उद्दिष्टांवरील खर्च ९० टक्के आहे तर प्रशासनावरील खर्च १० टक्केच आहे.

यावर्षीचा एकूण खर्च आधीच्या वर्षापेक्षा २७% अधिक आहे. यामध्ये महागाई व कार्याचा विकास या गोष्टी अंतर्भूत आहेत. वर्धिनीने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्याने सुरू केलेल्या युवा विभागावर झालेल्या खर्चाचाही समावेश यात आहे.

वाढलेला खर्च पेलणे शक्य झाले ते केवळ सर्व देणगीदार व हितेच्छुकांच्या सहकार्यामुळे. विशेष उल्लेख करायचा झाला तर मागील वर्षी 35 AC ची मर्यादा संपल्याने फक्त 80G अंतर्गत देणग्या गोळा करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते व ते कै. किशाभाऊ पटवर्धन यांनी वर्धिनीस जोडलेल्या अमूल्य मार्गदर्शकांनी पेलले. सर्वांनीच निधी संकलनास चांगला प्रतिसाद देऊन या कार्यास पैसे कमी पडू दिले नाहीत. यास हातभार लावला तो काही मोठ्या उद्योजकांनी (कॉर्पोरेटस), त्यांनी वर्धिनीच्या वर्धकांच्या खांद्यास खांदा लावून काम केले व सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (Corporate Social Responsibility) या माध्यमातून आर्थिक मदत दिली. या सर्व हितचिंतकांबद्दल व देणगीदारांबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

**आवाहन**

**नुकतीच 35 AC सवलत प्राप्त झाली आहे. या अंतर्गत चऱ्होली प्रकल्पाचा विकास, तसेच सर्व विभागांच्या कामाची नोंद आहे. वर्धिनीच्या या कार्य विस्तारासाठी आपण सर्वांनी आपला बहुमूल्य वेळ, आपली कौशल्ये व अर्थरूपाने साह्य करावे असे आवाहन आपणास करतो. त्याचबरोबर या कामात सहभागी होऊ शकतील अशा आपल्या परिचयातील व्यक्तींची नावे कळवलीत तर त्यातून वर्धिनीच्या कामाचा वेग वाढविण्यास हातभार लागेल ही विनंती.**

आपल्या आवडत्या ध्येयाकरिता आपले आयुष्य खर्च करण्यास तयार होणे व
आपल्या कार्यक्रमात प्राप्त होणारी दु:खे बिनतक्रार सोसणे यातच खरा पुरुषार्थ आहे.

## आठवणी दाटतात

'स्व'-रूपवर्धिनीच्या परिवारातील कार्यकर्ते, हितचिंतक, देणगीदार व विद्यार्थी अशांपैकी काहींच्या घरामध्ये या वर्षभरात ज्या व्यक्तींचे दु:खद निधन झाले त्या सर्व कुटुंबियांच्या दु:खात वर्धिनीचा सर्व परिवार सहभागी आहे.

- श्री. जयंतराव मुतालिक
- बसप्पा चलवादी
- श्रीमती विमल नारायण पुरंदरे
- सौ. नीलिमा संतोष धुमाळ
- श्रीमती मालती शिंदे
- श्री. शामसुंदर गाडे
- श्रीमती रुक्मिणीबाई विठोबा जोगळे
- श्रीमती आनंदीबाई खलाटे
- श्री. विष्णू हरिभाऊ गावडे
- श्रीमती निर्मलाताई रोंघे
- श्री. रामचंद्र उंदरे

---

याच कालावधीत काही ख्यातनाम व्यक्तींचेही दु:खद निधन झाले.
अशा सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात 'स्व'-रूपवर्धिनीचा परिवार सहभागी आहे.

- प्रसिद्ध लेखिका श्रीमती आशा मुंडले.
- ज्येष्ठ कवी आणि गीतकार सुधीर मोघे.
- जागतिक कीर्तीचे योगाचार्य व्ही. के. एस. अय्यंगार.
- रा. स्व. संघाचे निवृत्त संघचालक ॲड. माणिकराव नरसिंगराव पाटील
- ज्येष्ठ अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते श्री. सदाशिव अमरापूरकर.

---

पुणे जिल्ह्यातील माळीण गावी व जम्मू काश्मीरमध्ये ओढावलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. वर्धिनी त्या सर्वांना विनम्र श्रद्धांजली अर्पित करीत आहे.





**व्यक्तिमहात्म्य कमी होऊन व कार्याचा गौरव वाढून राष्ट्रनिशाणाचा जयघोष करीत ही जनता इतक्याच उत्साहाने नाचू लागेल तर मला अत्यंत आनंद होईल.**

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक-श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२ शाखा विभागप्रमुख**-श्री. निलेश धायरकर ✆ : ९०२९०७४५२१

### ग्रामीण शाखा

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | ग्रामीण शाखा | रामेश्वर विद्यालय, मु. पो. विंग<br>ता. खंडाळा, जि. सातारा | **श्री. अमोल लोखंडे**<br>✆ : ७७०९६४२१०१ |

### भाग १ (शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. वेदांग बेहेरे** ✆ : ८६००१६५१६७

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | समर्थ रामकृष्ण शाखा | बाबुराव सणस कन्याशाळा,<br>२२/१, मंगळवार पेठ, पुणे - ११. | **कु. अक्षय भेगडे**<br>✆ : ९६७३९१३०१७ |
| ॐ | स्वामी योगानंद शाखा | एम. ए. एस. भावे हायस्कूल,<br>सदाशिव पेठ, पुणे - ३० | **कु. यश शहा**<br>✆ : ८१४९७७८२२९ |
| ॐ | स्वामी श्रद्धानंद शाखा | म. गांधी विद्यालय<br>घोरपडे पेठ, पुणे - ४२ | **कु. रजनीकांत बत्तीन**<br>✆ : ७८४१९८४६७४ |
| ॐ | वीर अभिमन्यू बालशाखा | 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू<br>२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,<br>पुणे - ११ | **कु. निखिल कानडे**<br>✆ : ९१७५६६४२६६ |

### भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. अनिरुद्ध गायकवाड** ✆ : ७७०९००७७०६

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी अखंडानंद शाखा | सिताराम आबाजी विद्यालय,<br>बिबवेवाडी, पुणे - ३७ | **कु. अजय हवाले**<br>✆ : ८८०५५७११५२ |
| ॐ | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | विश्वकर्मा विद्यालय,<br>अप्पर इंदिरानगर, पुणे - ३७ | **कु. किरण बेंडगे**<br>✆ : ९६२३३८५८९१ |
| ॐ | स्वामी शिवानंद शाखा | कै. वि. स. खांडेकर शाळा<br>सहकारनगर, पुणे-९. | **कु. स्वप्नील कुंभारकर**<br>✆ : ९०४९०४४७४२ |
| ॐ | धर्मवीर शंभू राजे शाखा | प्रेरणा माध्यमिक विद्यालय,<br>गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | **श्री. प्रतीक कोंडे**<br>✆ : ९५२७५३१४२३ |

**निश्चयाचे जेथे बल आहे तेथे ईश्वरकृपेने अखेरीस सिद्धी अवश्य प्राप्त होते. लोककल्याणाचा राज्यमार्ग हाच होय.**

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. नकुल थावरे** ✆ : ९७६५४०५६६६

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी सुबोधानंद शाखा | पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | कु. गजानन केंडे ✆ : ९७६३०५०५२६ |
| ॐ | स्वामी ब्रह्मानंद शाखा | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | कु. अमोल गोरे ✆ : ७७९८०८४९७३ |
| ॐ | राजर्षी शाहू शाखा | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे - ५२ | श्री. प्रसाद गजमल ✆ : ९७६७८९०३४० |
| ॐ | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | कै. बंडुजी खंडुजी चव्हाण विद्यालय, धायरेश्वर मंदिराजवळ, धायरी. पुणे ४१ | कु. अनिकेत जवळीकर ✆ : ९३२५१६१२३४ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : कु. चेतन कुसाळकर** ✆ : ९८८१४४४९६१

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी विवेकानंद शाखा | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | कु. अभिजित दोडके ✆ : ९९७५६५६३१६ |
| ॐ | स्वामी अभेदानंद शाखा | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | कु. सागर मोहिते ✆ : ८६९८०१९६०९ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : सौ. सुरेखा माळी** ✆ : ९९२३३३०९८२

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | भगिनी निवेदिता शाखा | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | कु. त्रिशाला शासम ✆ : ८७९३०७८५४९ |
| ॐ | घोरपडे पेठ शाखा | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | कु. वैदेही बेहेरे ✆ : ९५२७५२८५७४ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

**मी न्याय मागण्यासाठी उभा आहे; दया करा, अशी माझी मुळीच मागणी नाही.**

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे, सौ. मंजूषा कुलकर्णी**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. शामला टापरे**

बचतगट समन्वयक – **सौ. उषाताई पोफळे**

❖❖❖

## उद्योगशिक्षण वर्ग

१) सहायक परिचर्या (पुणे वर्ग) – **सौ. विजयालक्ष्मी कुलकर्णी, सौ. लता सत्तूर, सौ. कुंदा जोशी**

सहायक परिचर्या (माले वर्ग) – **सौ. नंदाताई बेंडखळे, सौ. दुर्गा केणी**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगिता पाटील, सौ. मनिषा कुलकर्णी**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

❖❖❖

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

सौ. मनिषाताई नरडेकर

**अभ्यासिका केंद्र**

श्री. रुपेश जाधव

**ग्रंथालय**

श्रीमती नीला कुडलिंगार

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि 'स्व'–रूपवर्धिनी संचालित संयुक्त अभ्यासिका केंद्र**

सरदार कान्होजी आंग्रे विद्यालय,

शुक्रवार पेठ – श्री. वसंतराव भिडे ✆ : (०२०) २४४७१५०८

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**राष्ट्रास परकी भाषेत शिक्षण देणे म्हणजे त्याची खच्ची करण्यासारखे आहे.**

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र)– प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
३) साक्षरता वर्ग
४) सहाय्यक परिचर्या वर्ग
५) शिवण वर्ग
६) बचतगट
७) कुटुंब सल्ला केंद्र
८) सेवावस्ती संस्कार वर्ग
९) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

सौ. मेघा नडे-नगरे

**कार्यालय विभाग**

कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्रीमती नीला कुडलिंगार, श्री. अशोकराव चिपळूणकर
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**परमेश्वरावर भक्ती ठेवा आणि सर्व उद्योगांचे मूळ जो निश्चय तो कायम ठेवा, म्हणजे परमेश्वर तुम्हास साह्य करील**




# प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।





जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

प्रतिकूल परिस्थिती असताना तिला अनुकूल करून घेण्याची काही स्वतंत्र शक्ती (Freedom of Will) मनुष्यात आहे

## हार्दिक शुभेच्छा !

# मनकर्णिका

# नील इंजिनियर्स

*सिव्हील इंजिनियरींग, Construction*
*वॉटर अॅण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस*

**श्री पराग लकडे**
फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

751, Kasba Peth,
Sattoti Chowk,
Pune 411 011

DONATE GENEROUSLY
FOR
VANVASI WELFARE

TO

SHRI SUNDER NARAYAN
GANESH SANSKAR KENDRA

DEOBANDH
TALUKA - KHODALA,
DIST - THANE

INSERTED BY
S. R. PUSALKAR & CO.,
MUMBAI

*With Best Compliments From*

**THE POONA MOTOR GOODS TRANSPORT**

**** Fleet-Owners & Transport Contractors***
**** Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa***
**** Full truck load service for Maharashtra & Gujrath State***

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth,
Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi,
Pune 44.
Phone : 27656925, 27656935

❖

13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi,
Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖

Ramraj Yadav Chal, Gala No. 2,
90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400
072, Phone : 28513018


आम्हास जे पाश्चात्त्य शिक्षण मिळाले आहे त्याने हल्लीची आमची स्थिती आम्हांस दु:सह झालेली आहे.







CHEM-TECH

**With Best Compliments From**

# *M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.*

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex, Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com


समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षा सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरुर लागत असते.

# संपदा सहकारी बँक लि.,पुणे

**मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२**

**दूरध्वनी क्र. २४४३३१५५, २४४९३२६१**

**ई-मेल :** sampadabank@rediffmail.com

**ऑडिट 'अ' वर्गातील लाभांश देणारी बँक**

* उद्योजक व व्यापारी बंधूंसाठी स्पर्धात्मक व्याजदराने कर्ज
* व्यवसायाच्या पतमानांकनानुसार किमान व्याजदर
* सवलतीच्या व्याजदराने वाहनकर्ज उपलब्ध
* RTGS / NEFT द्वारे त्वरित पैसे पाठविण्याची सोय
* व्यवसायाच्या आर्थिक मूल्यमापनानुसार विशेष व्याजदर
* कर्ज प्रकरणांची जलद छाननी करून त्वरित मंजुरी
* आयकर, सर्व्हिस टॅक्स व व्हॅट इ. कर ऑन-लाईन भरण्याची सुविधा
* CBS द्वारे कोणत्याही शाखेतून व्यवहार.

| | | |
|---|---|---|
| **सुभाष रावळ** | **अश्विनीकुमार उपाध्ये** | **सी.ए. विवेक मठकरी** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

**आजच आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा :**

* बुधवार पेठ शाखा, पुणे. फोन : २४४५६०८३, २४४५१८३०
* चाकण शाखा, जिल्हा पुणे. फोन : ०२१३५-३००५९०, २४९७३३
* सुभाषनगर शाखा, पुणे. फोन : २४४९५०२२, २४४९५४३४
* कर्वे रोड शाखा, पुणे. फोन : २५३९५८७६, २५३९४०६२
* धायरी शाखा, पुणे. फोन : २४३९१४७०, २४३९१४७१
* कोरेगाव भीमा शाखा, पुणे. फोन : ०२१३७-२५२००३, २५२००४



# प्लास्टिकचा पुनर्वापर ही आपली जबाबदारी आहे

**प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजेच पर्यावरणाचे रक्षण...**

**NICHROME**
Packaging Solutions

PACKAGING INTEGRATION SERVICE SINCE 1977

**NICHROME INDIA LTD.**

Safire Park Galleria, 4, Pune-Mumbai Road, Shivajinagar, Pune-411 005, India.

**Tel. :** +91-20-6601 1001 | **Fax :** +91-20-6601 1010

**E-mail :** marketing@nichrome.com | **www.nichrome.com**

Packaging Solutions For ● Liquid ● Grains ● Powders ● Seeds ● Snacks ● Pharma ● Personal Care


**स्वभाषेच्या अभिवृद्धीस मदत करणे म्हणजे पुष्कळ अंशी स्वदेशाच्या अभिवृद्धीस मदत करण्यासारखेच आहे.**

*With Best Compliments From Deodhar Bros*

**DECENT DECORATORS**
*PROTECTIVE AND DECORATIVE PAINTING*

**GURUPRASAD CONTRACTORS**
*CIVIL ENGINEERS AND CONTRACTORS*

**PRODUCT COATING**
*SHELL CORE AND ASSEMBLIES*
*AN ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY*

***

**DECENT INTERIORS & DECORATORS (PVT) LTD**
*INTERIOR DECORATORS*

***

**RAMRAI**
*FARMING - HORTICULTURE - NURSERY*

***

**JANSEVA BHOJANALAYA**
*AUTHENTIC MAHARASHTRIAN THALI*

***

**MEHFIL CATERING SERVICES**
*ALL TYPES OF CATERING SERVICES*

***

**HARSHAL HALL**
*Two Specious Marriage Hall With All Amenities*

***

**PESHWA (DUBAI & SHARJAH)**
*Maharashtrian cuisine for the world*

***

**ASIA HOSPITALITY PVT. LTD.**
*April rain chain of fine dining restaurants*

---

**Chinchwad Office :** Plot No. 81, D-III Block,
MIDC Chinchwad, Pune 411019. Telephone : 27473730.
E-mail : product_coating@yahoo.com, guru_const@yahoo.co.in
**Pune Office :** 759/55, B Deccan Gymkhana, Pune 411 004
Telephone : 25678217, 25679488, Telefax : 25679497
E-mail : mehfil_catering@yahoo.com,
decent.interiors@yahoo.co.in

सार्वजनिक पुढाऱ्यांची सार्वजनिक वर्तणूक अपवादाचा संशयसुद्धा न येण्यासारखी असली पाहिजे.

*With Best Compliments From*


# M/S. D. PRATAP

## *IRON MERCHANTS*

***DEALERS IN BEAM, CHANNELS, ANGLES, SHEETS & PLATES***

**1196, BHAWANI PETH,**
**PUNE 411 042.**
**■ TEL. : 26383585, 26383595 (Office)**
**■ 2426 4847 (Residence)**

धर्म आणि सुधारणा ह्यांच्यामध्ये इतर देशात जसा विरोध आढळून येतो तसा हिंदुस्थानात नाही.




हिंदुधर्म द्वेष करावयास शिकवीत नाही.

*With Best Compliments From*

# LANDMARK
## DEVELOPERS

"KRUTANJALI"
65/20, ERANDAVANA,
SHANGRILA RESTAURANT LANE,
LAW COLLEGE ROAD,
PUNE - 411 004
TEL. : (020) 2543 3200 / 2543 3000
FAX : (020) 2543 2300
E-MAIL : kbaldota@rediffmail.com

हिंदुधर्माइतका सहिष्णु धर्म जगात दुसरा सापडणार नाही.

NIRMAL
















# NIRMAL WATER SYSTEM AND SERVICES

**Reverse Osmosis Plant | Water Softening Plant | Demineralization Plant | Sand Bed Filter**
**Activated Carbon Filter | Effluent Treatment Plant | Sewage Treatment Plant | Cooling Tower Chemicals**

**Corporate Office :** Shop No.003, Plot No. 12, Karishma CHS, Near Bhawani Chowk, B-Cabin Road, Ambernath (E), Dist : Thane - 421 501
**Phone :** (0251) 6481958, 9326884736, 9923134736, 9324284736
**Email : nirmalwater@hotmail.com | sales@nirmalwater.com | Web : www.nirmalwater.com**

**पृथ्वीवरील कोणतेही राष्ट्र सुधारलेल्या अवस्थेत येण्यापूर्वी हिंदुस्थान देश सुधारणेच्या शिखरास पोहोचलेला होता.**




धर्म आणि सुधारणा ह्यांच्यामध्ये इतर देशात जसा विरोध आढळून येतो तसा हिंदुस्थानात नाही.

## पुरुषसिंह

'खुशाल सांगा सजा हवी ती कोत्या न्यायात
तुमच्याहुनही महान शक्ती आहे विश्वात
माझे भांडण न्यायाचे - मी तेथे मांडीन
स्वराज्य आहे जन्मसिद्ध हे, ते मी मिळवीन'
स्वातंत्र्याच्या तेजोमय सूक्ताचा उद्गाता
नररूपे अवतरलेला तो पुरुषसिंह होता ।

सह्याद्रीच्या खड्या कड्यासम ताठ धीट छाती
लाख रवींची आग तिच्यातुन साठवली होती
मूर्त होय त्याच्या रूपातुन कणखर निर्धार
अग्निकणासम नेत्र, जिभेला, खड्गाची धार
तेजाचा लसलसता अंकुर काळजात होता
नररूपे अवतरलेला तो पुरूषसिंह होता ।

गोठुन थिजल्या समाजपुरुषा जागविले याने
अवघड शास्त्रांतील गूढही पारखिले याने
कठोर कारागृही यातना सोशित असताना
मग्न राहिला उकलित गीतेतील रहस्यांना
उदंड कर्तृत्वाचा साक्षात मेरूमणी होता
नररूपे अवतरलेला तो पुरुषसिंह होता ।

जगावेगळा होता, तरि हा जनतेचा नेता
'लोकमान्य' या शब्दालागी तो भूषण होता
विराट देशही होय पोरका तो गेला तेव्हा
सहस्त्र नयनी जणु नियंता शोकाकुल होता
नररूपे अवतरलेला तो पुरुषसिंह होता ।

- सुधीर मोघे

(एकता मासिकाच्या वन्देमातरम् शताब्दी विशेषांक ऑगस्ट १९७६ मधून साभार)

क्षमा, शांती, दया, विवेक हे गुण आहेत; परंतु त्याचा योग्य स्थळी उपयोग करावा लागतो.